# स्वर्गाची पालखी



गो. वि. करंदीकर

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
स. नं. ११२३

REFBK-0007756

स्पर्शाची पालवी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23058 वि: 1794
क्रमांक 1123 नों. दि. 24/3/58

# स्पर्शाची पालवी

## आणि इतर लघुनिबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वमते
अनुक्रम 23058 दि: 10-7-85
क्रमांक 7723 नों. दि. 27/3/84

गो. वि. करंदीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७७५६
लेख : शाखा (स्वतंत्र)

REFBK-0007756

पॉप्युलर मुंबई ७

मूल्य तीन रुपये

प्रकाशक :
**ग. रा. भटकळ**
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

प्रथमावृत्ति
९ जानेवारी १९५२

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

जया

नंदू

उदय

या पिलांना—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23058 वि: 1949
क्रमांक 9223 नों दि 29/3/58

# अनुक्रम


| | |
|---|---|
| स्पर्शांची पालवी | १ |
| आंतले आणि बाहेरचे | ५ |
| आवाजाची दुनिया | ९ |
| खुर्च्यांनाहि मनें असतात | १२ |
| खोडलेले शब्द | १६ |
| 'नाहीं' म्हणण्याची शक्ति | २० |
| पहाटेचा कैफ | २४ |
| मी आणि व्याकरण | २९ |
| बेडूक, शब्दकोडीं आणि संस्कृति | ३३ |
| न चुकणारीं माणसें | ३८ |
| सुखी होण्याचा हक्क | ४४ |
| चिंचा आणि आवळे | ५१ |
| नवे नवे शोध | ५५ |
| आणखी एक भूक | ५९ |
| पहिला पाऊस | ६४ |
| पानगी | ६८ |
| मामाचें घर | ७३ |
| या माझ्या पाऊलवाटा | ७८ |

| | |
|---|---|
| थोडेंसें विश्वाविषयीं | ८३ |
| हत्ती आणि आंधळे | ८७ |
| बोवारणीचें बोचकें | ९२ |
| या इथें | ९७ |
| तपकिरीविषयीं चिमूटभर | १०१ |
| स्नेही | १०६ |
| हॅम्लेटची खरी चूक | ११३ |
| घसरत्याचे विचार खोलांत | ११८ |
| डायरीचीं पांच पानें | १२४ |

# स्पर्शाची पालवी

अजून संध्याकाळ रेंगाळते आहे; तिला पृथ्वीचा स्पर्श सोडवत नाहीं. तिचे सोनरेशमी हात पृथ्वीच्या गळ्यांत अडकले आहेत. तिच्या स्पर्शानें वाळूसुद्धां शहारली आहे. आज माड मोरपिसें आहेत; आपल्या झावळ्यांचा पिसारा फुलवून तेहि मावळतींत मिसळले आहेत. ...आतां अंधार नाहीं आणि प्रकाश नाहीं. फक्त त्यांचा परस्परांना होणारा स्पर्श तेवढाच शिल्लक आहे. निजलेल्या मुलाच्या अंगावरचा हात आईनें हळूहळू काढून घ्यावा तशी संध्याकाळ आपला हात हळूहळू काढून घेत आहे. तिचीं बोटें निवलेलीं आहेत; अबोध स्पर्शानें भारलेलीं आहेत.

पूर्वी प्राणहि स्पर्शरूप होता. त्या वेळीं शेफारलेल्या सोनचाफ्याला नाक फुटलें नव्हतें. जाईजुईबरोबर फुगडी खेळणाऱ्या वाऱ्याच्या लहरींना कान नव्हते. झांबऱ्या चिंचा जिभेच्या मुळांतून निथळत नव्हत्या...अगोदर झाड कीं अगोदर बीं, असा खुळा प्रश्न कोणी कोणाला विचारीत नव्हता. जिज्ञासा नव्हती आणि ज्ञानहि नव्हतें. माणसाच्या कवटीचा छेद घेणारें तें विजेचें पातें अजून लखलखलें नव्हतें. कोणी बोलूं शकत नव्हता आणि कोणी ऐकूंहि शकत नव्हता. खरें म्हणजे अजून 'कोणी' हा चमत्कारिक प्राणी जन्मलाच नव्हता. तो प्राणाचा प्रारंभ होता. त्या वेळीं सर्व इंद्रियें स्पर्शामध्येंच दाटलेलीं होतीं. स्पर्शांतच सर्व जाणीव पसरली होती. वासना अथांगानें तुडुंबली होती. सृजनाची ती पहाट होती.

ज्या वेळीं पहिल्या स्पर्शाचें संवेदन झालें त्याच वेळीं आत्म्याचा जन्म झाला. त्याच वेळीं विश्वामध्यें पहिली महत्त्वाची क्रांति घडून आली. त्या क्रांतीचा प्रारंभ हें अजूनहि एक गर्भगूढ आहे.

म्हणूनच मी स्पर्शवादी आहें. मला वाटतें, प्रत्येक कलावंत हा स्पर्शवादीच असतो. त्याची प्रत्येक कलाकृति ही ह्या गर्भगूढ क्रांतीचा अनंतोत्सव साजरा करीत असते. वस्तूचा स्पर्श भोगल्याशिवाय मला तिचें पुरें आकलन होऊंच शकत नाहीं. सागवानाच्या गुळगुळीत टेबलावरून मधूनमधून हात फिरवल्याशिवाय मला माझी खोली परकी वाटते. काटे-चमचे वापरून जेवणारीं माणसें हीं माझ्या कल्पनेप्रमाणें नेहमींच अर्धपोटीं असतात. चहा पितांनासुद्धां कपाभोवतीं पंजा आवळून हळूहळू घोट घेत चहा पिणें मी अधिक पसंत करतों. पाकळ्यांवरून हळुवारपणानें हात फिरवल्याशिवाय कोणत्याहि फुलाचा सर्व सुगंध मला अनुभवतां यत नाहीं...खऱ्या अर्थानें मला नमस्कारहि करतां येत नाहीं; त्यांतून कांहींच व्यक्त होऊं शकत नाहीं; म्हणून मला कांहीं बोलायचें असलें कीं मी मित्रांच्या खांद्यावर हात टाकतों. मग शब्दांना आपली वाट सापडूं शकते. नाहीं तर ते कुठें तरी जातात; भरकटत सुटतात; स्वतःभोवतींच घुमत बसतात, आकाशावर पाठ घासतात किंवा पाताळांत दडी घेतात. ते पृथ्वीला भिडत नाहींत; अस्तित्वामध्यें भिजत नाहींत. तीं फक्त नकली नाणीं असतात. पण खांद्यावर हात टाकला कीं सारें ठीक होतें. त्या स्पर्शाच्या आधारानें शब्दांचे ओठ भावनेशीं भिडूं लागतात. माझीं सुखदुःखें हीं फक्त स्पर्शपल्लवी भाषाच बोलूं शकतात. तीच प्राणाची आदिभाषा आहे. त्याला जेव्हां खरेंखरें कांहीं सांगायचें असतें तेव्हां तो तें स्पर्शांतूनच सांगत असतो; आणि त्याला जें आठवावेंसें वाटतें तेंसुद्धां त्याच्या स्पर्शातच साठवलेलें असतें.

स्पर्शामध्यें अपार सामर्थ्य आहे. दोन जिवांनीं परस्परांना स्पर्श केला कीं संस्कृतीनें उभ्या केलेल्या भिंती धडाधड कोसळून पडतात. जिवाच्या मूलभूत अद्वैताचा साक्षात्कार होऊं लागतो. सहानुभूतीच्या संथ प्रवाहांतून आपण आपल्या मुळाकडे वाहूं लागतों. गुरावासरांनासुद्धां स्पर्शाचा अर्थ कळूं शकतो. त्या भाषेंतून आपण सबंध प्राणिसृष्टीशीं बोलूं शकतों. माझ्या धाकट्या भावाचा गोठ्यांतल्या जनावरावर जीव असे. या स्पर्शाच्या साहाय्यानें तो आपल्या लाडक्या

लुक्याशीं तासन् तास बोलत बसे. लुक्या लुकडा होता आणि दिवसभर बुळकत बसे; पण तरी तो त्याला आवडत असे. अभ्यास करायला जातों असें सांगून बापू गोठ्यांत जाई आणि लुक्याशीं टिवल्याबावल्या करीत बसे. तान्ह्या म्हशीच्या काथोटलींतलें आंबवण आईला न विचारतां तो लुक्याला घाली. मग म्हशीला पान्हवण कमी पडे. एकदां आईला हें उमगलें; आणि मग ती खूप रागावली. दुसऱ्या दिवशीं बापूवर पाळत ठेवण्यासाठीं मी काथोटलीजवळच उभा राहिलों. बापू आला आणि माझ्याकडे न बघतां तरातरा लुक्याच्या मेंढाकडे गेला. त्याला पाहिल्याबरोबर लुक्यानें ओढ घेऊन धसमुसळेपणा करायला सुरुवात केली. मग बापूनें आपले कोरडे हातच लुक्याच्या तोंडापुढें धरले; लुक्यानें ते लुचकलुचक चाटले; आणि मग लुक्या शांत झाला...पण बापू मात्र रडत होता...बापूचे लाळेनें बुळबुळीत झालेले ते हात मला पुष्कळदां दिसतात...आतां लुक्या नाहीं आणि बापूहि हाकेच्या पलीकडे आहे...पण ते हात अजूनहि इथें आहेत. आत्तां, या इथें; माझ्यापुढें पसरलेले...

आणि तसेच ते दुसरे हात; त्या गंग्या महाराच्या पोराचे. गंग्या महाराचा पोर आमच्याच वर्गांत होता. त्या वेळीं महाराच्या पोरांना बाजूला बसवीत. आमचे मास्तर त्याला 'म्हारडा' म्हणत आणि आम्ही त्याला 'म्हारकुंडा' म्हणूं. त्याला आपली जीभ बाहेर काढण्याची चमत्कारिक सवय होती. मास्तर म्हणत, "याला थोडें चाटायला शेण आणून द्या रे!" मग चटकन् तो जीभ आंत ओढी आणि सगळा वर्ग ख्यॅ-ख्यॅ करून हसूं लागे. पण मास्तर दुकानावर गप्पा मारायला गेले कीं तो आमच्यापुढें येऊन "शिवतय, शिवतय—" करून आम्हांला भीति दाखवी. त्या वेळीं महाराच्या शिवाशिवीची आम्हांला फार भीति वाटे. त्या वेळेपासूनच महारांच्या स्पर्शाविषयीं माझ्या मनामध्यें एक विकृत आकर्षण व भीति निर्माण झाली असावी. अजूनहि त्याचे अवशेष शिल्लक असावेत; कारण महार म्हटला कीं मी त्याला अधिक जवळ बसविण्याचा प्रयत्न करतों! त्याच्याशीं मी सहजपणानें वागूं शकत नाहीं!...अस्पृश्यता हा स्पृश्यांना मिळालेला शाप आहे!

कारण स्पर्शाच्या संवेदनेमध्यें सहजतेला फार महत्त्व असतें. बाकीचीं इंद्रियें हीं जाणिवेच्या आवर्तांतून निर्माण झालेलीं आहेत. जाणिवेच्या प्रवाहांतील ते भोवरे आहेत. एक वेळ अशी येईल कीं हे भोवरे नाहींसे होतील. पुन्हा जाणिवेचा

प्रवाह एकात्म होऊन संथपणानें वाहूं लागेल. तेव्हां सर्व इंद्रियें स्पर्शामध्यें बुडून जातील. स्पर्श हें माणसाचें पहिलें इंद्रिय आहे आणि कदाचित् तेंच इंद्रिय शेवटीं शिल्लक राहील...म्हणूनच जें इतर इंद्रियांना झेपत नाहीं तें स्पर्श व्यक्त करूं शकतो. भक्तीची किंवा प्रीतीची परिसीमा स्पर्शाशिवाय कांहीं बोलूं शकत नाहीं. स्पर्श हाच शेवटचा शब्द असतो...रत्नागिरीला नेहरू आले तेव्हां एक सहा वर्षांचा मुलगा त्यांना पाहायला गेला; तो परत आला तेव्हां माझ्या स्नेह्यांनीं त्याला विचारलें, "नेहरूंना पाहून तुला काय वाटलें?" क्षणभर तो घुटमळला आणि नंतर म्हणाला, "त्यांच्या अंगाला हात लावावासा वाटला." नेहरूंच्या व्यक्तित्वाचा एवढा मोठा गौरव अजून कोणीहि केलेला नाहीं.

स्पर्शामधून समाधीपर्यंत पोहोचतां येतें; निदान कलावंताला ज्ञात असलेल्या समाधीपर्यंत तरी निश्चित पोहोचतां येतें. ती साधनासुद्धां फार सोपी नाहीं... फुलें दिसलीं कीं डोळे मिटावे...पानावरून हात फिरवावे...त्याच्या रेषांना टापत जावें...नंतर मिटलेल्या डोळ्यांवर फूल घोळवावें...त्याच स्पर्शामध्यें डोळे हरवावे ...असें केल्यानें काय होतें? डोळ्यांतल्या भावलीचें लग्न लागतें...

स्पर्शामधून समाधीपर्यंत पोहोचतां येतें...मुकें होऊन मुलांत जावें; जावळा-मधून बोटें फिरवावीं; पाठीवरून हात फिरवावा; गुब्र्या गुब्र्या तळहातांचा ओठ विसरून पाप्पा घ्यावा. नंतर किरंगळी, मिरंगळी, मध्यांगळी, देवकी आणि बापया ह्या सर्व मंडळींशीं गप्पा कराव्या; नंतर हळूहळू कोपरघाटानें खांदेगडावर जावें... शेवटीं गळ्याखालीं 'कुचकुल्योच कान्यो' कराव्या...असें केल्यानें काय होतें? सात जन्मांचीं सात फुलपांखरें आपल्या टकलावर येऊन बसतात.

केसरी; ऑक्टोबर, १९५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलमते.
अनुक्रम 23056 वि: विवेक
क्रमांक 9923 नों. दि. 24/3/56

# आंतले आणि बाहेरचे

मला आतां असें वाटतें कीं माणसाच्या खऱ्या जाती दोनच : एक 'आंतले' आणि दुसरे 'बाहेरचे'. या विचाराचा धुडगूस माझ्या अंतरंगांत गेले कित्येक महिने चालू होता; पण परवां पुण्याहून येतांना आगगाडींत जो मार्मिक अनुभव आला त्यानें तो अगदीं स्पष्ट झाला. अंतःकरणाला उजळा देऊन जाणारा प्रसंग तो अनुभव; आणि या दृष्टीनें त्या साध्या प्रसंगाला एका खोल अनुभूतीचें महत्त्व आहे! या अनुभूतीनेंच माझा अस्पष्ट विचार सुस्पष्ट केला आणि सगळीकडे मला माणसांच्या दोनच जाती दिसूं लागल्या—'आंतले' आणि 'बाहेरचे'.

स्टेशनवर पोचायला मला आधींच उशीर झाला होता; आणि आंत शिरतों इतक्यांत एक घंटा ठणाणली. अशा वेळीं आपली मनःस्थिति मोठी विचित्र असते. घंटा कुठल्याहि गाडीची असली तरी ती आपल्याच गाडीची असल्याचा आपल्याला भास होतो. त्यांत माझ्या पायांत बूट असल्यानें धावणेंहि धोक्याचें होतें. तेव्हां चालण्याच्याच पद्धतीनें धावण्याचा वेग साधीत मीं शिकस्त करून गाडीचें दार गाठलें; आणि तें लोटण्याचा प्रयत्न करणार इतक्यांत आंतल्या लोकांचा हट्टाग्रह सुरू झाला.

"अहो साहेब! हा सेकंडचा डबा आहे! पुढें चला." एकानें सभ्य सूचना

केली. काय गंमत आहे पाहा ! आंतल्या लोकांना बाहेरचे लोक हे सर्व तिसऱ्या वर्गांतील वाटतात.

इतक्यांत दुसऱ्यानें आवाज उठवला, "अहो, पुढच्या डब्यांत इतकी जागा आहे; आणि इकडे कशाला घुसतां? पुढचा डबा सबंध रिकामा आहे! तिकडे जा." आंतल्या लोकांना आपल्या डब्याशिवाय बाकी सर्व डबे—विशेषतः पुढचे—नेहमीं रिकामे दिसतात !

पण आहे त्यालाच चिकटून राहण्याची कोकणी कारवाई केल्याखेरीज मला गत्यंतर नव्हतें. मी दार लोटीत होतों आणि 'आंतले' माझा प्रतिकार करीत होते. बरें त्यांचीहि चूक नव्हती. गाडींत तोबा तोबा गर्दी होती; आणि दार उघडणेंहि मुष्किल होतें. विशेषतः दाराजवळ खेटून उभा असलेल्या एका 'वक्रतुंड' 'महाकाय' भय्यानें द्वारपाळाचें काम मोठ्या नेकीनें चालविलें होतें. आंतले लोक त्याचें कौतुक करीत होते आणि त्या कौतुकानें त्याची वीरवृत्ति जागृत झाली होती. शेवटीं दाराच्या आघाडीवरून माघार घेऊन मीं गनिमी काव्यानें खिडकीवर हल्ला केला. वळकटी आंत ढकलली; अर्धवट उडी मारून डोकें आंत खुपसलें आणि पाय उचलून स्वतःचा त्रिशंकू करून घेतला ! परमेश्वराला त्रिशंकूची दया येवो किंवा न येवो, पण माझ्या या अवस्थेची दया आंतल्या लोकांना आली हें निश्चित. गाडी सुरू झाली; मी आंत ओढला गेलों; आणि त्या महाकाय द्वारपाळाच्या खांद्याला खांदा लावून मी उभा राहिलों.

पण आश्चर्य हें कीं मी आंत आल्यापासून अवघ्या दहा मिनिटांत माझा कायापालट झाला. लौकरच द्वारपाळाबद्दल आलेला तीव्र संताप पार ओसरला; आणि दोनचार प्राथमिक स्वरूपाच्या मामुली प्रश्नांनंतर फार दिवसांच्या सोबत्या-सारखे आम्ही गप्पागोष्टी करूं लागलों. त्यानें दिलेलें केळें मीं खाल्लें; मीं दिलेली सिगारेट त्यानें ओढली; आणि नंतर दोघांच्या वळकट्या एकमेकास जोडून त्या आसनावर आम्ही स्थानापन्न झालों. ज्यांचें टाळकें फोडण्याचा विचार मी बाहेर करीत होतों त्यांच्याच टोळक्यांत मी सामील झालों. मी आंत आल्याबरोबर तेहि आपलें शत्रुत्व विसरून गेले. माझी जात बदलली; दृष्टिकोन बदलला; संघर्षाची जागा सहकार्यानें घेतली. पुढच्या गाडीतळावर जेव्हां दुसरा एक खेडुतांचा

लोंढा आमच्या डब्यांत शिरूं लागला तेव्हां त्या हल्ल्याविरुद्ध आम्ही दोघांनींहि संयुक्त आघाडीची उभारणी केली आणि आंतल्यांच्या हितसंबंधांचें बाहेरच्यांच्या अतिक्रमणापासून संरक्षण केलें. 'बाहेर'च्याचा 'आंतला' झाला म्हणजे माणसांत केवढा अंतर्बाह्य बदल घडून येतो, याचा उमज मला प्रथम तेव्हां पडला.

'आंतले' आणि 'बाहेरचे' हा एक गूढ जातिभेद आहे. या आद्य जातिभेदाचीं स्थल-काल-मर्यादित स्वरूपें म्हणजे काळे-गोरे, स्पृश्यास्पृश्य, स्त्री-पुरुष, मालक-मजूर, वगैरे निरनिराळीं द्वैतें होत. 'उजवे' आणि 'डावे' हीहि याच ब्रह्माची लीला. जीवनांतल्या प्रत्येक क्षेत्रांत 'आंतले' आणि 'बाहेरचे' यांचा खटका नेहमी सुरू असतो. आंतल्यांची नीति निराळी, बाहेरच्यांची निराळी. आंतल्यांचे हेतु निराळे, बाहेरच्यांचे निराळे. 'आंतले' 'बाहेरचे' झाले अगर 'बाहेरचे' 'आंतले' झाले म्हणजे माणसाच्या मनोरचनेंत केवढा विस्मयकारक फरक पडतो पाहा: हक्क, रजा, वेतनश्रेणी, वगैरेसंबंधीं सतत कटकटी करणारा सेवक एकदां त्या संस्थेचा आजीव सेवक होऊन 'आंतला' झाला कीं लगेच त्याच्या तोंडांत 'त्याग', 'शिस्त', 'सहकार्य', वगैरे शब्द वेळींअवेळीं घोळूं लागतात. आणि जें सेवकांच्या बाबतींत तेंच संस्थांच्या व पक्षांच्या बाबतींत. सत्तेविरुद्ध लढणारा पक्ष सत्तारूढ झाला कीं लगेच त्याच्या कायापालटाला सुरुवात होते. संप घडविणारे संप नको म्हणूं लागतात; परकीयांवरील बहिष्काराची भाषा आपमतलबी सहकार्यांत विरून जाते; आणि सत्य-अहिंसेच्या सात्त्विक प्रतिमेंतूनच दुर्दम्य रणचंडिकेची प्रचंड गर्जना ऐकूं येऊं लागते!

'आंतले' आणि 'बाहेरचे' हा मौलिक जातिभेदच आपल्या सामाजिक मर्यादा, आकांक्षा, व सुखदुःखें यांतील प्रेरक शक्ति आहे. 'आंतले' हे वर्तमानकालावर स्वार झालेले असतात; 'बाहेरचे' हे भविष्याकडे आशाळभूतपणानें पाहत असतात. 'आंतले' हातपाय यथेच्छ पसरून झोपेची आराधना करीत असतात; तर 'बाहेरचे' दोन पायांवर उभें राहायला जागा कशी मिळेल या विवंचनेंत असतात. आणि सर्वसाक्षी निसर्ग आपल्या गूढ प्रेरणेप्रमाणें या 'बाहेरच्यां'चें 'आंतल्यां'त व 'आंतल्यां'चें 'बाहेर'च्यांत रूपांतर करण्याचा खेळ अखंड खेळत असतो. या खेळांतील प्रभावी टोल्याला आपण 'क्रांति' म्हणतों. माझा आगगाडींतील अनुभव किंवा एखादी मोठी सामाजिक क्रांति या दोन्ही घटना

मूलतः एकाच स्वरूपाच्या. दोन्ही कृतींमागील प्रेरणा एकच : 'जागा पाहिजे'! मग ती जागा टॉलस्टायच्या गोष्टीमधील फक्त सहा फूट असो अगर चर्चिलच्या साम्राज्यस्वप्नांतील सहा हजार मैल असो !

साहित्य; ऑक्टोबर, १९४९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 23058 ....... दि: [illegible]
क्रमांक ....2223....... नों दि: [illegible]

# आवाजाची दुनिया

सकाळच्या प्रहरीं अंगणांत आरामखुर्चीवर बसून वर्तमानपत्रें चाळण्याची मला खोड आहे. आतांहि मी तेंच करीत आहें; आणि 'आवाजाची दुनिया' या भपकेदार शीर्षकाखालील रेडिओचा कार्यक्रम माझ्या डोळ्यांपुढें आहे. इतक्यांतच एक फणसाचें पिकलेलें पान 'टप्कन्' बरोबर त्याच बातमीवर पडल्यानें माझी आवाजाची दुनिया आपोआपच विस्तृत होत आहे. रेडिओची घरघर आणि रस्त्यांवरील माणसांची कोल्हेकुई या दोन आघातांनीं मुंबईच्या माणसांचे कान किटून जात असावेत आणि या किटलेल्या कानांच्या व विटलेल्या मनाच्या शहरी माणसाला आवाजाची दुनिया रेडिओहून विशाल, नाजुक, व तरल असू शकेल अशी कल्पनाच शिवत नसावी! त्या मासळीबाजारांतील माणसांचा सूर नेहमी तार सप्तकांत लागलेला असणें अनिवार्य आहे...आपल्या शहरांतील कृत्रिमता व आवाज अशींच वाढत गेलीं तर लौकरच शहरी प्रियाराधनाचें एक नवीनच तंत्र अस्तित्वांत येईल. त्यांत निःश्वासांना स्थान नसेल आणि लाजणें हें मूर्खपणाचें गणलें जाईल! आसपासचा गोंगाट आणि चारी बाजूंची गर्दी जमेला धरणारें हें प्रियाराधन म्हणजे दोन भारलेल्या जिवांची भावातुर कुजबूज कशी असणार?

रेडिओची घरघर व रस्त्यावरील कोल्हेकुई टाळल्याशिवाय आपल्याला घरगुती आवाजांच्या खऱ्याखुऱ्या दुनियेंत प्रवेश मिळणार नाहीं. मातीनें सारव-

लेल्या लाल भिंतींचें छोटेंसें घर, त्यापुढें तुळशीला हृदयांत मिरविणारें लहानसें अंगण, वर आंब्या-फणसांच्या खांद्यांची झुलती सावली—अशा कोंकणी पार्श्वभूमीवर एखाद्या प्रशस्त आरामखुर्चीत सर्वांग शिथिल करून पडणें, व हिरव्या हिरव्या पानांतून पडणाऱ्या पिवळ्या पिवळ्या कवड्यांच्या गुद्गुल्या अनुभवणें हें ज्यांना माहीत नाहीं, त्यांना या दुनियेंत प्रवेश मिळणार नाहीं. मात्र हें भोगणाऱ्या भाग्यवंताला घरगुती आवाजांची फिरत मोठी गमतीची वाटते. उंबरठ्याच्या आंत संसाराच्या लाटा हेलकावत असतात: छोना 'वनं, वने, वनानि' पुन्हा पुन्हा घोकून साक्षात् वनवास अनुभवीत असते; जया 'ददद्' करीत वेदांतील 'ददद्'चा घनपाठ करीत असते; सुमा 'नदीकिनारीं माझा गांव' पुन्हा पुन्हा घोळीत भाजी फोडणीला टाकते आणि त्या 'चर्र' आवाजांत तिचें गाणें विरून जातें; मध्येंच दादांना खोकल्याची चळ येते आणि प्रत्येक चळीसरशीं ऐकणाराला जीवनाच्या दुसऱ्या टोकाची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं.

/घरगुती आवाजांच्या या दुनियेंत गायकीच्या सगळ्या प्रकारांचा अनुभव येतो! यांत रागीट शब्दांचा 'धृपद-धमार' असतो; कण्हण्याची 'नोमथोम्' असते; खोकल्याचा 'ख्याल' असतो; रुसण्याचीं 'गमकें' असतात. लाजलाडक्या 'हरकती' असतात; आणि कधीं कधीं लडिवाळपणें स्वर हालवणारी प्रेमळ शब्दांची 'ठुंबरी'हि असते!/

या घरगुती आवाजांच्या आधारानें मन हळूहळू गतकालाकडे खेचलें जातें. माझ्या लहानपणांतील घरगुती आवाजांचे प्रतिध्वनी अंतर्मनाच्या गाभाऱ्यांतून उमटूं लागतात! ते आवाज आजच्या आवाजांहून किती भिन्न असत मला वाटतें, या आवाजांतील भिन्नतेवरून कोकणांतील सामाजिक उत्क्रान्तीचा इतिहास लिहिणें सहज शक्य होईल. मी दहा-एक वर्षांचा असेन. जागें असूनहि पांघरुण घेऊन पडून राहण्याची सवय हल्लीं मला आहे तशी ती त्या वेळींहि होती. फरक एवढाच, कीं आतां मी सांगूनसवरून तसा पडतों, पण लहानपणीं गाढ झोपेचें सोंग घेऊन पडत असें! (या प्रांजळपणाचें श्रेय बदललेल्या परिस्थितीला आहे कीं माझ्या नैतिक विकासाला आहे हा वादाचा प्रश्न आहे!) त्या वेळीं मला जी प्रथम जाग येई ती आईच्या दळण्याच्या गंभीर घुंकारानें. कधीं कधीं कांडण्याचे 'कांड, कूट, खा' या चालीवरील लयबद्ध घावहि माझ्या पहाटेच्या स्वप्नांना हाकून लावीत.

नंतर थोड्या वेळानें आमच्या शेजारच्या विठूकाकांचें आवेशयुक्त तोंडधुणें ऐकायला मिळे. यानंतर लगेच (गोठा घराला लागून असल्यानें) मंगळ्या गाईच्या अधाशी खाण्यामुळें होणारी आंबवोणाच्या काथोटलीची धडपड व तपेलींत पडणाऱ्या दुधाच्या धारेची 'छुर्र्छुर्र्' कानावर पडे; क्वचित् गाईनें झाडलेली लाथ दादांनीं घातलेल्या अमोघ पण झुपकेदार शिवीमुळें सूचित होई. एकंदरींत वेळ निस्तब्ध असल्यानें पहाटेच्या दर्यांची खजोंतील मेहेनत व निरनिराळ्या दिशांतून उठणारे पक्षांचे वादीसंवादी स्वर ही पार्श्वभूमि या सर्वच आवाजांना एक विलक्षण उठाव देई. मात्र त्या वेळीं असें कांहीं बोलायची सोय नव्हती! मी मुद्दाम झोपेचें सोंग घेतों असें दादांना कळतें तर त्यांनीं मला अभ्यासाला निश्चित उठवलें असतें. उठलों नसतों तर पाठीवरील एका गंभीर आवाजाची भर या आवाजाच्या दुनियेंत अवश्य पडली असती!

यानंतर सकाळपासून संध्याकाळपर्यंत असे किती तरी आवाज दाखवितां येतील कीं जे माझ्या लहानपणीं मला ऐकूं येत, पण आज कानावर पडत नाहींत—जे पोंभुल्यांत होते, पण रत्नागिरींत नाहींत. विहिरीजवळच्या मोठ्या पाथरीवर आईनें 'हुश्श्' करीत घातलेले धुण्याचे दणदणीत घाव आज कोठें आहेत? काळ्या दगडावर अवजड सुत्कीनें दादांनीं 'ह्री' करीत दिलेले जबरदस्त दणके आज कोठें आहेत? ते राखण्यांचे कुकारे कुठें आहेत? तें आंडील पाड्यांचें बेगुमान डुरकणें कुठें आहे? त्या आरत्या कुठें आहेत? तीं भजनें कुठें आहेत? त्या देवळांतील घंटा कुठें आहेत? हल्लीं भजनें ऐकतों, पण तीं रेडिओवर! आणि घंटा पाहतों, पण त्या ऑफिसांत!

इतर दुनिया बदलल्यावर 'आवाजाची दुनिया' तरी तशीच कशी रहाणार? अजूनहि हें वर्तमानपत्र माझ्या हातांत आहे; अजूनहि 'आवाजाची दुनिया' हे लपेटीत लिहिलेले शब्द माझ्या डोळ्यांपुढें आहेत; पण माझ्या मनांतील 'आवाजाची दुनिया' यांत मावूं शकत नाहीं. या वेळीं तरी माझ्या मनांतील आवाजाच्या दुनियेंत जन्मल्याबरोबरची रड व मृत्यूपूर्वीची घरघर या दोन टोकांमधील सबंध जीवनाचा साक्षात्कार सामावलेला आहे.

साहित्य; फेब्रुवारी, १९५०

# खुर्च्यांनाहि मनें असतात

खरोखर खुर्च्यांनाहि मनें असतात. नाहीं तर मला तो विलक्षण अनुभव आला नसता. ज्या खुर्चींच्या पुढें बसून कॉलेजमधील सहा वर्षे मी व्याख्यानें ऐकण्यांत घालविलीं त्या खुर्चीवर बसून व्याख्यान देण्याचा प्रसंग आल्यावर सगळें चमत्कारिक, अनैसर्गिक व अमंगल वाटूं लागलें. ज्या खुर्चीवर डॉ. माधवराव पटवर्धनांसारखे परिणतप्रज्ञ प्रतिभावंत, प्राध्यापक फडक्यांसारखे लालित्याचे सम्राट, किंवा प्राचार्य खर्डेकरांसारखे सभ्यतेचे आदर्श बसत आणि बोलत, त्याच खुर्चीवर मी कोणत्या अधिकारानें बसावें? या खुर्चीच्या प्रतिष्ठेची माझ्या हातून कुचेष्टा तर होत नाहीं ना? सरस्वतीच्या या स्वगुणसिंहासनावर बसून आपल्या बेसूर पावरीची रानटी सुरावट ऐकविण्याचा अधिकार माझ्यासारख्या धनगराला कसा काय पोंचतो? असे एक ना अनेक विचार माझ्या मनांत घुटमळूं लागले; आणि क्षणभर असेंहि वाटलें कीं बँकोच्या भुतासारखें आपणाला अदृश्य होतां आलें असतें तर किती छान झालें असतें!

पण खुर्च्यांनाहि मनें असतात. त्यांच्यांत जिव्हाळा असतो; आपुलकी असते. त्या खुर्च्यांनाहि आपणापुढें बसलेले विद्यार्थी ओळखतात! या जुन्या खुर्च्यांमध्यें एक प्रकारची वात्सल्याची भावना असते. त्यांच्या प्रेमळ स्पर्शांत मनांतील काहूर शांत करण्याची शक्ति असते. एका हातानें त्या जबाबदारीची जाणीव करून देतात तर दुसऱ्या हातानें त्या गोंजारतात आणि प्रोत्साहन देतात. नाहीं तर मनाचा

इतका गोंधळ होऊनहि माझें व्याख्यान यशस्वी झालें नसतें. इतके दिवस जबाबदारीची जाणीव देणारी ती खुर्ची माझ्या विनम्र अंतःकरणाचा ठाव लागतांच आपल्या दोन्ही हातांनीं कवटाळीत असल्याचा भास मला झाला; आणि या जाणिवेनें माझ्या शब्दांना पंख फुटले.

भरताच्या अर्वाचीन इतिहासाचे दोन खंड पडतात : तक्क्यांचें युग आणि खुर्च्यांचें युग. खुर्च्यांच्या युगांत जन्माला आल्यामुळें आपण खुर्च्यांना अडखळत अडखळत आयुष्याचा एकेक टप्पा गाठीत असतों. जीवनाच्या प्रत्येक वळणावर एकेक खुर्ची उभी असते. आतां 'उभी असते' हा शब्दप्रयोग पुष्कळांना पटणार नाहीं! पण खुर्च्या उभ्या असतात कीं बसलेल्या असतात? आरामखुर्ची बसलेली किंबहुना पासली असते हें सांगायला तत्त्वज्ञाची जरूरी नाहीं. त्याचप्रमाणें मोठमोठ्या बँकांमधील करकोचाप्रमाणें मान उंचावून आपल्या भक्ष्याकडे लक्ष देणाऱ्या कारकुनी खुर्च्या या उभ्या असतात हें सांगणेंहि फार कठीण नाहीं. पण ज्या खुर्च्यांना आपण नेहमीं ठेचाळत असतों अशा मास्तरी अगर सरकारी खुर्च्या या बसलेल्या असतात कीं उभ्या असतात यांचा निर्णय लावणें हें कठीण काम आहे. त्यांचा स्वभाव कांहीं विचित्रच असतो; त्यांचे रंग सरड्याप्रमाणें बदलत असतात. मी विद्यार्थी असतांना एकच खुर्ची निरनिराळ्या अवस्थेंत पाहिलेली आहे: राज्यशास्त्राच्या व्याख्यानानंतर ती झोपलेली दिसे; संस्कृतच्या व्याख्यानानंतर ती बसलेली वाटे; तर इंग्रजीच्या व्याख्यानानंतर ती एकदम उभी असल्याचाहि भास होई. सरकारी खुर्च्यांचे अनुभव तर इतके निरनिराळे आहेत कीं, त्यांचा अंदाज बांधतां येणेंच अशक्य. पहिली गोष्ट म्हणजे त्या गोषांत असतात; मात्र त्या पडदानशीन असल्या तरी पतिव्रता असतातच असें नव्हे! शिवाय त्या झोपलेल्या असण्याचाहि संभव असतो; पण त्यांची झोप आतां पहिल्यापेक्षां पुष्कळ हलकी झाल्याचें ऐकिवांत आहे. चारआठ आण्यांचा खुर्दा खिशांत वाजवलात तरीसुद्धां त्या जाग्या होतात!

व्यक्ति तितक्या प्रकृति हा नियम खुर्च्यांनाहि लागू पडतो. प्रत्येक खुर्चीला स्वतःचें व्यक्तित्व असतें. कांहीं खुर्च्या स्वभावतःच बुभुक्षित असतात. मी कोल्हापूरला विद्यार्थी असतांना एका हॉटेलांत दररोज दुपारीं सिंगल चहा घेत असें (त्या वेळीं तो एका पैशाला मिळे); अशा वेळीं अर्ध्या कपाऐवजीं सबंध

कप घेण्याचा मोह कांहीं कांहीं वेळां अगदीं अनावर होई; आणि तो टाळण्यासाठीं समोरच्या कपाटांतील शिरा, पुरी, शंकरपाळे, चिवडा, वगैरे पदार्थांवर मी माझें लक्ष विकेंद्रित करण्याचा प्रयत्न करीत असें! हा समरप्रसंग ज्या काळ्या लोखंडी खुर्चीवर घडत असे ती लोखंडी खुर्ची मला नेहमीच बुभुक्षित दिसते; तिचें मन तिच्या शरिराप्रमाणेंच डळमळीत असतें; आणि तिच्या अंगांत एक विलक्षण लोचटपणा असतो! त्या हॉटेलापुढून मी कितीहि जलद गेलों तरी त्या खुर्चीला माझी चाहूल लागल्यावांचून रहात नाहीं; आपल्या मुक्या पण स्पष्ट भाषेंत ती मला माझ्या जुन्या एकेरी नांवानें हाक मारते; या सलगींतून सुटण्या-करतां जणूं आपण ऐकलेंच नाहीं असा आव आणून मी झटदिशीं पुढें सरकतों; आणि त्या भांबावलेल्या अवस्थेंतच माझा 'टाय' पुन्हा एकदां नीटनेटका करून 'छे! छे! तो मी नव्हे!' अशा ढंगांत स्वतःला फसविण्याचा प्रयत्न करतों... जगाला बनवणें तर अवघड असतेंच; पण स्वतःला बनविणें त्याहूनहि अवघड असतें. आणि या दोन्ही कलांत जो तरबेज बनतो तो...झेपवतो.

याचा अर्थ मी या बुभुक्षित खुर्च्यांना भितों असा नव्हे. आंतरिक स्नेह आणि पांढरपेशी प्रतिष्ठा या दोहोंचें एक चमत्कारिक मिश्रण त्या भावनेंत असतें. मी भितों त्या खुर्च्या निराळ्या आहेत! दंतवैद्याच्या मायावी खुर्चीची मला भीति वाटते; तिचा मऊपणा हा मानभावी असतो; त्या अस्वलानें केलेल्या गुदगुल्या असतात. खरोखर आपले दांत पाडणाऱ्या माणसाला मित्र समजणारा प्रत्येक पेशंट हा खिस्ताचा अवतार नव्हे काय? न्हाव्याच्या खुर्चीला मी एके काळीं फार भीत असें. पण आतां आमचे संबंध फार जिव्हाळ्याचे आहेत. विशेषतः स्वतःभोंवतींच प्रदक्षिणा घालणारें तिचें मन हें भावगीतात्मक रचना करणाऱ्या कविमनाला फार जवळचें आहे. शिवाय न्हाव्याची खुर्ची म्हणजे स्त्रीत्वाचा आदर्श! ती नेहमींच आरशांत डोकावत असते. पहिल्या भेटीच्या वेळीं आपण थोडे भांबावतों; थोडी भितीहि वाटते. पण शेवटीं कुतूहलाची शक्तीच परिणामकारक ठरते! आणि एकदां का दिलजमाई झाली कीं मग सगळा आनंद असतो...पण संसारांत येणारे अनुभव इतके परस्परविरुद्ध असतात कीं प्रत्येकानें आपला अनुभव हा अपवाद समजावा हेंच चांगलें! स्वतः असामान्य बनण्याचा हा अगदीं सोपा मार्ग आहे.

खुर्च्यांना विनोदाचें अंग नसावें असा माझा समज होता; पण तो शेवटीं

चुकीचा ठरला. आमच्या घरासमोर नुकताच ‘सर्वोदय’ नांवाचा एक बंगला एका गुजराथ्यानें बांधला आहे. हा गुजराथी रोज संध्याकाळीं अर्धा तास आपल्या प्रशस्त गच्चीमध्यें एका वाटोळ्या खुर्चीवर डुलत बसलेला तुम्हांला दिसेल. थोडा परिचय झाल्यावर आमच्या गच्चींतून मी त्याला विचारलें, “शेठजी, असें रोज डुलत बसण्यांत तुम्हांला कंटाळा कसा नाहीं येत?” आपली डुलकी न थांबवतां शेटजींनीं सांगितलें, “अरे बाबा, ये तो आमचा व्यायाम हाय.” व्यायामाच्या ह्या अभिनव प्रकाराबद्दल आश्चर्य करीत मी उभा राहिलों; शेटजी उठले आणि बंगल्यांत गेले; पण ती खुर्ची! ती दोन मिनिटें तशीच डुलत राहिली; आणि ती त्या शेटजीला वेडावीत असावी असा विचार माझ्या मनांत आल्याबरोबर मी खुळ्यासारखा हसत सुटलों. खुर्च्यासुद्धां इतक्या वात्रट असतील अशी माझी कल्पना नव्हती!

साहित्य; सप्टेंबर, १९५१

# खोडलेले शब्द

खोडलेले शब्द हे न खोडलेल्या शब्दांपेक्षां अधिक बोलके असतात. शब्दांच्या या विशिष्ट बोलकेपणाची जाणीव मला तर लहानपणापासूनच असावी. त्यामुळें जोडाक्षरें वाचण्यापूर्वीच खोडलेले शब्द वाचण्याची खोडी मला लागली असें म्हटलें तरी चालेल. खोडलेल्या शब्दांची मानसशास्त्रीय मीमांसा वाचल्यानंतर या खोडीचें रूपांतर व्यसनांत झालें आणि नीतिशास्त्राच्या अभ्यासानेंहि तें सुटण्याचें चिन्ह दिसत नाहीं! पत्रें असोत अगर प्रबंध असो, जेव्हां जेव्हां एकादें हस्तलिखित माझ्या हातांत सांपडतें तेव्हां तेव्हां माझें लक्ष प्रथमतः आडव्या रेघेची समशेर पोटांत खुपसून गतप्राण केलेल्या त्या अभागी अर्भकांकडे जातें. शब्द खोडणें हा एक भ्रूणहत्येचाच प्रकार आहे; प्रतिभेनें पुढें केलेलें बालक नाकारून 'हें माझें नव्हे' म्हणण्याची विश्वामित्री लेखकांना शोभत नाहीं! शेक्सपिअर लिहिलेला शब्द बहुधा खोडत नसे याचें कारण त्याचें थोर वात्सल्य हेंच असावें.

झाकलेली मूठ सव्वा लाखाची असली तर खोडलेला शब्द दीड लाखाचा असतो. खोडलेल्या शब्दांची विकृत कुतूहलाला आवाहन करण्याची शक्ति फार भयंकर असते. खोडलेले शब्द आपण वाचूं नये अशी लेखकाची इच्छा असते; आणि म्हणूनच ते वाचण्याचा मोह फार अनावर असतो. शेजारच्या बिऱ्हाडानें दारें लावलीं कीं आपलें मन खिडकींतून आंत शिरतें!...हें वाक्य मी लिहितों

आहे तोंच पलीकडच्या बिऱ्हाडानें आपल्या खिडक्या लावून घेतल्या आहेत. त्यांच्या आवाजानें माझें लक्ष तिकडे वेधलें आहे. मनांत निरनिराळे तर्क सुरू आहेत. कदाचित् आजोबांना वामकुक्षी करावयाची असेल; कदाचित् ऑम्लेटचा वास शेजारीं जाऊं नये याची ती तजवीज असेल; कदाचित् गोवा लॉटरीच्या बक्षिसाची रकम मोजली जात असेल (या कुटुंबाला गेल्या वर्षी एक बक्षिस मिळालें होतें; आणि तेव्हांपासून लॉटऱ्यांविषयीं माझ्या मनांत एक चमत्कारिक अढी निर्माण झाली आहे!); कदाचित् कुठें चहाला जाण्यापूर्वी डोळ्यांना झोंबणारें झिरझिरीत पातळ नेसलें जात असेल! काय चाललें असेल कोणी सांगावें? पण माझ्या मनाची खिडकींतून आंत डोकावण्याची चुळबूळ फार तीव्र आहे एवढी गोष्ट खरी...शिष्टाचार जें नको म्हणतो तें करण्याची इच्छा हटकून होते. वस्तुतः खोडलेले शब्द वाचणें म्हणजे खिडकींतून आंत डोकावण्यासारखेंच आहे; इथेंहि अपेक्षाभंग होण्याची जबरदस्त शंका असते. आणि खोडलेले शब्द वाचूं इच्छिणाऱ्या प्रत्येक माणसानें मनुष्यस्वभावाचें अनपेक्षित चित्र पाहण्याची तयारी ठेवावी लागते...शेजारच्या खिडक्या पुन्हा उघडल्या आहेत आणि काशी मोलकरीण हातांत झाडू घेऊन खोली झाडतांना दिसत आहे! पुष्कळदां खोडलेल्या शब्दांत डोकावूं लागलें कीं असेंच काहीं दिसूं लागतें. पण प्रत्येक व्यसनाला कांहीं तरी किंमत द्यावी लागतेच!

खोडलेले शब्द वाचण्यांत प्रथमतः कुतूहलाचाच जोर होता ही गोष्ट मी एकदम कबूल करतों; पण आताची माझी भूमिका थोडी निराळी आहे. विकृत कुतूहलांतून ती सर्वस्वी विमुक्त झालेली आहे असें मुळींच नाहीं; मात्र बऱ्याच प्रमाणांत ती भूमिका सत्यशोधकाची आहे. कारण खोडलेले शब्द म्हणजे आत्म्याच्या पाउलवाटा...सुप्त मनाच्या डाव्या आंगठ्याचे ठसे...आणि म्हणूनच कालिदासापासून मर्ढेकरांपर्यंत निरनिराळ्या कवींनीं खोडलेले शब्द वाचण्याची असीम ओढ मला पुष्कळदां लागते. खरोखर टिळकांसारख्या देशभक्तांचे किंवा गांधीजींसारख्या महात्म्यांचे खोडलेले शब्द वाचणें म्हणजे त्यांच्या नकळत त्यांच्या खाजगी खोलींत प्रवेश करण्यासारखेंच आहे; तरीसुद्धां तो मोह माझ्यासारख्या व्यसनी माणसाला आवरतां येणें कठीण आहे. मोठ्या माणसांच्या चरित्रलेखकांनीं "खोडलेल्या शब्दांतील गांधीजी" अगर "खोडलेल्या शब्दांतील डॉ. जॉन्सन" अशा पुरवण्या आपापल्या चरित्रांना

अवश्य जोडाव्या. सत्यसंशोधनाच्या दृष्टीनें हें लिखाण फार अमोल ठरण्याचा संभव आहे.

डॉक्टर जॉन्सनच्या नांवावरून एका प्रसंगाची आठवण होते. डॉक्टर जॉन्सन एका नाटकाविषयीं मत देतांना सहज बोलून गेला, "It has no wit to keep it sweet." पण दुसऱ्याच क्षणाला त्याला आपल्या प्रचंड पांडित्याची व वाङ्मयीन दराऱ्याची आठवण झाली आणि जणूं काय पहिले शब्द खोडण्याच्या आविर्भावांत तो उद्गारला, "It has no vitality to preserve it from putrefaction." खोडलेले शब्द वाचण्यांत दर्दी असलेल्या कोणाहि माणसाला या प्रसंगाच्या द्वारें त्याच्या अवजड भाषाशैलीचें पृथक्करण करणें फारसें कठीण जाऊं नये. एका लाचखाऊ प्रधानाविषयीं ओढूनताणून प्रासंगिक भाषण करतांना "He can 'save' the nation" च्या ऐवजीं "He can 'sell' the nation" असें चुकून बोललें गेलें तेंहि अगदींच अर्थहीन नव्हतें. अशा चुका लगेच दुरुस्त केल्या जातात व मोठ्या खिलाडू वृत्तीनें ती दुरुस्ती स्वीकारलीहि जाते; पण सुप्त मनानें जागृत मनाशीं खेळलेला हा लपंडाव खोडलेले शब्द वाचणाऱ्याच्या लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं!

पण सगळेच खोडलेले शब्द हे खऱ्या अर्थानें 'खोडलेले' असतात असें समजण्याचा भोळेपणा कोणीहि करूं नये. या खोडाखोडींतहि कारस्थान असण्याचा संभव असतो. आपल्या मामुली पत्रव्यवहारांतून हळूहळू प्रेमाची अभिव्यक्ति कशी साधावी हा माझ्या एका मित्रापुढें मोठा पेंच होता. स्वभावतः लाजाळू असल्यामुळें एकदम अचूक शब्दयोजना करण्याचें धैर्य त्याच्याजवळ नव्हतें; तेव्हां त्यानें शब्द खोडण्याच्या तंत्राचा चांगलाच उपयोग केला. तो प्रथम 'प्रिय' एवढें लिही; पण 'य' अक्षर काढून होण्यापूर्वींच तो शब्द खोडून 'चिरंजीव', 'कुमारी' अशी कांहीं तरी सुरवात करी! खोडलेला शब्द पचूं लागल्यावर पुढें 'प्रिय' व शेवटीं 'प्रियतमे' इतका पल्ला तो गाठूं लागला. ही शब्द खोडण्याची कल्पना त्याला योग्य वेळीं सुचली नसती तर त्याचें प्रेम आजन्म मुकेंच राहिलें असतें. पण याच दुटप्पी दोस्ताचें परवां मला एक पत्र आलें; त्याच्यांत या पूर्वपरिचित तंत्राचा प्रयोग माझ्यावरच केलेला आहे! महत्त्वाची खोडाखोड पुढीलप्रमाणें :



हें पत्र मिळाल्यापासून खोडलेले शब्द वाचण्याची माझी हौस बरीच कमी झाली आहे. खोडलेल्या शब्दांतहि सच्चे आणि लुच्चे, प्रांजळ आणि पागल अशा जाती आहेतच ! आणि/मी जेव्हां 'खोडलेल्या' शब्दांना आत्म्याच्या पाउल-वाटेची उपमा देतों त्या वेळीं माझ्या मनापुढें सच्चे आणि प्रांजळ शब्द तेवढेच असतात. )

सत्यकथा; ऑक्टोबर, १९५७

नाकारण्याचें धैर्य संपादकाजवळ नसतें! दोघांचीहि प्रतिकारशक्ति पार खची झालेली असते.

हा विकार लेखकापुरताच मर्यादित राहिलेला नाहीं. आपल्या सर्वच समाजांतील 'नाहीं' म्हणण्याची शक्ति फार मोठ्या प्रमाणांत नष्ट झाली आहे असें म्हणावें लागेल. प्राथमिक शिक्षकापासून पंतप्रधानापर्यंत—म्हणजे समाजाच्या खालच्या टोकापासून वरच्या टोकापर्यंत—सर्व प्रकारच्या लोकांना 'नाहीं' म्हणण्याची जबरदस्त भीति वाटते. प्राथमिक शिक्षक पाटलाला भितो तर पंतप्रधान दुसऱ्या कोणाला भितो. कोणी अधिकाऱ्यापुढें नांगी टाकतो, तर कोणाला भांडवलदारांची भीड पडते! मग नापास झालेलीं पोरें वरच्या वर्गांत चढूं शकतात; कोणत्याहि कामाला नालायक ठरलेले लाळघोटे प्रतिष्ठित अधिकारी बनूं लागतात; आणि देशी बाजारांत न खपणारा माल परदेशी अड्ड्यावर नव्या शिक्क्याखालीं उतरला जातो! मध्येंच एखादा असंतुष्ट आत्मा डोक्यांत राख घालून त्रागा केल्याचें सोंग आणतो; पण त्या त्राग्यांतील विदूषकी ढंग फार वेळ लपत नाहीं. सात्त्विक संतापाचा हा नाटकी आविर्भावसुद्धां भीतिग्रस्त असण्याचा संभव असतो. कोणता मोठा हत्ती कोणत्या बारक्या मुंगीला भीत असेल कोणी सांगावें?

'नाहीं' म्हणण्याच्या शक्तीचा ऱ्हास हें आपल्या सामाजिक व राजकीय जीवनांतील खरें वैगुण्य आहे. लांचलुचपत किंवा वशिलेबाजी हीं ह्या विकाराचीं बाह्य लक्षणें आहेत. परवांच मी काविळीसंबंधीं कांहीं माहिती वाचीत होतों. ही माहिती वाचीपर्यंत कावीळ हा विकार नसून तें एक फक्त बाह्य लक्षण आहे ही गोष्ट मला बिलकुल माहिती नव्हती. काविळीला मूळ विकार मानण्यांत किंवा लांचलुचपतीला मूळ राष्ट्रीय विकृति समजण्यांत घडणारी चूक सारखीच सार्वत्रिक आहे. बाह्य लक्षणालाच विकार मानल्यानें आपल्या या रोगावर परिणामकारक उपाययोजना अजूनहि झालेली नाहीं. राष्ट्रांत वशिलेबाजी बोकाळली आहे. या बाबतींत सर्व राष्ट्रपुरुषांचें एकमत आहे! लांचलुचपतीला आळा घालणें आवश्यक आहे, असा सर्व सरकारी अधिकारी आक्रोश करीत आहेत! लांच देणारे तर ती देऊं नये या मताचे आहेतच; पण लाच घेणारेदेखील ती घेणें अप्रामाणिकपणाचें आहे असें प्रामाणिकपणें सांगत आहेत! थोडक्यांत म्हणजे आपल्या वैचारिक प्रचाराचें कार्य अगदीं सोळा आणे झालें आहे. पण इतक्या सर्व गोष्टी

# 'नाहीं' म्हणण्याची शक्ति

'नाहीं' म्हणण्याची शक्ति अंगांत असती तर हा निबंध मीं कशाला लिहिला असता? आणि 'नाहीं' म्हणण्याची शक्ति संपादकाच्या अंगांत असती, तर हा छापला तरी कशाला गेला असता? दिवाळी अंकाची साथ सुरू होतांच 'नाहीं' म्हणण्याची शक्ति नाहींशी होऊं लागते; आणि लेखकांच्या किंवा संपादकांच्या विनयी स्वभावामुळें बहुप्रसव स्त्रीच्या नशिबीं येणारीं बहुतेक दुःखें प्रतिभेला भोगावीं लागतात. ऐन दिवाळीच्या दिवसांत प्रतिभेला मात्र अंधाऱ्या खोलींत पडून राहावें लागतें. सगळ्यांना आनंदी ठेवण्याच्या विचारानें तिचा जीव बेजार होतो.

तिच्या अपत्यांची संख्या वाढत जाते, पण तीं सगळींच गुटगुटीत होऊन जन्मलेलीं दिसतात! जुन्या भांड्यांची ही नवी आदळआपट संपली नाहीं तोंच नवी दिवाळी आणि नवीं दुःखें तिच्या डोळ्यांसमोर दिसूं लागतात. आतां प्रतिभेच्या या विटंबनेला नेहमी तिचा विनयच जबाबदार असतो असें मात्र नाही; क्वचित् अहंकार असतो, क्वचित् प्रदर्शनप्रियता असते, क्वचित् प्रसिद्धीची हाव असते; क्वचित्—पण फारच क्वचित्—आर्थिक ओढघस्तहि असते! मात्र सर्वांत प्रभावी कारण प्रतिभेच्या अंगांत 'नाहीं' म्हणण्याची शक्ति नसते हेंच होय. संपादकानें आग्रह केला कीं 'नाहीं' म्हणण्याचें साहस लेखकाला करवत नाही आणि प्रथितयश लेखकाकडून मुद्दाम मागवून घेतलेलें लिखाण

नाकारण्याचें धैर्य संपादकाजवळ नसतें! दोघांचीहि प्रतिकारशक्ति पार खची झालेली असते.

हा विकार लेखकापुरताच मर्यादित राहिलेला नाहीं. आपल्या सर्वच समाजांतील ‘नाहीं’ म्हणण्याची शक्ति फार मोठ्या प्रमाणांत नष्ट झाली आहे असें म्हणावें लागेल. प्राथमिक शिक्षकापासून पंतप्रधानापर्यंत—म्हणजे समाजाच्या खालच्या टोकापासून वरच्या टोकापर्यंत—सर्व प्रकारच्या लोकांना ‘नाहीं’ म्हणण्याची जबरदस्त भीति वाटते. प्राथमिक शिक्षक पाटलाला भितो तर पंतप्रधान दुसऱ्या कोणाला भितो. कोणी अधिकाऱ्यापुढें नांगी टाकतो, तर कोणाला भांडवलदारांची भीड पडते! मग नापास झालेलीं पोरें वरच्या वर्गांत चढूं शकतात; कोणत्याहि कामाला नालायक ठरलेले लाळघोटे प्रतिष्ठित अधिकारी बनूं लागतात; आणि देशी बाजारांत न खपणारा माल परदेशी अड्ड्यावर नव्या शिक्क्याखालीं उतरला जातो! मध्येंच एखादा असंतुष्ट आत्मा डोक्यांत राख घालून त्रागा केल्याचें सोंग आणतो; पण त्या त्राग्यांतील विदूषकी ढंग फार वेळ लपत नाहीं. सात्त्विक संतापाचा हा नाटकी आविर्भावसुद्धां भीतिग्रस्त असण्याचा संभव असतो. कोणता मोठा हत्ती कोणत्या बारक्या मुंगीला भीत असेल कोणी सांगावें?

‘नाहीं’ म्हणण्याच्या शक्तीचा ऱ्हास हें आपल्या सामाजिक व राजकीय जीवनांतील खरें वैगुण्य आहे. लांचलुचपत किंवा वशिलेबाजी हीं ह्या विकाराचीं बाह्य लक्षणें आहेत. परवांच मी काविळीसंबंधीं कांहीं माहिती वाचीत होतों. ही माहिती वाचीपर्यंत कावीळ हा विकार नसून तें एक फक्त बाह्य लक्षण आहे ही गोष्ट मला बिलकुल माहिती नव्हती. काविळीला मूळ विकार मानण्यांत किंवा लांचलुचपतीला मूळ राष्ट्रीय विकृति समजण्यांत घडणारी चूक सारखीच सार्वत्रिक आहे. बाह्य लक्षणालाच विकार मानल्यानें आपल्या या रोगावर परिणामकारक उपाययोजना अजूनहि झालेली नाहीं. राष्ट्रांत वशिलेबाजी बोकाळली आहे. या बाबतींत सर्व राष्ट्रपुरुषांचें एकमत आहे! लांचलुचपतीला आळा घालणें आवश्यक आहे, असा सर्व सरकारी अधिकारी आक्रोश करीत आहेत! लांच देणारे तर ती देऊं नये या मताचे आहेतच; पण लाच घेणारेदेखील ती घेणें अप्रामाणिकपणाचें आहे असें प्रामाणिकपणें सांगत आहेत! थोडक्यांत म्हणजे आपल्या वैचारिक प्रचाराचें कार्य अगदीं सोळा आणे झालें आहे. पण इतक्या सर्व गोष्टी

अनुकूल असूनहि आचार बदलण्याचें चिन्ह कां दिसूं नये? आपल्या राष्ट्राचीं महान् आध्यात्मिक मूल्यें, महात्माजींच्या नांवाचा अखंड जप, सर्वांगाला पवित्र करणाऱ्या 'सत्यमेव जयते'च्या मुद्रा आणि सर्वोदयाची नैष्ठिक उपासना या सर्व मंत्रतंत्रांतून एवढी सिद्धि प्राप्त होऊं नये हें आश्चर्य नव्हे काय?

पण आश्चर्यच करावयाचें झालें, तर याहूनहि चमत्कारिक घटना आपल्या आसपास पुष्कळ सांपडतील. 'नाहीं' म्हणण्याची शक्ति जवळ नसल्यानें एखादी घोरपड गळ्यांत पडलेले नवरे काय थोडे असतील? 'नाहीं' म्हणण्याची शक्ति क्षीण झाल्यानें उधारी व गिऱ्हाइकें हीं दोन्ही वाढत जाऊन त्याचें पर्यवसान दिवाळ्यांत झाल्याचीं उदाहरणें काय कमी आहेत? मराठी वाङ्मयांत अभिजात कलाकृतींची अगर संशोधक साहित्याची भर घालूं शकणारे कांहीं लेखक अध्यक्ष-पदांचीं घाऊक व किरकोळ कंत्राटें घेतांना दृष्टीस पडतात तें तरी कशामुळें? ज्या प्रमाणांत त्यांची प्रतिष्ठा व प्रसिद्धि वाढत जाते त्या प्रमाणांत त्यांची 'नाहीं' म्हणण्याची प्रतिकारात्मक शक्ति नष्ट होत जाते असेंच म्हटलें पाहिजे.

या प्रतिभावंतांची ही दुर्दशा पाहिली कीं पुष्कळ श्रेष्ठ कलावंत माणूसघाणे, अहंमन्य, तऱ्हेवाईक, हेकट, किंबहुना अर्धवट रानटी कां असतात याचा उलगडा होतो; वस्तुतः हे स्वभावविशेष म्हणजे त्यांचीं संरक्षक साधनें असतात! कलेच्या विलासाचें आणि विकासाचें सामाजिक कुतूहलापासून संरक्षण करणारें हें काटेरी कुंपण शेवटीं समाजाच्या हिताचेंच ठरल्याचीं उदाहरणें कांहीं कमी नाहींत. इतिहासाचार्य राजवाड्यांच्या सर्व संशोधनांचें श्रेय माडीवर गेल्यानंतर शिडी काढून घेण्याच्या कल्पनेला आहे! त्यांच्या तोडीचें संशोधनकार्य आमच्या-सारख्या जिन्यांच्या चाळींत राहणाऱ्या लेखकांच्या हातून झालें नाहीं, तर त्याची जबाबदारी आजकालच्या अचल आणि अवजड जिन्यावर आहे हें विसरतां कामा नये!

'नाहीं' म्हणण्याच्या शक्तीची सार्वत्रिक उणीव निराशाजनक आहे हें खरेंच; पण त्यामध्यें अनैसर्गिक कांहींच नाहीं. बोलूनचालून हिंदुस्थान हा तुटीचा देश आहे! सामान्य माणसाच्या दृष्टीनें हें उणीवांचें राज्य आहे. येथें अन्नाची उणीव आहे, कपड्याची उणीव आहे, आसऱ्याची उणीव आहे. या सर्व प्राथमिक उणीवांची

दखल न घेणारें सरकार या नव्या उणीवेवर कांहीं इलाज करूं शकेल असें समजणें धोक्याचें होईल. शिवाय जनतेच्या इच्छेला 'नाहीं' म्हणण्याची शक्ति जोंपर्यंत सरकारजवळ आहे तोंपर्यंत हा विकार सार्वत्रिक आहे ही गोष्ट सरकारला पटणारहि नाहीं.

पण तरीहि मी निराश नाहीं. कारण, माझ्या आशेचें उगमस्थान नाजुक असलें तरी निश्चित आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांची 'नाहीं' म्हणण्याची शक्ति मुळांतच फार दांडगी आहे! आपल्या स्त्रियांची 'नाहीं' म्हणण्याची शक्ति दिवसेंदिवस वाढते आहे; आणि त्या शक्तीचा सध्यां होत असलेला नाजुक गुलाबी आविष्कार पुढेंमागें आपल्या सामाजिक व राजकीय जीवनांत अगदीं निराळ्या स्वरूपांत प्रकट झाल्यावांचून राहणार नाहीं. स्त्रियांच्या हातांत सत्ता गेली तर एवढा तरी इष्ट परिणाम निश्चित घडून येईल! 'नाहीं' म्हणण्याच्या त्यांच्या सहजप्रेरणेमुळें लांचलुचपतीला व वशिलेबाजीला थोडा तरी आळा निश्चित बसेल! 'नाहीं-स्वरूप' जनतेचें राज्य येईल तेव्हां येवो; पण तोंपर्यंत तरी हा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. कारण सध्यां तरी नाहीं म्हणण्याची शक्ति हीच माणुसकीची खरी कसोटी आहे. म्हणून मागायचें असलें तर एवढेंच मागा, "हे परमेश्वरा! 'नाहीं' म्हणण्याची शक्ति दे!"

मनोहर; ऑक्टोबर, १९५१

# पहांटेचा कैफ

मी स्वभावतः सूर्यवंशी आहें. समोरच्या खिडकींतून येणारे किरण माझ्या डोळ्यांना गुदगुल्या करूं लागल्याशिवाय आपण होऊन डोळे उघडल्याचें मला सहसा आठवत नाहीं. सूर्यानें आपलें दर्शन घेतल्याशिवाय आपण सूर्यदर्शन घ्यावयाचें नाहीं असा माझा बाणा आहे. घरांतल्या माणसांचे दोनचार कामधंदे संपून तीं चहाचा दुसरा हप्ता करीपर्यंत माझ्या अकाळविकाळ तोंड धुण्यानें घरांतील शांततेचा भंग करणें मला आवडत नाहीं. शिवाय अंधश्रद्ध समाजांत लवकर उठणें थोडें धोक्याचें असतें. माझेंच तोंड प्रथम पाहिल्यानें कोणाला अपयश येणार नाहीं याचीहि दक्षता मला घ्यावीशी वाटते.

पण दोनचार महिन्यांनीं एखादे दिवशीं अचानक पहांटे उठण्याची मला झटक येते. सटींसामासीं पहांटे उठणाऱ्या माझ्यासारख्या सूर्यवंशी माणसाची मनःस्थिति त्या दिवशीं थोडी चमत्कारिक असते. आपण आज पहांटे उठलों आहों या एकाच जाणिवेनें सगळें विश्व उजळलें जातें. तो दिवस आपल्याप्रमाणें इतरांनाहि कांहीं तरी निराळा वाटत असावा असा भास होऊं लागतो. आजचा सूर्य थोडा मोठा असावा, आजचें आकाश अधिक उंच असावें, अशा चमत्कारिक कल्पना थगारून जातात. त्या दिवशीं मला तरी माझ्यानंतर उठणारे सर्व लोक क्षुद्र पापात्मे वाटतात; आणि माझ्याच सद्गुणामुळें माझा आत्मा थोडा गुदमरूं

लागतो. आपण पहांटे उठलों आहों या एकाच गोष्टीमुळें माझ्या आत्मविश्वासाला नवें बाळसें येतें आणि कोणतेंहि कार्य आपल्यापलीकडचें आहे असें वाटेनासें होतें. त्या दिवशीं नेपोलिअन आणि लेनिन, किंवा न्यूटन आणि आइन्स्टीन हींसुद्धां सामान्य माणसेंच असावींत ही गोष्ट पटूं शकते. इतरांपेक्षां आपला नैतिक दर्जा कांहीं वरचा आहे या एकाच जाणिवेमुळें आपल्या परिचयाचीं इतर माणसें आहेत त्याहून अधिक टेंगू वाटतात आणि स्वतःची उंची या एका दिवसांत निदान एक इंच तरी वाढली असावी असें भासूं लागतें.

थोडक्यांत म्हणजे मला पहांटेचा कैफ चढतो. हा कैफ चांगलेपणाचा असतो ही गोष्ट खरी; पण तरीसुद्धां त्यानें आत्मविस्मृति निश्चित घडते. कारण कैफाला नीति नसली तरी नीतीला कैफ असूं शकतो. हा कैफ चढूं लागला म्हणजे माझ्या आवाजांत कधीं न सांपडणारा गंभीर संथपणा दिसूं लागतो. वृत्तीमध्यें ऋजुता रुजूं लागते. इतरेजनांबद्दल तिरस्कारयुक्त दयेची भावना निर्माण होते. किंबहुना, कालचा 'मी' तोच आजचा 'मी' ही गोष्ट गृहीत धरणें मला हळूहळू कठीण वाटूं लागतें. कालचा 'मी' हा जीवनाच्या भाऊगर्दींत अगदीं हातघाईवर आलेला एक अगतिक जंतु असतो; आजचा 'मी' हा असल्या क्षुद्र जंतूंना तत्त्वज्ञानाच्या तरफेनें एका उच्च वातावरणांत चढवणारा गंभीर प्रेषित असतो.

हा पहांटे उठण्याचा कैफ मोठा आशावादी आहे. रोजच्या रामरगाड्यांत आयुष्याचीं अनेक सुखस्वप्नें चिरडून जात असतात; व्यवहारांतील प्रत्येक ठेचेगणिक आपल्या मनोराज्यांतील एकेक इमला कोसळत असतो. पण या पहांटेच्या कैफांत अशक्य असें कांहींच वाटत नाहीं. मी पहांटे उठलों कीं आमची सर्व मंडळी जरा खुषींत असतात. त्या दिवशीं 'नाहीं' हा शब्द मी वापरणार नाहीं. सौभाग्यवतीनें रेडिओ घेण्याची कल्पना सुचवली तर नेहमींप्रमाणें "सतत भुंकणारें कुत्रें मला पाळावयाचें नाहीं" असें उत्तर न देतां मी फक्त "बघूं या" म्हणतों; आणि तेंहि अशा खुबीनें कीं या 'बघूं या'मध्यें 'निश्चित् घेणार' असा अर्थ अभिप्रेत वाटावा. मुलांनीं मोटार मागितली (अर्थात् खेळांतली) तर "थांब, तुला खरीखुरी सायकलच घेऊन देतों" इतकें भरघोस आश्वासन माझ्या तोंडून आपोआप निघून जातें. अशा वेळीं माझे स्वतःचे हट्ट पुरविण्याचा संकल्प करायलाहि मी मागेंपुढें पाहत नाहीं. माझ्या काल्पनिक वाचनालयाला नवी

व्हेरिऑरम् शेक्सपिअरची जोड मिळते; ॲरिस्टॉटलच्या काव्यशास्त्रावर प्रबंध लिहिण्यासाठीं माझ्या टेबलावर संदर्भग्रंथांचा एक मोठा ढीग दिसूं लागतो; एवढेंच काय, माझ्या आगामी 'मृद्गंधा'ला प्रकाशक मिळण्याचें अशक्य स्वप्नदेखील अगदीं संभवनीय वाटूं लागतें. पुष्कळ अतृप्त इच्छा या अंधुक प्रकाशांत माझ्या आत्म्याशीं लपंडाव खेळूं लागतात. 'जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें' तें करण्याची इच्छा बळावूं लागते अशा वेळीं मी नवे नवे निश्चय करतों; धाडसी निर्णय घेतों; आणि आयुष्याची मालगाडी पंजाब मेलच्या वेगानें पळविण्याची उमेद बाळगतों.

हा कैफ निव्वळ चिंतनशील असतो अशी कल्पना केल्यास ती चुकीची ठरेल. पहांटे उठणारा मनुष्य कधींहि स्वस्थ बसत नाहीं. प्रथम वाचण्याचा आणि नंतर फिरण्याचा कार्यक्रम केल्यावांचून त्याला समाधान वाटत नाहीं. पहांटे उठणें, वाचणें आणि फिरणें या तिन्ही गोष्टींचा परस्पर संबंध अगदीं अपरिहार्य आणि पुरातन आहे. पहांटे उठण्याच्या सद्गुणावर जीं निरनिराळीं प्रवचनें मीं ऐकलीं आहेत त्यामध्यें या तिन्ही गोष्टींचा अंतर्भाव अवश्य केलेला असे. फक्त महत्त्वनिर्देश तेवढा निरनिराळा असायचा. पालकांच्या प्रचारामध्यें पहांटे उठण्याचा संबंध विशेषतः फिरण्याशीं असे; तर शिक्षकांच्या उपदेशामध्यें पहांट म्हणजेच पाठांतर हें समीकरण ठसविलें जाई. अर्थात् या दोन्ही दृष्टिकोनांचा समन्वय करण्याचा प्रयत्न प्रत्येक सत्प्रवृत्त मनुष्य करीत असतो. पहांटे उठल्यावर मी प्रथम पुस्तकाला शरण जातों. हळूहळू माझी तन्मयता वाढूं लागते; मान विनम्र होते आणि शेवटीं या भक्तिभावाचें रूपांतर पुस्तकाच्या पायावर डोकें ठेवण्यांत होतें. ग्रंथकाराच्या प्रगाढ पांडित्याविषयींची आदराची भावना या शरणागतीनें जशी व्यक्त होते तशी ती दुसऱ्या कशानेंच होत नाहीं. एखाद्या थिल्लर कादंबरीचा रसास्वाद घेण्यापेक्षां असल्या बौद्धिक पराभवानेंहि सज्जन माणसाला अधिक समाधान लाभतें. उच्च ध्येयवादाचा आनंद कांहीं अपूर्व असतो यांत संशय नाहीं !

"What I aspired to be
And was not, comforts me."

सूर्योदयापूर्वी फिरायला जाण्यांत कांहीं विशिष्ट फायदे असतात ही गोष्ट मी

एकदम कबूल करतों. निदान खेडेवजा शहरांत तरी संध्याकाळचें फिरणें फार धोक्याचें असतें. वातावरणांत पसरलेल्या धुळीमुळें मन प्रसन्न होण्याऐवजीं अधिक उद्विग्न होण्याचीच शक्यता असते. दिवस जसजसा वाढत जातो तसतसें जीवन भकास व उदास, वेडौल व बाजारी वाटूं लागतें. आपण सात्त्विक अंतः-करणानें देवदर्शनाला निघालों असलों तरी महारोग्याची भेसूर अगतिकता पाहिली कीं आपला विश्वास देवाऐवजीं सैतानावर जास्त बसूं लागतो. पण पहांटे फिर-ण्याची गोष्ट निराळी आहे. या वेळच्या अंधुक प्रकाशांत रस्त्यावरचे अनावश्यक खंदक दिसत नसल्यामुळें आपल्या राज्यकर्त्यांविषयीं आपल्या मनांत अनादर निर्माण होत नाहीं. रस्त्याच्या दोन्ही तीरांवरील सामाजिक संस्कार अजून व्हाव-याचे असल्यामुळें आपल्या संस्कृतीविषयींचें आपलें कागदी गौडबंगाल कायम रहातें. क्वचित् कोठें कामावर जाणाऱ्या शेतमजुराची कृश आकृति दिसलीच तरी त्याच्या अंगावरील फाटकें कुडतें स्पष्ट न दिसल्यानें ग्रामीण जीवनांतील 'रायबा' आणि 'मंजुळा' यांचीं काव्यात्म चित्रें शाबूत रहतात. हा काळ श्रद्धेला फार अनुकूल असतो. आपल्या प्राचीन आणि अर्वाचीन कवींचें तें 'हंबरणें', तो 'घंटानाद', ते 'दवबिंदू', त्या 'वृक्षलता', तो 'द्विजगण', तो 'मंदानिल' ही सर्व मंडळी या वेळीं आपल्याला भेटूं शकतात! अशा वेळीं पिकलेल्या गवताचीं खुरटलेलीं मुळेंसुद्धां हिरवळीप्रमाणें हिरवींगार दिसतात; आणि शांत, स्वयंतुष्ट व प्रसन्न अंतःकरणानें आपण परत फिरतों. सारांश, या पहांटवाऱ्यानें आपला कैफ कमी न होतां थोडा अधिकच चढतो.

नेहमीं पहांटे उठणाऱ्या माणसालासुद्धां हा कैफ थोडा तरी चढत असावा अशी माझी कल्पना आहे. मात्र मद्यपी माणसाला मद्य फारसें चढत नाहीं, या न्यायानें तो अंमल थोडा क्षीण असणें स्वाभाविक आहे.

माझ्यासारख्या सूर्यवंशी माणसाची स्थिति निराळी असते. मला हा झटका क्वचित् येतो खरा, पण जेव्हां येतो तेव्हां त्याचा अंमल फार भयानक असतो. निदान त्या दिवशीं दुपारचें जेवण होईपर्यंत मी जमिनीवर चालत असल्याची जाणीव मला नसते. जेवणानंतरच्या प्रदीर्घ वामकुक्षीनें त्याला थोडासा उतार पडतो; पण तरीसुद्धां नजर एकदम निवळत नाहीं. घरांतल्या समवयस्क मंडळींच्या आळसावर खेकसणें; विद्यार्थ्यांच्या पुढें पहांटे उठण्याच्या महत्त्वावर प्रवचनें

झोडणें; घड्याळाचा योग्य वेळीं गजर होतो कीं नाहीं हें वारंवार तपासून पाहणें; कोणी मित्रमंडळी आल्यास ते साधारणतः केव्हां उठतात याची विचारपूस करणें; उद्यां कोणच्या रस्त्यानें फिरावयाचें याची गुप्तपणें योजना आखणें; तिनें विणायला घेतलेला स्वेटर केव्हां तयार होईल याची तीनतीनदां चौकशी करणें; अशा पुष्कळ असंबद्ध गोष्टी या धुंदीमध्यें माझ्या हातून सहजासहजीं घडून जातात.

मात्र रात्रीं जेवणानंतर झोपेची गुंगी चढूं लागली कीं ही धुंदी भराभर उतरूं लागते. अर्थात् झोपतांना कापसाच्या उशीऐवजीं आपण एखादें चांगलेपणाचें गाठोडें उशाशीं घेतल्याचा भास होत नाहीं असें नाहीं, पण हा या कैफांतील शेवटचा झटका असतो. उलट, त्या जाणिवेनें झोप फार चांगली लागते आणि दुसऱ्या दिवशीं आठ वाजतां नेहेमींप्रमाणेंच चिरपरिचित सूर्यस्पर्शानें मी खडबडून जागा होतों. त्या वेळीं मात्र तें झगझगीत आत्मज्ञान दृष्टीला सहन होत नाहीं. आत्मज्ञानाचें दुःख फार दुःसह असतें. चोवीस तासांनीं हा पहांटेचा कैफ उतरला कीं माझ्या मनाचा कणाच मोडतो आणि सगळ्या सद्हेतूंचें शेण होतें. आपण सामान्याहून सामान्य आहोंत ही एकच जाणीव शिल्लक उरते. पण इथेंहि समाधानाला जागा आहे. या प्रतिक्रियेची जबाबदारी व्यक्तीवर नाहीं. हा सगळ्याच कैफांचा सामान्य गुणधर्म आहे. मग तो कैफ रात्रीचा असो कीं पहांटेचा असो.

सत्यकथा; मे १९५२

# मी आणि व्याकरण

गेलीं बारा वर्षें व्याकरणाला शरण गेलेल्या या शिक्षकानें व्याकरणाविरुद्ध बंडाचें निशाण उभारणें ही गोष्ट धाडसाची आहे; एक तपाच्या संसारानंतर माझा गृहकलह मला चव्हाट्यावर मांडावयाचा आहे. व्याकरणाशीं सुखानें संसार करण्याचा प्रयत्न मी गेलीं बारा वर्षें करीत आहें. पण दिवसेंदिवस आम्ही जवळ येण्याऐवजीं अधिक दूर चाललों आहोंत. माझ्या हृदयांतील अव्यभिचारिणी भक्ति आतां पार आटली आहे; आणि व्याकरणांतील कोणत्याहि क्रियेचा अर्थबोध न होण्याइतका मी जेरीला आलों आहें.

याचा अर्थ मी अंगचुकार आहें किंवा मला कसलेंच सुख या संसारांत लाभलेलें नाहीं असा नव्हे! लहानमोठ्या शब्दांना बोट धरून चालवण्यापासून तों अगडबंब महावाक्यांचे सांधे मोडण्यापर्यंत बहुतेक कामें मीं राजीखुषीनें व अक्कलहुशारीनें केलेलीं आहेत. मोठमोठ्या कारिका पाठ करण्यामध्यें कांहीं तरी अद्भुत मंत्रोच्चार केल्याचा आनंद मला लाभलेला आहे. वाक्यांचें पृथक्करण, पुनरुत्थान किंवा कायाकल्प करण्यांत माझी सर्जन होण्याची अपूर्ण इच्छा अंशतः तरी पूर्ण झालेली आहे. प्रत्यय आणि उपसर्ग या मूलतः महत्त्वशून्य प्राण्यांचा अर्थव्यवस्थेवरील अधिकार पाहून सभोवतालच्या जीवनांतील पुष्कळ कटु सत्यें निमूटपणें गिळणें मला अधिक सुलभ गेलें आहे. पुष्कळदां तर आपल्या शब्दसृष्टीचा उगम

इंडोआर्यनच्या आदिब्रह्मापर्यंत नेऊन भिडवतांना मानव्याच्या मूळ ऐक्याचा साक्षात्कार होऊन मी नकळतच एका गूढ संवेदनेच्या आहारीं गेलों आहें.

पण हीं सुखें व्याकरणशास्त्राला मान्य होण्यासारखीं नाहींत. ज्या हेतूंनीं आपण व्याकरणाचा अभ्यास करावयाचा ते हेतु याहून निराळे असतात. शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें, हें आपणांस व्याकरणाच्या अभ्यासानें कळतें...माझ्या विकृत हेतूंचा आरोप व्याकरणकारावर करणें म्हणजे 'प्रजायै गृहमेधिनाम्' वृत्तीच्या रघुवंशावर शृंगारसुखाचा आरोप करण्याइतकें धार्ष्ट्याचें आहे!

व्याकरणकार आणि कवि यांचें हाडवैर जगप्रसिद्ध आहे. व्याकरणनिष्ठ कवि ही चीज जगांत अस्तित्वांत नाहीं. व्याकरणकार भाषेचा फोटो काढतो; त्याला ती जितकी स्थिर राहील तितकी हवी. महाकवि तिला कुंजांत बोलावतो; त्याला ती जितकी नाचेल तितकी अधिक आवडते! शेक्सपिअर व्याकरणनिष्ठ असता, तर इंग्रजी भाषा त्याच्या घरीं दासीप्रमाणें राबली नसती. कारण व्याकरण म्हणजे भाषेची नीति आहे; आणि नीतीच्या कच्छपीं लागलेल्या माणसाचीं रग आणि रंग हीं फार दिवस टिकत नाहींत. नीति स्थिर राहण्याचा प्रयत्न करते, तर जीवन हें गतिशील असतें. भाषेमधील या दोन प्रेरणांचा झगडा सनातन आहे. व्याकरण हें स्थितीचें नियमन करतें, तर काव्य हें गतीला मूर्त स्वरूप देतें. एक मात्रा वांचविल्यानें पुत्रजन्माचा आनंद होणारा व्याकरणकार आणि प्रतिभेशीं दौलतजादा खेळून भाषेची उधळपट्टी करणारा महाकवि यांचें खडाष्टक कधींच संपणार नाहीं. व्याकरणकार हा भाषेच्या रंगमहालांतील एक कारकून आहे; त्यानें आल्या-गेल्याची व्यवस्था पाहावी, किरकोळ मोडतोडीची नोंद ठेवावी, बारीक-सारीक जमाखर्च टिपावा; पण वीणेचा झंकार झाला कीं मागच्या पायानें आपली कोठी गाठावी! आणि मग पाहिजे तर कानांमध्यें बोटें घालून 'शांतं पापं, शांतं पापं' म्हणत निःश्वास सोडावे.

शब्दांशीं जिवंत संबंध जोडला आणि त्यांचें हृद्गत आपण समजून घेतलें कीं पाणिनीसारख्या ऋषितुल्य व्याकरणकारांचीं वर्गीकरणेंहि तकलुपी वाटूं लागतात. माणसासारखेंच शब्दांनाहि व्यक्तित्व असतें. त्यांच्याशीं व्यवहार करतांना मी तटस्थ राहूं शकत नाहीं. माझीं सर्व वर्गीकरणें भावनात्मक असतात. 'पण',

'परंतु', 'जर', 'तर' हीं शब्दयोगी अव्ययें म्हटल्यानें मला कांहींच बोध होत नाहीं; माझ्या दृष्टीनें हे शब्द अंगचुकार आणि संधिसाधु आहेत. 'आहे' आणि 'नाहीं' ह्या गृहस्थांविषयीं मला आदर आहे: ते प्रांजळ आणि सच्चे आहेत. पण अशा सज्जन माणसांची संख्या कोठेंहि पाहिलें तरी थोडीच असावयाची! 'निश्चित', 'अवश्य', 'सुद्धां', वगैरे करारी मंडळींच्या सहवासांत मला थोडें अवघडल्यासारखें होतें. 'लगेच', 'एकदम', 'अचानक', 'पटापट', वगैरे तरुणांचा उल्लूपणा मी ओळखूं शकतों. 'एवंच', 'सारांश', 'इत्यादि', 'किंबहुना', 'तात्पर्य', वगैरे पंडितांना आपल्या पगड्या संभाळून माझ्या सभेचें गांभीर्य वाढविणें सहज शक्य असतें. 'एवढेंच नव्हे', 'इतकेंच काय', वगैरे उंच मल्लांच्या खांद्यावर उभें राहिल्यानें आपले हात कोठेंहि पोचूं शकतात. 'सर्वोच्च', 'सर्वोत्कृष्ट', 'असंख्य', 'अनंत', वगैरे प्रचारकांच्या भडक आश्वासनांवर विश्वास ठेवणें मला थोडें कठीण वाटतें. सारांश, शब्दांच्या व्याकरणांतर्गत वर्गीकरणापेक्षां त्यांचा स्वभावकोशच मला अधिक उपयुक्त वाटतो.

कांहीं घमेंडखोर शब्दांबद्दल मला तिटकारा वाटतो. आपण म्हणजे कोणी विशेष आहोंत हा दर्प त्यांच्या अक्षरांअक्षरांत मुरलेला असतो. कागदाच्या या टंचाईच्या दिवसांतहि इतरांची पर्वा न करतां आपले हातपाय ऐसपैस पसरून हवी तेवढी जागा अडविण्यांत त्यांना संकोचच वाटत नाहीं. 'एतद्देशीय', 'सदसद्विवेकबुद्धि', 'परस्परावलंबी', 'गोब्राह्मणप्रतिपालक' हे या जातीचे शब्द आहेत; त्यांना आपल्या पोषाखी पांडित्याचा दांडगा अहंकार असतो. यांतील पहिला शब्द ऐकला कीं आपल्या कुशीमध्यें कोणीं ठोसा मारला कीं काय असा भास होतो; दुसऱ्या शब्दाचें दोंद त्याच्या खोचणावर थळथळत असतें; तिसऱ्या शब्दानें मला खालचें घोडें निघून गेलेल्या स्थितींत दोन डगरींवर पाय टेकून झोप घेणाऱ्या हरदासाचीच आठवण होते; आणि चौथ्या शब्दाच्या भगव्या सोंगाखालीं लपलेला भोंदूपणा पाहून माझ्या कपाळाची शीर ताड्ताड् उडूं लागते.

ही कैफियत पुरी करावयाची झाल्यास माझा भ्याडपणाहि मला लपवितां येणार नाहीं. पुष्कळ माणसें आपल्याला विशिष्ट पेहेरावांत अधिक भीतिदायक वाटतात. शब्दांच्या बाबतींतहि मला असेंच म्हणतां येईल. तुम्ही आपला 'अनुभव' सांगूं लागलांत, तर मी तो ऐकूनहि घेणार नाहीं; पण तुम्ही

आपल्या 'अनुभूती'चा 'आविष्कार' करूं लागलांत तर तुमच्यापुढें करजुळणी करण्यांतहि मला कमीपणा वाटणार नाहीं! त्याच कारणासाठीं 'चैतन्यसृष्टींतील *आध्यात्मिक मूल्यां'पुढें* मी नांगी टाकीन; नि 'सृजनशक्तीच्या सामाजिक *प्रक्रिये'पुढें माझा टिकाव लागणार नाहीं!* तुमच्या *'आयुष्या'*विषयीं मला फिकीर नाहीं; पण तुमच्या 'जीवना'विषयीं अनादर दाखविणें मला शक्य होणार नाहीं! फाटका सदरा घालणाऱ्या बकाली भाषेला किंवा आधुनिक बुश्कोट घालणाऱ्या छाकड्या शब्दांना मी मानणार नाहीं; पण तोच अर्थ पंधरा दिवसांची दाढी वाढल्यावर एखादी पायघोळ कफनी घालून माझ्यावर हल्ला करील तर त्याच्या आसपासच्या तेजोवलयानें माझी बुद्धि दिपल्यावांचून राहणार नाहीं. मात्र हा असला भित्रेपणा माझ्यापुरताच मर्यादित नसावा अशी माझी कल्पना आहे!

व्याकरणाविरुद्ध काव्यानें केलेल्या या बंडाचा झेंडा नेहमीं उंचच राहणार; पण पाणिनीच्या समाधीपुढें तो थरथरल्यावांचून राहत नाहीं. /जडवादाचा हिरीरीनें पुरस्कार करणारा एखादा तरुण प्रत्यक्ष तुकारामाशींच बोलूं लागला म्हणजे त्याची स्थिति काय होईल? या पाणिनीच्या समाधीपुढें आल्यावर माझी स्थिति कांहींशी तशीच होते. प्रत्यक्ष वाघाच्या जबड्यांत सापडतांनासुद्धां 'व्याजिघ्रति इति व्याघ्रः' असें उद्‌गारणारा हा योगी व्याकरणाला न कळणाऱ्या प्रत्ययाशीं एकरूप झालेला महान् कलावंत होता. त्याच्या समाधीपुढें हा झेंडा मी आदरानें विनम्र करतों. पण याचा अर्थ मी व्याकरणाला शरण जातों असा मुळींच नव्हे! कारण, माझें भांडण व्यक्तीशीं नसून व्याकरणाशीं आहे. //

मनोहर; जून, १९५२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २३०५८...... विः ...
क्रमांक ११२३... नों: दि: २८/३/५८

# बेडूक, शब्दकोडीं, आणि संस्कृति

आज सकाळपासून या दोन शब्दांनीं मला पछाडलेलें आहे.

'वे'डूक कीं 'हा'डूक? दोन्ही शब्द चपखल बसतात यांत संशय नाहीं. कारण "'हें' खाणारे रसिक फार थोडे असतात" असें सूचक विधान 'उभ्या बारा'मध्यें दिलेलें आहे. पण चिनी लोक बेडकाचें लोणचें घालतात ही गोष्ट खरी असली, तरी 'फार थोडे' या शब्दांचा अर्थ बरोबर लागत नाहीं व 'वेडूक' हा शब्द त्याज्य ठरतो. मात्र 'फार थोडे' हें विधान सापेक्ष असण्याचाहि संभव आहे. जगाच्या लोकसंख्येच्या दृष्टीनें विचार करूं लागलें कीं चीनमधील वेडकांचे रसिकहि 'फार थोडे' ठरतील आणि मग 'वेडूक' हा शब्द अयोग्य ठरण्याचें कारण नाहीं. 'वेडूक' कीं 'हाडूक'... हाडूक खाणाऱ्या रसिकांची नक्की संख्या शोधून काढणें कठीण असलें तरी तीहि फार थोडी नाहीं; मांसाहार करणारे सर्व रसिक 'एक नळी बरोबर शंभर पोळी' या मताचे असतात; पण नळी चोखणें निराळें आणि हाडूक खाणें निराळें! प्रत्यक्ष हाडूक खाणाऱ्या रसिकांची संख्या 'फार थोडी' असण्याचा संभव आहे. अशा परिस्थितींत 'हाडूक' शब्दच यथायोग्य ठरतो!...'हाडूक' कीं 'वेडूक'? दुसराहि एक प्रश्न विचारांत घेतला पाहिजे! कोड्याचें उत्तर निश्चित करणाऱ्या मंडळींत नवकवींची संख्या जास्त असली तर 'हाडूक' वापरणेंच धोरणाचें होईल. पण परंपरेच्या पुरस्कर्त्यांचें आधिक्य असलें तर 'वेडूक' हा शब्दच अगदीं बिनतोड ठरेल...'हाडूक' कीं 'वेडूक', 'वेडूक' कीं 'हाडूक'...

शब्दकोडीं सोडवणाऱ्या माझ्यासारख्या इच्छुकाच्या मनाचा हा एक प्रातिनिधिक छेद आहे! शब्दकोडीं म्हणजे पोरखेळ समजणाऱ्या पंडितांनीं या छेदाचा अभ्यास केल्यास आमच्या मनाची उंची हॅम्लेटपेक्षां फारशी कमी नाहीं ही गोष्ट त्यांना मान्य करावी लागेल. 'जगावें कीं मरावें' हें कोडें सोडवतां सोडवतां आपल्या जीवनाची शोकान्तिका करणारा हॅम्लेट आणि 'वेङ्क कीं हाङ्क' याचा योग्य निर्णय करून बंगला उठवणारा कोडेंबहादर यांमध्यें श्रेष्ठ कोण हें सांगायला पंडितांची जरूरी नाहीं. शब्दकोड्यांची लोकप्रियताच त्याची साक्ष देईल.

मात्र एके काळीं मीसुद्धां शब्दकोड्यांची कठोर कुचेष्टा केलेली आहे ही गोष्ट मला मोठ्या खेदानें मान्य केली पाहिजे. त्या वेळीं मी असें समजत असें, कीं शब्दांच्या या मोहजाळांत फक्त रेल्वे ऑफिसांतील नोकर तेवढेच सांपडत असतात. त्यानंतर असें उमगून आलें कीं, सर्व प्रकारचे शिक्षक व सामान्यपणें कोणत्याहि ऑफिसांतील कारकून या विकारापासून विमुक्त नाहींत; दुसऱ्या महायुद्धानंतर तर कोणताहि अर्धपोटी प्राणी या भविष्यकालीन शिदोरीवर निर्वाह करतांना दिसूं लागला. शेवटीं एक दिवस असा उजाडला कीं, वर्तमानपत्रांतील मुख्य मजकूर टाळून सोळा हजारांच्या एका घवघवीत कोड्यावर माझी दृष्टि खिळलेली आहे असें मला उमगून आलें! आणि मग मात्र मला फादर डमायनच्या दुःखाची आठवण झाली. तेव्हांपासूनच शब्दकोड्यांची सांथ संपून नव्या मानवांचा तो आतां स्वभाव बनला आहे याची मला जाणीव झाली. लवकरच प्रथम चोरून व नंतर उघडपणें शब्दकोडयांच्या स्पर्धेंत मी भाग घेऊं लागलों; आणि आतां तर माझ्या सर्व कल्पना मी शब्दकोडयांच्या संदर्भातच निश्चित करतों. जो शब्दकोडीं सोडवतो तो साक्षर; ज्याच्यांत शब्दकोडीं असतात तें वर्तमानपत्र; आणि जें शब्दकोडयांना मान्यता देतें तें सरकार. सामान्य वाचकाच्या बौद्धिक जीवनाचें केंद्रस्थान शब्दकोडें हेंच आहे ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे या सर्व व्याख्या किती तर्कशुद्ध आहेत हें आपोआपच दिसून येईल!

महाराष्ट्रांतील गेल्या दोन पिढ्यांची संस्कृति या दृष्टीनें बरीच रानटी होती. टिळकांच्या वेळीं केसरीचा ताजा अंक हातांत पडतांच तरुणांचे घोळके त्यांतील अग्रलेखाची चर्चा करण्यांत रंगलेले दिसत; गांधींच्या युगांत तर सर्वसामान्य मनुष्य वर्तमानपत्र हें या महापुरुषाची दैनंदिनी समजून त्यामध्यें दिसणाऱ्या

राष्ट्रीय आंदोलनाचा चलच्चित्रपट पाहण्यांत धन्यता मानी. पण राष्ट्राचें राजकीय कोडें सुटल्यापासून त्याचें स्थान शब्दकोड्यांनीं घेतलेलें दिसतें. कपाळाला आंठ्या घालून दोन माणसें वर्तमानपत्र पुढें ठेवून चर्चा करतांना दिसलीं तर ती कसली म्हणून विचारण्याचें कारण नाहीं. ते व्यापारी असल्यास काळ्याबाजाराची; व्यापारी नसल्यास शब्दकोड्यांची. तसें पाहिलें तर सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यांत शब्दकोड्यांना फार महत्त्वाचें स्थान आहे. मास्तर आणि हेडमास्तर, कारकून आणि अव्वल कारकून, दुय्यम आणि अधिकारी या अहिनकुलांच्या जोड्यांमध्यें एक शब्दकोडें टाकलें कीं त्यांच्यामधील सहकार्याच्या भावनेला एकदम ऊत येतो. नवराबायकोच्या बौद्धिक सहकार्याला या नव्या क्षेत्रांत भरपूर वाव असल्यामुळें पुष्कळ कुटुंबांतील वैवाहिक जीवन स्थिर करण्याचें श्रेयहि शब्दकोड्यांनाच आहे. एवढेंच नव्हे, तर शब्दकोडें हें पूर्णपणें निधर्मी असल्यामुळें हिंदु-मुसलमानांत ऐक्य निर्माण करण्याची शक्तीहि त्याच्यांत निश्चित आहे. एका पानावरील शब्दकोडें सोडवणें म्हणजे एका पात्रामध्यें जेवण्याची पूर्वतयारी करण्यासारखेंच आहे. शब्द-कोड्यांचा प्रचार योग्य वेळीं झाला असता तर पाकिस्तानचा प्रश्नच निर्माण झाला नसता आणि महात्माजींच्या जीवनांतील ती दुःखान्तिका सहज टळली असती !

पण माझ्या मतानें शब्दकोड्यांचें खरें सांस्कृतिक महत्त्व त्यानें काय साधतें यापेक्षांहि त्यानें काय टळतें यावर अवलंबून आहे. आपल्या आर्थिक गरजा भागविण्यासाठीं आवश्यक ती नवी समाजरचना निर्माण करण्याची प्रेरणा आजकाल अगदीं सार्वत्रिक आहे. या आगामी वर्गकलहावर रामबाण उपाय योजून ही असंतोषाची लाट कशी थांबवावी हाच आमच्या भारतीय संस्कृतीपुढें किंवा प्रस्थापित समाजरचनेच्या पुरस्कर्त्यांपुढें मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. अशा वेळीं या शब्दकोड्यांच्या साहाय्यानें साधणारें दैववादाचें पुनरुत्थान हा प्रश्न सोडवतांना उपकारक झाल्यावांचून राहणार नाहीं. अचानकतेवरील श्रद्धा बळावूं लागली कीं कार्यकारणभावावरील विश्वास डळमळूं लागतो आणि आपोआपच वैयक्तिक अगतिकतेचें पर्यवसान आपल्याच कपाळावर हात मारण्यांत होऊं लागतें. म्हणजे एकाच धोंड्यानें दोन पक्षी मरतात. सामाजिक असंतोषाचा पाया उखडला जातो; आणि आपल्या तत्त्वज्ञानांतील कर्मांच्या सिद्धांताची प्रस्थापना होते. भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांनीं येत्या निवडणुकींत आपली खूण ‘ शब्दकोडें ’ हीच ठेवली तर मला मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं.

मात्र शब्दकोडीं सोडविणारे 'इच्छुक' हे स्वतःला दैववादी कधींच समजत नाहींत. तें त्यांच्या कर्तबगारीचें कार्यक्षेत्र असतें. कोडें सोडवितांना आपण अभिमन्यूप्रमाणें चक्रव्यूहाचाच भेद करीत आहोंत असा क्षणभर तरी भास खऱ्या कोडेंबहाद्दरला होतोच होतो. आणि ही पराक्रमाची जाणीव अनाठायीं आहे असें कसें म्हणतां येईल? निवडणुकीच्या लॉटरींत आपली तत्त्वनिष्ठा पणाला लावून राजकीय सत्तेचा सट्टा करणारे लोक महान् मुत्सद्दी ठरतात! शेअर बाजारांतील कोल्हेकुईंत, अस्तित्वांत नसलेल्या मालाची खरेदी-विक्री करून कोट्याधीश झालेले व्यापारी हे आपल्या अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ बनतात. पराक्रमाच्या या कल्पनेप्रमाणें 'ध'चा 'मा' करून पुतण्याचें राज्य घशांत घालणारी आनंदीबाई हीदेखील पराक्रमी ठरूं शकेल! मग तसाच एखादा 'ध'चा 'मा' करून शब्दकोडें जिंकणारी शिक्षिका ही मात्र कुचेष्टेचा विषय व्हावी हा केवढा अन्याय?

कोणी म्हणतील कीं जुगार हा कुचेष्टेचा विषय होणारच; पण तेवढ्यामुळें शब्दकोडें म्हणजे जुगार नव्हे असें म्हणण्याचा भ्याडपणा मी कधींच करणार नाहीं! खरोखर मनुष्य हा स्वभावतःच जुगारी प्राणी आहे. मोठ्याच्या नादांत छोटें गमावण्याचें त्याला वेड आहे. त्याच्या दृष्टीनें जुगार जिंकण्यांत तर आनंद आहेच पण गमावण्यांतहि दुःख नाहीं; कारण खरा जुगारी आपली सर्व वसुली अपेक्षेच्या आनंदांतच करीत असतो! तसें पाहिलें तर मानवी इतिहास म्हणजे माणसांच्या सोंगट्या आणि तत्त्वज्ञानाचे फासे घेऊन महापुरुषांनीं खेळलेला जुगार आहे. महापुरुषांचें युग संपून सामान्य माणसांचें युग सुरू झालें असलें तरी ही जुगारी वृत्ति नष्ट झालेली नाहीं; उलट शब्दकोड्यांच्या रूपानें सामान्य माणसानें आपणाला शोभेल असा या जुन्या जुगाराचा नवा आदर्श निर्माण केला आहे. आसपासचें वातावरणहि या जुगाराशीं सुसंवादी आहे. युद्धोत्तर बेकारीमुळें शिक्षणाचा जुगार झाला आहे; आर्थिक पेचप्रसंगामुळें नव्या औद्योगिक साहसांना जुगाराचें स्वरूप येत आहे; पक्षनिष्ठ राजकारणानें सच्च्या समाजसेवकांच्या राजकीय जीवनाचा जुगार झाला आहे; आणि ॲटम बॉम्बचें कोडें सोडवणारी मानवी संस्कृति कोणतें बक्षीस मिळवणार आहे याचा अंदाज करणें विचारवंतांना कठीण जात आहे. या सर्व जुगाराला उराशीं धरणारी संस्कृति शब्दकोड्यांचें शेंबडें पोर मात्र टाकून देईल ही कल्पना किती वेडेपणाची आहे!—पण शब्द-

कोड्यांच्या पुरस्कर्त्याला इतकें खोलांत जाणें शोभून दिसत नाहीं. आमची बौद्धिक अभिरुचि इतकी विकृत नसते. आमच्यापुढें खरा प्रश्न एकच असतो—'हाडूक' कीं 'वेडूक'; 'वेडूक', कीं 'हाडूक'!

सत्यकथा; जुलै, १९५२

# न चुकणारीं माणसें

माझें बोलणें हें हरदासाच्या झग्यासारखें थोडें घळमळीत असतें. भाषेच्या कांठावर उभें राहून स्वतःचा तोल तासन्-तास सावरीत बसणें हें मला सहसा साधत नाहीं. बोटांना माती न लावतां दोन शब्दांच्या चिमटीनें अर्थाचे सुवर्णकण तेवढे नेमके उचलणारांविषयीं मला आदर वाटतो. पण तसाच प्रयत्न मी करूं लागलों कीं हातांत फक्त माती राहते आणि सुवर्णकण कुठें जातात तें कळत नाहीं. अर्थात घळमळीत भाषा वापरण्यांत मी कुणालाच हार जाणार नाहीं. शिवाय ज्याची बुद्धि कृश आहे त्याला हा हरदासाचा झगा मोठा सोयिस्कर असतो! माझ्या शब्दांची उडी बहुधा वावभर इकडे किंवा वावभर तिकडे पडते. सामान्य माणसांची कल्पनाशक्ति लहान मुलाप्रमाणेंच फार मोठी असल्यामुळें माझे शब्द त्यांच्या मनांत मावूं शकतात; त्यांना अवघडल्या-सारखें वाटत नाहीं; आणि मलाहि ऐसपैस बसतां येतें. पण विद्वानांच्या समोर मला गोंधळल्यासारखें होतें आणि आपल्याला भुतासारखें अदृश्य होतां येत नाहीं याचें वाईट वाटतें.

-

विशेषतः माझे विद्वान् मित्र प्राध्यापक 'बिनचूक' (हें त्यांचें टोपणनांव आहे) धिमेपणानें आणि योजनापूर्वक आमच्या जिन्याची एक एक पायरी चढूं लागले कीं माझें मनहि त्या अल्पजीर्ण जिन्याप्रमाणें डळमळूं लागतें. मी प्राध्यापकी ऐटीनें मान ताठ करून बसतों खरा, पण आंतून अगदीं घाबरलेला असतों. बहुधा

"शेवटीं मी म्हणत होतों तेंच झालें" किंवा "मीं काल सांगितलें तेंच खरें" अशी ठराविक नांदी म्हणत ते एखाद्या रविवारीं उपस्थित होतात. त्यांच्या मुद्रेवर तोबातोबा गांभीर्य असतें; आणि डोळ्यांमध्यें विजयाची झांक असते. "अहो, मीं सांगितलें तेंच खरें" असें म्हणत ते सार्थ दृष्टीनें व हनुवटी मागें खेचीत माझ्याकडे पाहतात. मी थोडासा भांबावून त्यांनीं पूर्वी काय सांगितलें असावें याचा विचार करण्यांत गुंतलेला असतों; पण त्या विपरीत मनःस्थितींत फार वेळ काढावा लागतो असें नाहीं. "अहो, त्या काव्याच्या प्रकाशनाचा दिनांक ७ जून १९१८; १९१९ नव्हे!" आम्हीं केलेली चर्चा मला पुसटशी आठवते; तरी पण काव्याचें नांव झटकन् लक्षांत न आल्यानें मी विषय बदलण्याचा प्रयत्न करतों. "हां, त्या काव्याची तारीख ना? बरोबर...पावसानं अगदीं कहर केला बाबा. एका दिवसांत काल दहा इंच पाऊस झाला!" "अहो, दहा इंच कसला, अकरा इंच...वेधशाळेचा रिपोर्ट अकरा इंच आणि सात सेंट आहे." आवंढा गिळून मी सर्द मनानें ही आघाडी सोडून दुसऱ्या आघाडीवर पळ काढतों. "सौभाग्यवतींना नाहीं आणलंत...आतां साडेतीनच्या लोकलनं आलांत वाटतं?" "अहो, ती दोन तारखेपासून बंद झाली...मी आलों ही 'तीन सत्तेचाळीस'... हो, 'तीन सत्तेचाळीस'." पण ते नुसतें बोलून थांबत नाहींत. आपलें म्हणणें बरोबर आहे हें पुराव्यानिशीं शाबीत करण्यासाठीं प्राध्यापकमहाशय आपल्या खिशांतील वेळापत्रक शोधूं लागतात; आणि या हवाबंद संभाषणांतून बाहेर पडण्यासाठीं सौभाग्यवतीला चहा टाकायला सांगून सुपारी आणण्याच्या निमित्तानें मी अदृश्य होतों. मी दहा मिनिटांनीं परत उगवतों त्या वेळीं चहा झालेला असतो. प्राध्यापक मजकुरांच्या हातावर सुपारी ठेवल्याबरोबर कधींहि न होणाऱ्या व्याख्या-नाच्या निमित्तानें मी बाहेर पडतों. अशा वेळीं पत्नी डोळ्यांत प्राण आणून माझ्याकडे बघते; पण प्रत्येक माणसाला आत्मसंरक्षणाचा अधिकार आहे असें पुटपुटत मी निघून जातों—पार निघून जातों आणि पुन्हां चार तास घराचें तोंड पाहत नाहीं!

खरोखर या न चुकणाऱ्या माणसांइतका भयंकर मनुष्य उभ्या दुनियेंत सांपडणार नाहीं. मी स्वतः नरमांसभक्षक आदिमानवाला फारसा दुष्ट मानीत नाहीं. निरुपद्रवी व असहाय अशा अन्य प्राण्यावर ताव मारणारा सुसंस्कृत मनुष्य आणि उपद्रवी व संरक्षणक्षम अशा स्वजातींवर निर्वाह करणारा आदिमानव यांमध्यें विशेष फरक करणें म्हणजे स्वार्थी स्वयंकेंद्रित तत्त्वज्ञानाची परिसीमा आहे. आपल्याला तें मान्य

नाहीं. पण या न चुकणाऱ्या माणसांची हिंसक वृत्ति कांहीं अपूर्व असते. आपण बिनचूक आहोंत याची जाणीव त्यांच्या प्रत्येक उच्चारांतून व आचारांतून प्रकट होत असते. त्यांच्या स्वभावाची यथार्थ कल्पना करूनच त्यांच्याशीं वागावें लागतें. भोंगळ शब्दांनीं त्यांचें मस्तक भडकतें. अस्ताव्यस्त भाषेनें त्यांचा अपमान होतो. प्रत्येक शब्दाची व्याख्या केल्याशिवाय ते आपल्याला पुढें पाऊल टाकूं देणार नाहींत. आपण सर्व क्षेत्रांत बिनचूक विचार करणारे आहोंत याची त्यांना खात्री असते. 'मी चुकत नाहीं' हें बिरुद मिरवीतच ते जगांत प्रवेश करतात.

महाविद्यालयें किंवा आश्रम यांची हवा त्यांना विशेष मानवते. पण नेहमींच ते सुशिक्षित असतात असेंहि नाहीं. ते जेव्हां बाजारांत जातात तेव्हां बिनचूकपणें योग्य दुकानांतच खरेदी करतात. ते खरेदी करतात तो माल नेहेमींच दर्जेदार असतो. त्यांचा न्हावीसुद्धां सगळ्यांहून जास्त कसबी असतो; आणि तो हुडकून काढण्यासाठीं त्यांनीं पद्धतशीर संशोधन केलेलें असतें. त्यांचा शिंपी सगळ्यांहून कापड कमी घेतो आणि सगळ्यांहून अधिक वक्तशीर असतो. त्यांचा गवळी आधीं दुधांत पाणीच घालीत नाहीं; घातलेंच तर तें गाळून घालतो. त्यांचीं मुलें शेजारच्या मुलांहून 'कांहीं विशेष' असतात; आणि त्यांची शिस्त तर अन्यत्र कुठेंच दिसण्यासारखी नसते. दुसऱ्या महायुद्धाचा शेवट त्यांनीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणेंच घडलेला असतो; आणि त्या वेळीं पहिल्या महायुद्धाच्या वेळीं बरोबर ठरलेल्या त्यांच्या जुन्या अंदाजाची त्यांना आठवण होते. कोरियांतील शस्त्रसंधीचें भविष्य त्यांनीं पूर्वींच वर्तविलेलें असतें; बेरियाच्या अधःपतनाचें त्यांना आश्चर्य वाटत नाहीं; आणि अब्दुल्लाचेंहि शेवटीं व्हायचें तेंच झालेलें असतें! विनोबांच्या भूदानाला अपेक्षेपेक्षां जास्त यश मिळालें असें कोणीं म्हटल्यास ते फक्त गालांतल्या गालांत हसतात. न चुकणारा मनुष्य हा सगळीकडेच 'बिनचूक' असतो. शेजारच्या बाळूकाकांना त्यानें पूर्वीं 'स्पष्ट' सांगितल्याप्रमाणें शेवटीं हायकोर्टांत अपयश येतें; वामनरावांचा खोकला अखेरीला भडभडे वैद्यांच्या औषधानेंच साफ बरा होतो; एवढेंच काय, पण सावित्रीबाईंची धडधडीत मंगळावर दिलेली मुलगी आपला अंदाज खरा करते कीं नाहीं याबद्दल त्यांना उत्कंठा लागलेली असते!

त्यांच्या बहुतेक वाक्यांचे अर्थदृष्ट्या दोन भाग पडतात; पहिल्या कर्तृपदाचा अर्थ 'माझें बरोबर आहे' असा असतो आणि कर्मपदामध्यें 'तुम्ही मूर्ख आहांत'

असा ध्वनि असतो. कर्मपदामध्यें समोर असलेल्या व्यक्तीच्या सामाजिक प्रतिष्ठे-प्रमाणें थोडाफार फरक पडण्याची शक्यता नेहमींच असते; पण कर्तृपदाचा अर्थ मात्र निरंतर एकच असतो; त्यामुळें सत्य आणि असत्य यांच्या मध्यावरील धुक्याच्या प्रदेशांत वाट चुकण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधींच येत नाहीं. त्यांच्या मनांत अस्पष्ट असें कांहींच नसतें. त्यांची भूमिति सरळ रेषेची असते. त्यांच्या सर्व आकृत्या एकाच पातळींत काढलेल्या असतात; आणि या बौद्धिक पातळीवर त्यांची नितांत श्रद्धा असते. आपल्याला पाय ठेवण्यासाठींच सबंध पृथ्वी परमेश्वरानें आपल्या पायाखालीं सरकवली असावी याबद्दल त्यांना संदेह नसतो आणि त्यामुळें त्यांचीं श्रद्धास्थानें अगदीं अढळ राहतात.

न चुकणाऱ्या माणसांचें हें असें असतें. आपल्या बुद्धीची झेप त्यांच्या पाय-थ्याशींसुद्धां पोचणारी नाहीं ही खात्री असल्यामुळें मी त्यांना टाळणेंच पसंत करतों. त्यांच्या गाढ सांनिध्यांत फक्त विदग्ध माणसेंच जिवंत राहूं शकतात. या भयंकर हिममानवापेक्षां हरघडीं चुकणारीं, चुकत चुकत उठणारीं, पुन्हां पुन्हां धडपडणारीं, आणि शेवटीं एक दिवस चुकतां चुकतां कोलमंडणारीं दुबळीं माणसें मला अधिक सत्य वाटतात. या सामान्य माणसांविषयीं असा विलक्षण ओढा मला कां वाटावा? त्या माणसांचे हेवेदावे, त्यांचें मानापमान, त्यांचे तंटेबखेडे हे तेवढे मला खरे खरे कां वाटावे? त्यांच्या माणुसकीवर चुकांचें शिक्कामोर्तब झालेलें असतें. त्यांचा खोटेपणा आणि त्यांचा क्षुद्रपणा, त्यांच्या पदोपदीं घडणाऱ्या चुका आणि त्या लपविण्याकरितां चाललेली केविलवाणी धडपड, त्या स्वतःला सुसह्य व्हाव्या म्हणून इतरांवर केलेले मिथ्यारोप आणि सर्वांच्या मुळाशीं आणि शेवटीं असलेलें असमाधान—या सर्व गोष्टींमुळें तीं माणसें मला माझीं वाटतात. त्यांचे शब्द उर्मट असतात, पण नकली नसतात; त्यांचें वागणें गैरशिस्त असतें, पण पोकळ नसतें. तीं रडतात त्या वेळीं कळवळून रडतात आणि हसतात त्या वेळीं त्यांचें शरीर खिदळल्यावांचून राहत नाहीं. तीं दांत दिसतील म्हणून तोंड उघडायचें टाळीत नाहींत. त्यांची संगत नेहमीं सुखाची असते असें नाहीं; केव्हां केव्हां ती त्रासदायक ठरतें—पण तेव्हांहि ती जिवंत असते.

हीं माणसें मला सह्य वाटतात याचीं कारणें नेहमीं निर्मल असतील असें मी म्हणत नाहीं. कदाचित् माझें प्रतिबिंब पाहण्यांतच मला आनंद वाटत असेल!

मला स्वतःचा फोटो काढण्याची आणि तो टांगून ठेवण्याची विशेष आवड नाहीं; पण त्याच प्रवृत्तीचा हा छुपा प्रकार असणें असंभवनीय नाहीं. कदाचित् त्या माणसांच्या डोळ्यांत पडणारें स्वतःचें प्रतिबिंब मला आवडत असेल. कदाचित् त्यांच्या अपूर्णतेनें माझी अपूर्णता मला अधिक सुसह्य होत असेल किंवा त्याच्या अपयशाच्या आधारानें माझी आशा तोल सावरीत असेल. काय खरें असेल कुणाला ठाऊक; इथें तरी आपण 'बिनचूक' होण्याचा प्रयत्न काय म्हणून करावा?

याचा अर्थ असा नव्हे कीं मला असल्या भोंगळ मंडळींविषयीं आदर वाटतो! आदर, पूज्यता, कृतज्ञता, वगैरे तमाम मांगल्यसंवर्धक भावनांचें गाठोडें 'बिनचूक' माणसांच्या पायाशीं ठेवायला मी नेहमीं तयार असतों. त्यांच्या जुलमांतून सुटण्यासाठीं ही खंडणी भरीत राहणें आवश्यकच असतें. आणि सामान्य माणसें आपल्या वाटेला जात नाहींत या गोष्टीचा त्यांनाहि अभिमान असतो. या माणसांच्या तोंडांत व्याख्या, डोक्यांत ज्ञानकोश, आणि हातांत फूटपट्टी असते. त्यांचे शब्द अर्थाचे बंदे असतात. त्यांचा विचार सर्व संबंधित परिवार बरोबर घेऊन लवाजम्यासह मोठ्या समारंभानें प्रवेश करतो. त्यांनीं प्रत्येक माणसाची लांबीरुंदी दशमान पद्धतीनें मोजलेली असते. प्रत्येक विचाराचें स्वरूप निश्चित केलेलें असतें; त्यांतील सर्व अंतर्विरोध नष्ट केलेला असतो. त्यांच्या सांनिध्यांत माझ्या वैचारिक दुबळेपणाची मला पुरेपूर कल्पना येते.

माझा आजचा विचार उद्यां कायम राहत नाहीं. कालच्या माणसाची ओळख आज पुन्हां करून घ्यावी लागते. आजचा 'मी' हा कालच्या 'मी'ला मानीत नाहीं. त्यामुळें सगळीकडेच ढिलेपणा येतो; अस्थिरता दिसते; फूटपट्टी घेऊन मापें काढीत फिरणाऱ्या पंडितांच्या कसबाचें मला कौतुक वाटतें; त्यांच्या धैर्याचें आश्चर्य वाटतें. जिवंत प्रवृत्तींचीं अगर माणसांचीं मापें कशीं घेतात हें मला अजूनपर्यंत उमजलेलें नाहीं. फूटपट्टी खालीं ठेवून आंकडा मांडीपर्यंत तीं बदललेलीं असतात. एवढेंच काय, पण पूर्वीं काढलेलीं मापें पुन्हां तपासून पाहावयाचें ठरविलें तर मध्यंतरींच्या काळांत ती फूटपट्टीहि थोडीफार झिजलेली असणें शक्य असतें! पण 'बिनचूक' माणसांना असल्या पोरकट संशयांची बाधा कधींच होत नाहीं. त्यांच्यापुढें असें कांहीं बडबडण्याचें धैर्य न केलेलें बरें. त्यांना खूष करावयाचें असेल तर प्रबंधासारखें कांहीं तरी विराट कर्मच करावें लागेल! आणि त्यांतहि चुका

झाल्या म्हणजे सगळेंच मुसळ केरांत! प्रबंधलेखन हें प्रत्येक प्राध्यापकाचें सुखस्वप्न असतें. माझेंहि मन पुष्कळदां मोहांत पडून या विचाराभोवतीं रुंजी घालतें. पण माझ्या आसपासच्या 'न चुकणाऱ्या माणसां'ची आठवण झाली कीं मी लगेच शुद्धीवर येतों; आणि प्रबंधाकरितां घेतलेल्या कागदावर एखादी ओटभर कविता किंवा एखादा पोरकट लघुनिबंध लिहून आणखी एक आवंढा गिळतों.

केसरी; सप्टेंबर, १९५३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23058 वि: विविध
क्रमांक 1123 नों: दि: 20315

# सुखी होण्याचा हक्क

माणसाचें पहिलें अर्धें आयुष्य सुखाचीं साधनें जमविण्यांत जातें, आणि उरलेलें अर्धें तीं सर्व निरुपयोगी आहेत हें ठरविण्यांत जातें. पण कोणत्या ना कोणत्या रीतीनें सुखासंबंधीं विचार केल्याशिवाय तो स्वस्थ बसत नाहीं. तो जितका अधिक खोलांत जातो तितका त्या चक्रव्यूहांत अधिकाधिक गुरफटत असतो. मीसुद्धां गेले कित्येक दिवस त्याच चक्रव्यूहांत सापडलेला आहें...मोलिअरच्या नाटकांतील एका पात्राला आपण जन्मभर गद्यांत बोलत होतों हें कळल्याबरोबर आश्चर्य वाटतें! खऱ्या सुखी माणसाचें असेंच असतें. त्याला आपण सुखी आहों याचीहि जाणीव नसते.

सुख म्हणजे काय हें न कळतांहि मनुष्य सुखी असूं शकतो. सुखासंबंधीं सखोल विचार करणें म्हणजे सुखांतल्या बेहोषीला पारखें होणें. सुखाचें तत्त्वज्ञान फार भयंकर असतें! सुखी व्हायचें असेल तर सुखासंबंधींचा तात्त्विक विचार प्रथम बंद केला पाहिजे. फार तर बोबडें बोलावें.

तत्त्वज्ञानाच्या प्रचंड पिंजऱ्यांत सुखाचें फुलपांखरूं पकडण्याचा प्रयत्न शहाण्यानें करूं नये. त्याच्यामध्यें सत्याचा सिंह सांपडूं शकेल; आणि तर्काच्या टोकदार पात्यानें त्याची पुन्हां पुन्हां कळ काढणेंहि शक्य होईल. पण हें सुखाचें फुल-पांखरूं मोठें मिस्किल आहे. तें तुमच्या या पिंजऱ्यांत केव्हां शिरेल आणि नंतर

अचानक केव्हां निघून जाईल हें सांगतां येणार नाहीं. जेवढा वेळ तें पिंजऱ्यांत असेल तेवढा वेळ तें आपण पकडलें आहे असा खोटा अभिमान पाहिजे तर तत्त्व-ज्ञानानें अवश्य धरावा; पण कोणत्या क्षणीं तो अभिमान मिथ्या ठरेल हें सांगतां यावयाचें नाहीं! कारण एखादें थोर तत्त्वज्ञान आणि एखादी सुखाची संवेदना यांचा सहभाव कांहीं वेळां अनुभवाला येतो; आणि आपण त्या सहभावालाच कार्यकारण-भावाचें स्वरूप देतों. पुढें आपली चूक आपल्या अनुभवाला येते तेव्हां आपला सगळा राग आपण त्या तत्त्वज्ञानावरच काढतों. मग कालचें खरें तत्त्वज्ञान आज खोटें वाटूं लागतें. तत्त्वज्ञानानें कदाचित् सत्य सांपडेल. पण सुखाच्या अपेक्षेनें तत्त्वज्ञानाकडे जाणारा सामान्य मनुष्य शेवटीं रिकाम्या हातांनींच परत येईल.

महापुरुषांच्या नादाला लागून स्वतः सुखी होण्याचा प्रयत्नहि तितकाच हास्यास्पद आहे. सामान्य माणसाचीं सर्व सुखें नाकारून आपल्या महान् दुःखाला आकार देणारा पुरुषच शेवटीं महापुरुष म्हणून ओळखला जातो. सुखाचा शोध घेण्यासाठीं महापुरुषांकडे जाणें म्हणजे एकादशीनें शिवरात्रीकडे जाण्यासारखें आहे. मोठ्या माणसांइतकीं दुःखी माणसें दुसरीं कुणीहि सांपडणार नाहींत! या ध्येयनिष्ठ माणसांना सुखें आणि दुःखें यांतला फरक कळणेंहि कठीण असतें. ते लोक ज्या वेळीं सुखासंबंधीं बोलूं लागतात तेव्हां त्यांचा चेहरा हुबेहुब दुःखासारखा दिसूं लागतो! जीवनाच्या इतर क्षेत्रांत त्यांचें मार्गदर्शन उपयुक्त ठरूं शकेल. क्षितिजाच्या पलीकडे असलेलें जग हें त्यांना स्पष्ट दिसत असतें; पण क्षितिजाच्या अलीकडे असलेलें सुख त्यांना फार जवळ पडतें. तें सूक्ष्म असतें म्हणूनच तें त्यांना दिसूं शकत नाहीं. तें मिळण्यासारखें असतें म्हणूनच तें मिळविण्याचें त्यांना महत्त्व वाटत नाहीं.

पण महापुरुषांच्या मार्गदर्शनावरची श्रद्धा अशी जा म्हणून जात नाहीं. तिची पाठवणी करण्यापूर्वी तिला आत्मवंचनेच्या अपार दुःखाचा एक मोठा नजराणा द्यावा लागतो. महापुरुषांचीं चित्रें टांगून माझ्या आयुष्याच्या भिंती मजबूत करण्याचा प्रयत्न मींसुद्धां अनेकदां केलेला आहे. शिवाजीपासून लेनिनपर्यंत, महात्मा गांधींपासून मार्क्सपर्यंत आणि ॲरिस्टॉटलपासून आइन्स्टीनपर्यंत सर्व श्रेष्ठ पुरुषांना माझी खोली सजविण्याच्या कामावर मीं वेळोवेळीं नेमलेलें आहे. माझ्या खोलींतील फोटोंच्या इतिहासावरूनच माझें स्वतःचें आत्मवृत्त

मला रेखाटतां येईल. फोटो लावतांना वाटणारा उत्साह व तो फोटो अडगळीच्या खोलींत ठेवतांना होणारी वंचनेची जाणीव या दोन्हीपैकीं कोणच्याच गोष्टीला वस्तुतः तीं माणसें जबाबदार नाहींत. तो दोष आपल्या सुखासाठीं त्यांच्या जीवनांत आधार शोधणाऱ्या माझ्या मनाचाच आहे. पण इतकें कळूनहि 'मुखांत उरतें कांहीं कडवट' ही गोष्ट खोटी नाहीं. अजूनहि, विधवेच्या कपाळाप्रमाणें स्वच्छ झालेल्या माझ्या नव्या भिंती पाहिल्या कीं त्या हरपलेल्या श्रेयाची थोडीफार चुटपुट लागतेच; कारण कोणावर तरी नितांत श्रद्धा ठेवणें हें माणसाला मोठें सोयीस्कर असतें! त्यामुळें तो विचार करण्याच्या स्वतःच्या जबाबदारींतून मोकळा होतो. ती जबाबदारी महापुरुषावर टाकली कीं आपल्या बुद्धीची सर्व शक्ति व्यावहारिक यशावर केंद्रित करणें त्याला अधिक सुलभ होतें. त्यामुळेंच श्रद्धावान् माणसांना श्रीमंत होणें फारसें कठीण नसतें! विशेषतः परमेश्वराएवढा भक्कम जामीन मिळाला म्हणजे काळाबाजार करूनहि उजळ माथ्यानें फिरतां येतें हें आपण नेहमींच पाहतों. खालच्या कोर्टांत 'पैसा' आणि वरच्या कोर्टांत 'गुरु' हे दोन मार्गदर्शक लाभले कीं यशाचीं सर्व दारें खडाखड उघडत जातात!

पण मला या यशस्वी माणसांचा हेवा वाटत नाहीं. यशस्वी होणें म्हणजेहि सुखी होणें नव्हे. व्यावहारिक दृष्ट्या यशस्वी झालेल्या पुष्कळ चेहऱ्यांवर दुःखी जीवनाचे शिलालेख कोरलेले असतात. याचा अर्थ सुखाच्या बाह्य साधनांना मी गौण मानतों असें नव्हे; तत्त्वज्ञानानें नेमकी हीच चूक पुन्हा पुन्हा केलेली आहे. माझ्या सुखाच्या कल्पनेंत सुखाचीं बाह्य साधनें आणि सुखी होण्याची इच्छा ह्या गोष्टी गृहीत आहेत. बाह्य वस्तूच्या गुणांचा आपल्या व्यक्तित्वाच्या मूलधर्माशीं अनुकूल संबंध कसा जोडावा हें कळण्यांतच सुखी माणसाच्या जीवनाचें खरें रहस्य असतें. कांहीं कांहीं अनुभव हे इतके मोठे व स्थूल असतात कीं, त्यांच्याशीं असा जिव्हाळ्याचा संबंध प्रस्थापित करणें केवळ अशक्य असतें. अनुभवाची इतकी मोठी घागर सुखाच्या पाण्यांत बुडणें कठीण असतें. माझ्या दृष्टीनें हिमालयाएवढें सुख हें सुखच नव्हे! आपलें घर प्रासादतुल्य असलें तरी त्यांतली माझ्या शरीराशीं भिडणारी जागाच खऱ्या अर्थानें 'माझी' असते. बाकीची सर्व जाणीव हा कल्पनेचा विलास असतो; आणि वस्तु अस्तित्वांत नसतांहि तो करतां येतो! म्हणूनच या खऱ्या खुऱ्या

सुखाला बुद्धीच्या चक्रव्यूहांत किंवा महत्त्वाकांक्षेच्या कोंडींत पकडणें शक्य नसतें. पण जें त्यांत सांपडणार नाहीं तें तुम्हांला तुमच्या वेगांत सहज पकडतां येईल; आणि जें वेगांत सांपडणार नाहीं तेंहि चिमटींतून निसटूं शकणार नाहीं !

मोटार हें एक सुखाचें साधन असलें तरी सर्वच माणसांना मोटारींत बसणें साधलेलें असतें असें नाहीं. दुसऱ्याच्या मोटारींत बसूनहि मालकापेक्षां अधिक सुखी असल्याची जाणीव मला पुष्कळदां झालेली आहे ! मोटार माझ्या मालकीची आहे या जाणिवेंतून निर्माण झालेलें सुख काल्पनिक व पोरकट आहे. इतरांना मोटार मिळाली कीं त्या कल्पनेचा पाया ढिला होतो. तें सुख नकारात्मक असतें. म्हणूनच मालकीहक्काच्या सुखाला मी माया समजतों. मी मालकापेक्षां अधिक सुख अनभवूं शकतों तें अगदीं निराळ्या पद्धतीनें. मोटारचा वेग वाढूं लागला कीं माझ्या रक्ताची गति वाढूं लागते. अशा वेळीं मी माझें अंग अगदीं शिथिल करतों आणि अवयवांना स्वायत्तत्ता देतों. मी मोटारशीं समरस होतों आणि मोटारहि हळूहळू जिवंत होऊं लागते. वस्तुतः हा एक योगाचाच प्रकार आहे. अशा वेळीं यंत्र हा आपल्या अंगाचाच एक विस्तार आहे हा बौद्धिक पातळीवर वावरणारा विचार अंतर्मनाच्या खोल गाभाऱ्यांत झिरपूं लागतो. अशा वेळीं यंत्र सजीव होतें आणि जीवनालाहि यांत्रिकतेचा उबग येत नाहीं. माझ्यासारख्या यंत्रपूजकाला मोटार असली म्हणजे झालें; ती समाजाच्या मालकीची असली तरी माझ्या सुखाला गालबोट लागत नाहीं !

घराचा दिंडीदरवाजा उघडून सुखाची वाट पाहणाऱ्या माणसाला सुख कधींच भेटणार नाहीं. गोकुळांतल्या कृष्णाप्रमाणें त्यालासुद्धां सामान्य गोष्टींचे बुरखे पांघरून तुमच्या नकळत संचार करणें अधिक आवडतें. त्याची पर्वा न करतां तुम्ही आरामखुर्चीत पडा; तुमच्या घराच्या फुटक्या कौलांतून पडणाऱ्या कवडशाला धरून तें तुमच्या पायाशीं केव्हां खेळूं लागेल हें तुम्हांला समजणार नाहीं. या आराम-खुर्चीचा स्पर्शच किती कनवाळू असतो ! थकलेल्या सगळ्या मणक्यांवरून आईचा हातहि इतक्या प्रेमानें फिरत नसेल. आरामखुर्चीचें खरें सुख तुम्हीं अनुभवलें असलें तर शरीरांत आत्मा विरघळतो म्हणजे काय होतें हें पुन्हां सांगण्याची जरुरी नाहीं. ऐन हिवाळ्यांत गरम पाण्यानें स्नान करण्याचें सुखहि तसेंच और आहे. एक एक तांब्या घेत घेत रेंगाळत रेंगाळत स्नान करण्याची मला संवय

आहे. त्या वेळीं मला गंगा भागीरथीची आठवण होत नाहीं; कारण हें स्वर्गसुख संपून मोक्ष मिळावा ही कल्पना मला आत्मघातकी वाटते. अर्थात माझें हें रेंगाळणें माझ्या पत्नीला पसंत नसतें आणि तिची घाई सारखी सुरू असते; पण तेंहि नैसर्गिकच आहे. पुरुषांचें इतकें सुख बायकांना कधींच सहन होत नाहीं!

तसाच तो सकाळचा चहा. चिनी लोकांच्या शहाणपणाचा कळस म्हणजेच चहा. सर्वांच्या सेवेला तत्पर असलेलें हें आपलें राष्ट्रीय पेय. राष्ट्राला नुसता एक ध्वज व एक घटना हीं पुरेशीं नाहींत; त्याला एक पेयहि असावें लागतें. म्हणूनच चहा पिणें म्हणजे आमच्या घरचा एक मुख्य विधि समजला जातो. त्या वेळीं स्टोव्ह, चहादाणी, कपबशा, चमचे या सर्व लहान-थोर मंडळींना एक विशेष प्रतिष्ठा प्राप्त होते. खरोखर भांड्यांमध्येंसुद्धा कुटुंबव्यवस्था असते. त्यांच्यामध्यें भलताच पाव्हणा आलेला मला खपत नाहीं. चहाचें सुख हें चहा पिण्याच्या पद्धतीवर अवलंबून असतें; चहा पितां पितां कुंडलिनी जागृत झाल्याची बातमी कोणी मला सांगितली तर त्यावर मी खुशाल विश्वास ठेवीन. मी अट्टल चहाबाज झाल्यापासून रात्रीं एकदां झोपल्यानंतर सकाळीं पुन्हां उठण्यांतला शहाणपणा मला उमगूं लागला आहे. एखादा मनुष्य चहा पीत नाहीं असें ऐकलें कीं मला प्रथम त्याचा राग येतो आणि नंतर कींव येते. असें वाटतें कीं, या अभागी जिवाला कोणा तरी ब्रह्मचाऱ्यानें बिघडवलेलें असावें...मग पुन्हां एकदां ते जुने फोटो माझ्या मनाच्या भिंतीवरून सरकूं लागतात...'आजन्म चहाला शिवणार नाहीं' या चवदाव्या वर्षीच्या शपथेची पुन्हां आठवण होते...त्यानंतरचा बारा वर्षांचा वनवास आठवतो...सगळें आठवतें. पण व्यक्तीप्रमाणें वस्तूंचीं मनें रुष्ट होत नाहींत. वस्तु फार फार उदार असतात!

सामान्य माणसाच्या आयुष्यांतील बहुतेक सुख हें असल्या सामान्य वस्तूंशीं स्नेह जडण्यावरच अवलंबून असतें. ज्या वेळीं मला एखादी गोष्ट आवडत नाहीं, त्या वेळीं मी कांहीं तरी क्षुल्लक कारणानें तिच्याशीं भांडलेला असतों. पण प्रत्येक माणसाला त्याच्या मर्यादा असतात. त्या मर्यादा जाणून तेवढ्या विशिष्ट कक्षेंतहि खऱ्या अर्थानें सुखी होणें त्याला शक्य असतें. माणूस व्यक्तीशीं भांडत नाहीं इतका वस्तूशीं भांडतो; आणि हें भांडण लावून देण्यांत महापुरुषांचा हातखंडा असतो! त्यांच्या संदेशांत असल्या पार्थिव सुखाला स्थान नसतें. क्वचित् सुखाचा

उल्लेख आलाच तर त्याच्यावर पायघोळ आध्यात्मिक झगा घालायला ते विसरत नाहींत; केव्हां केव्हां त्याला मूल्यांचा टिळा लावतात! शेवटीं त्यांचें सुख हें त्यांच्या दुःखापेक्षांहि अधिक भेसुर दिसूं लागतें. बहुतेक माणसांच्या मनांत सुखाबद्दल खोल अढी बसलेली असते. आपल्याला सुखी होण्याचा हक्क आहे —सामान्य माणसाला शोभेल अशा सामान्य पातळीवर सुखी होण्याचा हक्क आहे—ही गोष्ट आपण आपल्याशींच मान्य करीत नाहीं. कांहीं अंशीं त्याला आपला अहंकारहि जबाबदार असतो. आपण सामान्य आहोंत ही कल्पना मान्य करणें आपल्या जिवावर येतें. प्रतिकूल परिस्थितीनें अगतिक झालेल्या एखाद्या नेपोलियनच्या किंवा बायरनच्या भूमिकेंत तो स्वतःला पाहत असतो! मन प्रसन्न करणारें घर, शरिराला गुदगुल्या करणारे कपडे, जिभेशीं लघळपणा करणारें अन्न, या गोष्टींना महापुरुषांनीं गौणत्व दिलें तर आपण त्यांचा खुशीचा सौदा आहे. पण सामान्य माणसानें आपल्या सुखाच्या कल्पनेंत त्यांना अग्रहक्क दिला पाहिजे. महापुरुष कोणताहि संदेश देवोत; सामान्य माणसानें एवढीच घोषणा करावी: "सुखी होणें हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळविणारच!"

केसरी; नोव्हेंबर, १९५३

# चिंचा आणि आवळे

मला अद्भुताच्या कथा वाचणें आवडत नाहीं, पण सांगणें आवडतें. संध्याकाळपासूनच सामान्य वस्तूंच्या सावल्या असामान्य रूपें घेऊं लागतात. दिवेलागणीच्या सुमाराला तर प्रत्येक गोष्ट निराळ्या प्रकाशानें चमकूं लागते. अशा वेळीं माझ्या कल्पनाशक्तीला अद्भुताचें वाळसें चढतें. माझ्या या मनःस्थितीची कल्पना छोट्या नंदूलाहि आलेली असावी; कारण तो नेमका याच वेळीं "मला गोष्ट सांगा" म्हणून मागें लागतो. मग शेजारचीं मुलेंसुद्धां "गोष्ट सांगा" "गोष्ट सांगा" म्हणून गिल्ला सुरू करतात. हा हल्ला एवढा जोरकस होतो कीं, शांतता प्रस्थापित करण्यासाठीं मला एक विशिष्ट उठाव करावा लागतो. गंभीर व उग्र मुद्रा करून मी जाहीर करतों, "सांगेन. पण त्या भयंकर राक्षसाची गोष्ट सांगेन." मग कांहीं मुलांचीं तोंडें गोरींमोरीं होतात, कांहींचे डोळे विस्फारित होऊं लागतात, कांहीं उसनी धिटाई आणून "सांगा सांगा" करतात. नंदू मात्र शहाजोगपणाचा आव आणून सूचना करतो, "तसली नको गोष्ट—आम्हांला कंटाळा येतो." (याचा खरा अर्थ 'आम्हांला भीति वाटते' असा असतो! पोरेंसुद्धां मुत्सद्यांप्रमाणेंच खरीं कारणें लपविण्यांत मोठीं पटाईत असतात.) मग मीहि त्यांच्या इच्छेला मान देऊन मला येत नसलेली भयंकर राक्षसाची गोष्ट सांगत नाहीं! आणि दुसऱ्या एखाद्या पद्धतीनें अद्भुताचें आराधन करायला सुरुवात करतों. कधीं अजस्र गरुडाच्या पायाला धरून हिऱ्यांच्या मुलखांत उड्डाण करतों; कधीं 'तिळा उघड' म्हणत

चाळीस चोरांच्या गुहेंत शिरतों; कधीं रामाबरोबर वनवासांत जातों; कधीं ध्रुवाबरोबर तपश्चर्या करतों; कधीं एखाद्या सुंदर राजकन्येचें एखाद्या शूर मुलाशीं लग्न लावतों; तर कधीं पेटाऱ्यांतून पसार होऊन बादशहाच्या हातावर तुरी देतों !

कालसुद्धां अशाच एका सांध्य मनःस्थितींत कल्पतरूविषयींची एक स्वरचित कथा मी माझ्या मुलांना सांगत होतों. त्यांतल्या अद्‌भुतरम्य वातावरणाचा मुलांच्या मनावर होणारा परिणाम मला पाहायचा होता. माझी गोष्ट माझ्या मतानें अगदीं रंगत चालली होती. माझ्या कल्पतरूवर मुलांना आवडणाऱ्या सगळ्या गोष्टी लटकलेल्या होत्या. एका फांदीला पानाऐवजीं मुलांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या जरीच्या टोप्या आणि रिबिनी लोंबत होत्या; दुसऱ्या एका फांदीला सफरचंदें आणि द्राक्षें लगडलेलीं होतीं; तिसऱ्या फांदीला जिलब्या, लाडू, करंज्या यांचाच बहर आला होता. चवथ्या फांदीला खेळणीं चिकटवावीं कीं सिनेमे चिकटवावे या विचारांत मी होतों! पण इतक्यांत नंदूनें आपल्या भुवया उंचावीत एक गंभीर प्रश्न विचारला, " भाऊ, कल्पविक्षाला चिंचा आणि आवळे असतात का हो ? "

या आंबट प्रश्नानें माझी अद्‌भुताची धुंदी एकदम उतरली; मी माझें भारूड आवरतें घेतलें; आणि पुन्हां एकदां बालमनाविषयीं अगदीं निराळ्या पद्धतीनें विचार करणें मला आवश्यक वाटूं लागलें. अद्‌भुताला आवाहन केल्याशिवाय माझी गोष्ट मुलांना आवडणार नाहीं अशी माझी कल्पना होती. बहुतेक प्रौढ मंडळींची मुलांविषयीं अशीच कांहीं तरी कल्पना असते. आपण 'मुलें म्हणजे स्वप्नसृष्टींत विहार करणारीं स्वच्छंदी पांखरें' असें समजून चालतों. समोरच्या गल्लींतील परटापेक्षां नंदनवनांतील पऱ्यांविषयीं मुलांना अधिक कुतूहल असतें असें आपण गृहीत धरतों. शेजारच्या सुताराची तासणी आणि हातोडा यांच्यापेक्षां रामलक्ष्मणाच्या धनुष्यबाणाच्या कल्पनेंत तीं अधिक रंगतात असा आपला ग्रह असतो. सांगितलेल्या गोष्टीपासून तों मुलांसाठीं आंखलेल्या शिक्षणक्रमापर्यंत मुलांवर लादलेलें हें अद्‌भुताचें आकर्षण धांगडधिंगा घालीत असतें.

पण ज्या कल्पवृक्षावर आवळे आणि चिंचा नाहींत तो कल्पवृक्ष मुलांना बिलकुल आवडत नाहीं. माझ्या कल्पवृक्षाला बहर आला तो माझ्या स्वतःच्या बाल्यविषयक कल्पनांचा; मुलांना आवडणाऱ्या खऱ्या गोष्टींचा नव्हे. कल्पवृक्षाला

चिंचा आणि आवळे चिकटवण्याची कल्पना माझ्या मनाला शिवलीच नव्हती! उलट, सारख्या चिंचा आणि आवळे खातात म्हणून मी परवांच त्यांच्या अंगावर खेकसलों होतों...आणि मी! लहानपणीं मींहि चिंचा आणि आवळे मिळवण्यासाठीं जिवाचें रान केलें होतें; एकेक चिंच पाडण्यासाठीं खांदा दुखूं लागेपर्यंत दगड फेकले होते; आणि त्यांतला एक दगड पिंपळाभोवतीं प्रदक्षिणा घालणाऱ्या टकूच्या आईला लागल्यामुळें ती एकदां फुंकणी घेऊन माझ्या मागें लागली होती! याच चिंचांसाठीं मी सदू परांजप्याला एक सबंध पेन्सिल देऊन वडिलांना ती सांडली म्हणून सांगितलें होतें. आणि त्याच चिंचा आणि आवळे मी पार विसरलों होतों. जणूं काय मीं माझ्या बाल्याचाच द्रोह केला होता. माझ्या अद्‌भुत कल्पवृक्षाला मुलांच्या जगांत जागाच नव्हती. खरें म्हणजे कल्पवृक्ष आणि अमृत या कल्पना मुलांना प्रौढांइतक्या विलोभनीय वाटत नाहींत. ज्यांना अशक्यतेची कल्पना नाहीं त्यांना कल्पवृक्षाचें कौतुक कसें वाटणार? आणि ज्यांच्या जिभेतच अमृत आहे तीं अमृताचा हव्यास काय म्हणून धरतील? चिंचा आणि आवळे आवडण्याची आपली शक्ति नष्ट झाली म्हणजे मगच आपण अमृतासाठीं झगडूं लागतों. देवदानवांच्या समुद्रमंथनांत मुलें सामील असतील असें मला वाटत नाहीं!

तसेंच आवळा देऊन कोहाळा काढण्याची कल्पना मुलांना कधींच सुचणार नाहीं! हा खुळा कावा फक्त प्रौढांनाच सुचूं शकतो. दारू देऊन पैसे घेणारे लोक उमरखय्यामला महामूर्ख वाटत! आवळा देऊन कोहाळा काढणारीं माणसेंहि मुलांच्या दृष्टीनें अगदीं तोट्याचा सौदा करीत असतात. मुलांनासुद्धां आपल्याला काय आवडतें हें चांगलें समजतें. तीं पक्कीं वस्तुनिष्ठ असतात. फक्त त्यांची वस्तुनिष्ठा ही आमच्या वस्तुनिष्ठेहून निराळी असते. खरें म्हणजे अद्‌भुताची बाधा ही आपल्यासारख्या प्रौढांनाच होऊं शकते. आपली वास्तवाची कल्पना निश्चित झालेली असते. त्याच्याशीं विसंगत असलेलें सर्व आपल्या दृष्टीनें अवास्तव, कल्पित किंवा अद्‌भुतरम्य ठरतें. पण मुलांची वास्तवाची कल्पनाच मोठी सोयीस्कर असते. भावनेच्या संदर्भांत अनुभवाला येणाऱ्या सगळ्या गोष्टी त्यांना सारख्याच सत्य वाटतात. कार्यकारणसंबंधाची त्यांची कल्पना फार प्रवाही असते. अशा वृत्तीमध्यें जाणिवेची वास्तव आणि अद्‌भुत अशी फाळणी करण्याची त्यांना जरुरीच वाटत नाहीं. मुलांच्या या अबोध अद्वैतापुढें पुष्कळदां

तत्त्वज्ञानाचें सामर्थ्य दुळें पडतें. तत्त्वज्ञ एक कोडें उलगडतांना दुसरें एक कोडें निर्माण करीत असतात; एका अज्ञाताचें निरसन करतांना त्याहून अधिक सूक्ष्म अशा दुसऱ्या एका अज्ञातावर त्याला स्वार करतात. पण मुलांची 'कां?'ची सरबत्ती सुरू झाली कीं त्याला स्वतःचें ढोंग कळूं लागतें. म्हणून सजीव आणि निर्जीव, जन्म आणि मृत्यु यांतला फरक मुलांच्या गळीं उतरवणें प्रौढांना फार जड जातें. मृत्यूची कल्पना मुलांपुढें मांडतांना ती कशी मांडावी याविषयीं बर्ट्रांड रसेलनें फार सूक्ष्म मार्गदर्शन केलेलें आहे. त्याच पद्धतीनें मी माझ्या मुलांना आमच्या घरांतील एक घटना समजावून देण्याचा अटोकाट प्रयत्न केला; पण मला अजून पुरेसें यश आलेलें नाहीं. अजूनहि नंदूला त्याची बहीण मंजू जिवंत आहे असें वाटतें...अजूनहि नंदू मंजूची चौकशी करतो...आम्हांला नकळत तिचा खाऊ उरवून ठेवतो...अजूनहि वाट पाहतो...कशाची तरी वाट पाहतो.

आणि मुलें विचारहि फार गंभीरपणें करतात. पण त्यांची विचार करण्याची पद्धति अगदीं निराळी असावी. तिची बरोबर कल्पना प्रौढांना कधींच येणार नाहीं. मनाचे व्यापार हे बाह्य क्रियेवरून ताडतां येतीलच असें नाहीं. त्यानें फार तर आराखडा तयार होईल; पण आंतल्या सूक्ष्म छटा अंतर्मुख होऊन व्यक्तीला स्वतःच भराव्या लागतात. पण आत्मसंशोधनाच्या दृष्टीनें अंतर्मुख होण्याची मुलांना जरुरीच नसते. त्यांना बाह्य वस्तूंचें अजून इतकें संशोधन करावयाचें असतें कीं तीं असल्या भानगडींत पडत नाहींत. आणि मुलांना प्रश्न विचारून आपल्याला त्यांच्या विचारपद्धतीची कल्पना येईल हा विश्वासहि खोटा आहे. आपल्या प्रश्नांनींच त्यांच्या विचाराचें मूळ स्वरूप पार बदलून जाईल! असें म्हणतात कीं परमाणूची स्थिति आणि वेग यांचें एकदम ज्ञान होणें केवळ अशक्य आहे. पाहण्याच्या क्रियेनेंच त्याची स्थिति आणि वेग बदलली जातील! मुलांच्या बाबतींतहि नेमकें तेंच होतें असा माझा अनुभव आहे.

पण माझ्या ज्ञानाच्या या नैसर्गिक मर्यादा मीं विसरायचें ठरवलें तरीसुद्धां बाल्याविषयींची अद्भुतरम्य कल्पना मला सोडावीच लागते. मग बहुतेक मुलें क्षुद्र व स्वार्थी भासूं लागतात! दुसरें मूल पडलें कीं तीं फिदीफिदी हसतात; कुत्र्याला किंवा मांजराला विनाकारण बडवण्यांत त्यांना मजा वाटते; कांहीं वेळां तीं खोटें बोलतात व बऱ्याच वेळां चहाड्या सांगतात; स्वतःचा असा गट बनवतात

व गरीब पोरांना गुर्कावून दाखवतात. कांहींना अंमल गाजवण्यांत आनंद वाटतो, तर कांहींना लोचट व गळेपडू धोरण आंखण्यांत समाधान मिळतें. पण मुलांच्या ह्या सहज प्रवृत्तींचें नैतिक मूल्यमापन करणें खरोखरच हास्यास्पद आहे. सगळ्या नैतिक कल्पना हेतूशीं निगडित असतात; आणि मुलांचे हेतु हें आदिवासींच्या विधींप्रमाणेंच आपणाला अनाकलनीय असतात. प्रौढांच्या कृतींचे संदर्भ व मुलांच्या तसल्याच कृतींचे संदर्भ अगदीं वेगळे असण्याचा संभव असतो.

इतका विचार केल्यानंतर तरी शेवटीं आपल्या हातांत काय उरतें? फक्त एवढेंच : चिंचा आणि आवळे!

ज्यांना चिंचा आणि आवळे आवडतात त्यांना चिंचा आणि आवळे आवडतात हें एकच अंतिम सत्य असतें. प्रौढांचे दांत आंबत असले तरी मुलें कांहीं चिंचा व आवळे खाणें सोडणार नाहींत; आणि मुलांना जें आवडतें तें त्यांनीं करूं नये हें म्हणण्याचा आपला मोहहि प्रौढसुलभ आहे! जग हें असेंच आहे! इथें मुलेंहि पुष्कळ आणि चिंचाहि पुष्कळ. प्रौढ फक्त दोनच : एक मी आणि दुसरे तुम्ही!

केसरी; एप्रिल, १९५४

# नवे नवे शोध

प्रथमच शहरांत आलें कीं माणसाला रोज नवे नवे शोध लागत असतात. कोवळें वय आणि परकर यांचें एक चमत्कारिक साहचर्य मीं गृहीत धरलेलें होतें; पण मुंबईत आल्यावर हा गैरसमज नाहींसा झाला. सायकल आणि पगडी यांचें विशेषसें पटूं शकेल अशी माझी कल्पना नव्हती; पण ठाकुरद्वाराच्या राममंदिराजवळ पुणेरी झिळमिळ्याची पगडी सावरीत सायकलवरून श्राद्धाला जाणारा भटजी भेटूं लागला. सूटबूट घातलेला मनुष्य चौपाटीवर पाणीपुरी खातांना उमगला. धोतर नेसलेला मध्यमवयस्क बनिया साम्यवादावर व्याख्यान झोडूं लागला. एक वेडसर मुद्रेची झग्यांतली झिपरेवाली प्रथितयश शिक्षणशास्त्रज्ञ असल्याचें मान्य करावें लागलें. अद्ययावत् पोषाखांतील सद्गृहस्थ बिनतिकिटानें प्रवास करतांना आढळले आणि अर्धवट भाबडीं म्हातारीं-कोतारीं आपल्याजवळच्या चारपांच निरनिराळ्या गांठी सोडून जेमतेम एका तिकीटापुरता गल्ला जमवतांना नजरेला पडलीं. मला लागलेल्या या नवीन शहरी शोधांनीं मी सुरुवातीला अगदीं बावरून गेलों. कांहीं दिवस माझी स्थिति त्या रिप व्हॅन विंकलसारखी झाली. पण ती फार काळ टिकली नाहीं. लौकरच माझ्या मनोवृत्तींत सराइताची तटस्थता डोकावूं लागली. आणि मग गंगावनें कोणतीं आणि खरे केस कोणते, तरारलेलें तारुण्य कोणतें आणि सांपळ्यावर रचलेले ताबूत कोणते—हे गूढ आणि गंभीर शोधहि विशेष खटपट न करतां मनाच्या शेवाळावरून घसरूं लागले !

जगाविषयीं असे निरनिराळे शोध लागत असतांनाच मला स्वतःविषयींहि एक भयंकर शोध लागत होता. या नव्या ज्ञानानें माझ्या स्वाभिमानाचा पायाच उखडला गेला. मला कळून चुकलें कीं, मला अजून चालतां येत नाहीं ! हें सत्य विदारक होतें.

प्रत्येक माणसाला थोडा तरी अलौकिकत्वाचा स्पर्श हवा असतो. दुसऱ्याला साधली नाहीं अशी एक तरी गोष्ट आपल्याला साधली आहे या जाणिवेंत त्याला एक वेगळेंच समाधान लाभत असतें. त्याच्या स्वतंत्र अस्तित्वाची ती निशाणी असते. असल्या निशाणीला स्वतःचें मूल्य असलें पाहिजे ही कल्पना चुकीची आहे. जन्मापासून मनुष्य स्वतःचें हें वेगळेंपण शोधीत असतो आणि तें सापडलें कीं त्या ठिकाणींच तो स्थिर होतो. अलौकिकत्वाच्या या स्पर्शाला सत्याच्या आशीर्वादाचीहि जरुरी नसते; तो भ्रम असला तरी चालतो—फक्त तो भ्रम आहे ही गोष्ट आपल्याला उमगली नाहीं म्हणजे झालें ! 'मला चालतां येत नाहीं' हा शोध मला मोठा विदारक वाटला तो यामुळेंच. मी सातव्या महिन्यांत चालूं लागलों ही दंतकथा मला माझ्या आईवडिलांनीं मोठ्या अभिमानानें सांगितली होती; आणि त्या गोष्टीवर माझी नितांत श्रद्धा होती. दोन पायांना मागें-पुढें करीत त्या अस्थिर आधारावर सबंध शरिराचा तोल सावरून पुढें जाण्याची ही कला मला सात महिन्यांच्या कोवळ्या वयांत साध्य झाली ही एकच कल्पना माझा स्वाभिमान पेलायला समर्थ होती. अजूनसुद्धां कसलीहि चर्चा चाललेली असली तरी मी बालपणाची सम गाठतों आणि विनोदाचें घोंगडें पांघरून माझा हा विक्रम एक गंमत म्हणून सांगून टाकतों. कुणी हसतात; कुणी हसल्यासारखें दाखवतात; पण मी मात्र ही गोष्ट आंतल्या आंत गंभीरपणानें चघळीत असतों. सातव्या महिन्यांत चालण्याची कला—अवघ्या सातव्या महिन्यांत...आणि त्या जोरावर सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी रचणारे ज्ञानेश्वर किंवा बाराव्या वर्षी गुंजारव करणारे बालकवि यांच्याशीं मी सहज लगट करूं शकतों. कारण सगळें अलौकिक शेवटीं एकाच बिंदूकडे झेप घेत असतें ! पण अलौकिकत्वाचा माझा हा रंग मला लागलेल्या या नव्या शोधानें पार फिका केला. रस्त्यांतील प्रत्येक गोष्ट मला हिणवूं लागली ! "तुला चालतां येत नाहीं"..."तुला चालतां येत नाहीं !"

खरोखरच शहरांतल्या गर्दीच्या रस्त्यावरून चालण्याची कला मला अजून अवगत झालेली नाहीं. ज्याला चालतां येतें त्याला आपण चालतों आहों याची

जाणीव नसते. आणि मला तर प्रत्येक पावलागणीक आपण कांहीं तरी अचाट करीत आहोंत याची जाणीव होत असते. इतर माणसांशीं टक्कर न खेळतां स्वत:चें शरीर कमालीच्या सौजन्यानें हळूहळू पुढें जात आहे हें पाहून माझें मलाच आश्चर्य वाटतें. कधीं कधीं मात्र मी जागच्या जागींच पाय हलवीत असून दोन्ही बाजूंच्या इमारती मागें चालल्या आहेत असा भास होऊं लागतो! एखाद्या वेळीं दोनचार कच्चीं-बच्चीं आघाडीवर ठेवून आपल्या प्रेमाची भिंत उभारीत एखादें सुखी जोडपें अकस्मात् उपस्थित होतें. अशा वेळीं फळी फोडण्याच्या भरीला न पडतां या सर्वच प्रकरणाला बगल द्यावी लागते. केव्हां केव्हां कांहीं खुशालचेंडू ऐन गर्दीच्या ठिकाणीं गप्पा मारीत उभे असतात; अशा प्रसंगीं माझे दांत घट्ट आवळून मी प्रथम माझी जीभ ताब्यांत ठेवतों व मग एखादी कोंडी फोडावी अशा अवसानानें पुढें झटकतों. तोंच बालबोध वळणाची एखादी गृहलक्ष्मी पुढें आडवी येते आणि मग आपलें अंग कितीहि चोरलें तरी तें सरड्याएवढें बारीक होत नाहीं याचें वाईट वाटतें. केव्हां केव्हां डोळे पायाशीं सहकार्य करीत नाहींत आणि मन मागेंच रेंगाळत राहतें! कधीं वाटतें, हाताच्या कमानीखालून जाण्याइतके आपण ठेंगू हवें होतों. कधीं वाटतें, पुरेसे उंच असतों तरी चाललें असतें; दुसरा पाय एकदम रस्त्याच्या पलीकडे ठेवतां आला असता. मी मुंबईच्या रस्त्यानें जाऊं लागलों कीं, हा माणूस प्रत्येकाशीं अशा आट्यापाट्या कां खेळतो अशी खट्याळ कल्पना मधूनमधून माझ्या मित्रांना सुचत असते!

पण माझ्या व्यथेची कल्पना माझ्या मित्रांना तरी कशी येणार? परिस्थितीप्रमाणें आकार बदलण्याची ताकत असणें हा कांहीं सामान्य गुण नव्हे हें खरें आहे. आपल्या उत्क्रान्तीच्या मागचीं ती एक प्रमुख प्रेरणा आहे हें मी जाणतों. पण नुसत्या जाणण्यानें कांहीं सर्व प्रश्न सुटत नाहींत. शहरांतील माणसांच्या शरिरांत आणि मनांत एक अद्‌भुत लवचिकपणा आलेला असतो. माझ्यासारख्या खेडवळ माणसाच्या शरिराचें जोडकाम पक्क्या डाकाचें असतें; मुंबईकरांच्या शरिराची रचना कळसूत्री भावल्यासारखी मोठी मजेदार असते. पुढच्या गर्दींतील फटीचा आकार धारण करतांना त्यांचे माझ्यासारखेच हाल होत नाहींत. आवश्यकतेप्रमाणें लहानमोठे होण्याची ही शक्ति त्यांनीं पुष्कळ वर्षांच्या संस्कारानें चांगलीच कमावलेली असते. लवचिकपणा हा त्यांच्या व्यक्तित्वाचा विशेष असतो. या लवचिकपणामुळेंच ते आसपासच्या विचारांच्या गर्दींतूनहि सहज वाट काढूं शकतात. शहरामध्यें इतके

'वाद' पिकतात कीं त्यांच्या परस्परविरोधी प्रभावानें शहरी लोकांचे आत्मे बधिर तरी झाले असतील किंवा गोंधळून तरी गेले असतील, अशी माझी कल्पना होती. पण वस्तुस्थिति याहून अगदींच निराळी आहे. हीं माणसें त्या सगळ्या वादांना बगल देऊन आपापल्या ठिकाणीं घट्ट आहेत. ज्या वेळीं एखादा विचार त्यांच्या वाटेला जातो त्या वेळीं त्याचा पाहुणचार करायला तीं तयार असतात; पण त्याच्याशीं सोयरीक करणें तीं कटाक्षानें टाळतात. साम्यवाद्यांच्या सभेंत तीं भडकूं शकतात; अध्यात्माचें निरूपण चाललें असतां तीं हवेंत तरंगूं शकतात; पण संध्याकाळपूर्वींच तीं आपल्या घरीं परत येतात—अगदीं सुखरूप परत येतात. अजिबात गोंधळून न जातां त्यांना आपलें घर कसें सांपडूं शकतें याचें मला पुष्कळदां आश्चर्य वाटतें; पुष्कळदां हेवा वाटतो. पण त्यांचा लवचिकपणा लक्षांत घेतला कीं या किमयेचा उलगडा होतो; शिवाय दोन वादांच्या मध्यें एक बारीकशी फट असतेच.

मनुष्य पायानें चालत नाहीं; तो मनानें चालतो. अंतर्मनानें चालतो. म्हणूनच आपल्या आत्म्याची लय आपल्या चालण्यांत व्यक्त होत असते. आपलें प्रत्येक पाऊल हें आपलें व्यक्तिचित्र असतें. मूर्तीच्या ऐवजीं ज्यानें प्रथम पादुकांची योजना केली त्याला या सत्याची चाहूल लागलेली असावी! कांहीं माणसांची चाल धीरोदात्त असते; तर कांहींची नुसती बोजड वाटते. कांहीं तल्लखपणानें झेप घेत घेत चालतात; तर कांहींच्या चालण्यांत फक्त नाचरा उथळपणा असतो. आणि गंमत अशी कीं, प्रत्येकाला आपल्या चालण्यांत एक निराळीच खुबी, एक निराळीच ऐट दिसत असते. आणि हें अगदीं वाजवी आहे. प्रत्येक जण आपल्यापासून दूर जाऊन आपली स्वतःची चाल पाहूं लागला तर रस्त्यावरील पुष्कळशी गर्दी आपोआपच कमी होईल! स्वतःची ओळख करून घेण्यासाठीं प्रथम परकें बनावें लागतें. पण यांतहि एक धोका असतो. स्वतःपासून दूर जाण्यालाहि एक मर्यादा आहे...आपलें घर पाहण्यासाठीं एखादवेळ आपण इतके दूर जातों, इतके दूर जातों, कीं पुन्हां आपणाला आपल्या घराची वाटच सांपडत नाहीं!—पण आत्म-संशोधनाची ही तंद्री या शहरी वातावरणाशीं विसंगत असते. इथें मी विचारा-पेक्षां माणसें आणि वस्तू यांनाच ठेचाळत असतों; आणि प्रत्येक ठेचेगणीक माझें मन मला एवढेंच सांगत असतें, "तुला अजून चालायलाच शिकायचें आहे!"

सत्यकथा; मे, १९५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 23058 वि:
क्रमांक 9922 नों: दि: 29/3/56

# आणखी एक भूक

कधीं कधीं माझें मन अगदीं आंबून जातें. त्यांतली ईर्षा मावळते; जोम हटूं लागतो. सगळें आयुष्य सपक आणि फिकें वाटूं लागतें. मग मला माणसांच्या भाषेशिवाय दुसरी कोणतीच भाषा कळूं शकत नाहीं. कारण हिरव्या गवताचीहि एक भाषा असते. मुखस्तंभ माडांनाहि कांहीं सांगायचें असतें आणि निर्जीव दगडांतहि आपल्या मनोवृत्तीला होकार देण्याची शक्ति असते. पण या आंबलेल्या मनःस्थितीशीं दुसऱ्या कुणाचीच साथ जमूं शकत नाहीं. अशा वेळीं सुख गोड लागत नाहीं आणि दुःख कडू वाटत नाहीं. सगळें फक्त आळणी लागतें. या आळणी अवस्थेपेक्षां दुसरी कोणतीहि मनःस्थिति मला परवडते. माझ्या पांढरपेशा मनाला येणारें हें वैराग्य म्हणजे जडानें सचेतनावर मिळविलेला एक विजय असतो. हा पराभव पत्करण्यापेक्षां एखाद्या असभ्य विचाराचें स्वागत करणेंदेखील मला अधिक मुत्सद्देगिरीचें वाटतें. किंबहुना, एखादी असभ्य प्रेरणा टाळण्याच्या पद्धतशीर प्रयत्नांतूनच या मनोवृत्तीचा जन्म होत असतो. माझें मन असें आंबलेलें दिसूं लागलें, तर मी आतां पूर्वीसारखा भांबावून जात नाहीं. गेल्या कांहीं दिवसांतील लहानसहान प्रसंग मी माझ्या मनश्चक्षूंसमोर उभे करतों आणि त्यांची उलटतपासणी करूं लागतों. निढाव लेल्या गुन्हेगाराप्रमाणें बहुधा ते एकदम कांहींच कबूल करीत नाहींत; पण हळूहळू त्यांच्या कृतीला वाचा फुटते आणि गोळा केलेल्या या सूक्ष्म पुराव्याचा अर्थ शेवटीं एकच लागतो. या

आंबलेल्या मनःस्थितीचें खरें कारण एकच असतें: मी कोणाशीं भांडलेला नसतों, कडकडून भांडलेला नसतों!

उलट भांडणाचे प्रसंग मीं कटाक्षानें टाळलेले असतात. समजा, भांडलेला असलोंच तरी खर्जामध्यें भांडलेला असतों! आतां भांडणाचे प्रसंग टाळणें ही गोष्ट एकंदर कौटुंबिक किंवा सामाजिक शांततेच्या दृष्टीनें कदाचित् उपकारकहि असेल; निदान शिष्टाचाराशीं तरी ती अगदीं सुसंगत आहे. पण माणसाचें मन निरोगी राखण्याच्या दृष्टीनें ती कितपत योग्य आहे याविषयीं मी फार साशंक आहें. निदान माझा अनुभव तरी निराळा आहे. मन निरोगी असणें ही गोष्ट बाह्य शिष्टाचारापेक्षां मी अधिक महत्त्वाची मानतों; आणि व्यक्तींचीं मनें निरोगी नसतांना समाजांत खरें स्वास्थ्य असूं शकेल या कल्पनेवरहि माझा फारसा विश्वास नाहीं. मन निरोगी राखायचें असेल तर ही भांडणाची भूक दाबणें अगदीं धोक्याचें असतें. आणि मी जेव्हां 'भांडण' म्हणतों तेव्हां त्याचा अर्थ गुळमुळीत शब्दांत केलेली टीका असा नसून तारसप्तकांत केलेला आत्माविष्कार असा असतो. खर्जांत केलेलें भांडण हें भांडणच नव्हे. त्यानें निरोगी माणसाची भूक भागत नाहीं; ती फक्त खाजवली जाते! तसेंच सभ्यपणाच्या मर्यादेंत जेव्हां आपण भांडूं लागतों, तेव्हां त्याला 'टीका' असें म्हणतात. टीका ही उत्तेजक असते; पण भांडण हें विरेचक असतें. म्हणूनच मी नेहमीं सांगत असतों कीं, भांडणाची भूक टीकेनें कधींहि भागणार नाहीं. भांडणाची इच्छा ही एक प्राथमिक भूक आहे—दुसरी, तिसरी कीं चौथी तें मला सांगतां येणार नाहीं. पण दुसऱ्या कशानेंहि न भागणारी अशी ही भूक आहे हें मात्र नक्की. ही भूक लागली कीं, माणसाला फक्त एकच इलाज करणें शक्य असतें; आणि तो म्हणजे भांडणें, अगदीं कडकडून भांडणें.

पण तन्मय होऊन भांडणें ही गोष्ट वाटते तितकी साधी नाहीं. काव्याप्रमाणेंच भांडणांतहि विषय हा विशेष महत्त्वाचा नसतो! अभिजात भांडणाऱ्याच्या दृष्टीनें कोणाशीं भांडावें व कशासाठीं भांडावें हा प्रश्न अगदीं गौण आहे. निरोगी माणसाची भूक कोंड्याचा मांडा करूं शकते. तसेंच ज्याची भांडण्याची भूक निरोगी असते त्याला भांडण्यासाठीं लहानसहान कारणहि पुरेसें होतें. माझे एक स्नेही हमालाशीं भांडतात; घर गाठण्यापूर्वी निदान टांगेवाल्याशीं तरी त्यांचा तंटा होतो; आणि बाजारांत गेले कीं एकदां तरी त्यांची माळिणीशीं खडाजंगी उडते.

एकदां कुटुंब माहेरीं गेलें असतांनाहि त्यांच्या खोलींतून मोठमोठ्यानें चाललेलें आकांडतांडव ऐकूं येऊं लागलें. शेवटीं शेजाऱ्यांना असें उमगलें कीं, ते आपल्या मांजरीशींच भांडत होते! वस्तुतः यांत वाईट असें कांहींच नाहीं. माझेंहि थोडेंसें तसेंच होतें. भांडण संपल्यानंतर मीं कां भांडलों हें माझें मलाच कळत नाहीं. कांहीं वेळां संशोधन करून एखादें कारण हातीं लागतें; पण तें अगदींच जुजबी असतें. या माझ्या स्वभावाबद्दल मला प्रथम प्रथम फार वाईट वाटे. मग मी माझ्या स्वभावाशीं भांडत बसें! पण आतां मला माझ्या स्वभावाचा बराचसा अन्वय लागलेला आहे. भांडणाची निरोगी भूक ही अशीच असायची!

खरें सांगायचें म्हणजे किरकोळ कारणावरून होणारीं भांडणेंच अधिक सुरस असतात. दोन राण्यांच्या ऐतिहासिक भांडणापेक्षां नळाच्या पाण्यावरून होणारीं भांडणें अधिक रंगतात; आणि राघोबा व माधवराव यांच्या राजकीय यादवीपेक्षां आमच्या कोकणामधील एखाद्या फणसाच्या झाडावरून होणारी झटापट ही अधिक जिवंत असते. मोठ्या कारणाकरितां भांडणें होत नाहींत; त्यामुळें वाद् माजतात. आणि वाद् हे स्वभावतःच 'अपौरुषेय' असतात. दुसऱ्याकरितां तिसऱ्यांनीं काय करावें या गोष्टीला त्यामध्यें विशेष प्राधान्य असतें. त्यामध्यें 'तूं असें केलेंस' आणि 'मी असें करणार' अशी हमरीतुमरीची भाषा शोभून दिसत नाहीं. वाद् निर्जीव असतात; माणसाचा आत्मा फक्त त्यांच्या भांडणांतच व्यक्त होत असतो.

मुक्तकंठानें भांडणारीं माणसें मला मनापासून आवडतात. भांडणानें घडून येणाऱ्या विरेचनामुळें त्यांचा कोठा शुद्ध झालेला असतो. त्यांचीं मनें आंबलेलीं नसतात आणि त्यामुळें त्यांच्या मनांत जीवनाविषयीं ओढ असते. मनाच्या अस्वच्छ डब्यांत कोंडून टाकलेला संताप लवकरच खवट बनतो; मनाच्या या विकृतीचीं लक्षणें खवट बोलणें, तिरकस टीका करणें, धुसफुसणें, भांड्यांची आदळआपट करणें, वगैरे निरनिराळ्या पद्धतींनीं व्यक्त होऊं लागतात. वृत्तीचा उमदेपणा नष्ट होतो. वासनेची दडपलेली वाफ चडफडत आणि फुसफुसत बाहेर पडूं लागते. आपल्या पांढरपेशा स्त्रियांचा चिडखोर आणि चिडचिडा स्वभाव ही आमच्या गृहजीवनाची मी सगळ्यांत मोठी शोकान्तिका समजतों. त्याच्या उलट मराठमोळ्या समाजांतील स्त्री-पुरुष संबंध अधिक निर्मळ व सात्त्विक असतात, याची साक्ष मला त्यांच्या घरांतल्या प्रत्येक खणखणाटांतून मिळूं शकते. ज्या वेळीं

तार सप्तकांत जाऊन आमच्या बायका क्वचित् प्रसंगीं परंपरागत शिष्टाचाराचें जूं झुगारून देऊं लागतात, त्या वेळीं आमचें जीवनसंगीत अधिक भरघोस होत असल्याचा साक्षात्कार मला होऊं लागतो! धुसफुसणाऱ्या बायकोपेक्षां भांडणारी बायको अधिक चांगली, हें आपल्या इकडील नवऱ्यांना अजून कळलेलेंच नाहीं. कारण भांडणाऱ्या माणसाच्या भावना नेहमीं रसरशीत असतात. ज्याला कडकडून भांडतां येतें त्याला जीव गहाण टाकून प्रेम कसें करावें हेंहि चांगलें कळतें./

राणा भीमदेवी थाटाच्या भांडणाचा मी पुरस्कार करीत असलों, तरी त्याचा अर्थ मी हिंसेचा पुरस्कार करतों असा मुळींच नाहीं; किंवा कडकडून भांडणारीं माणसें मला आवडतात याचा अर्थ सतत भांडत राहणारीं माणसें मला आवडतात असाहि नव्हे. हीं दोन्ही निरोगी भुकेचीं लक्षणें नव्हेत. नेहमीं खावखाव सुटणें हें निरोगीपणाचें लक्षण कसें होईल? तसेंच रंगांत आलेलें भांडण अर्ध्यावर सोडून हिंसेंत घसरणें हेंहि खऱ्या 'कलावंता'ला शोभणारें नाहीं. भांडणाचा आनंद हा कांहीं अंशीं मद्यपानांतील आनंदासारखा आहे. हिंसा करणारा मनुष्य पुरा झिंगलेला असतो; त्याला अनुभव घेण्याचीहि शुद्ध नसते. 'खरा भांडणारा हा तन्मयतेच्या उंबरठ्यावर उभा असतो; तो कधीं तोल जाऊन हिंसेमध्यें पडणार नाहीं. शिवाय या 'शब्दसृष्टीच्या ईश्वराला' निर्जीव दगडाधोंड्यांची किंवा लाठीकाठीची जरूरच नसते./

प्रत्येक भांडणाराचा भाषेच्या अंगभूत शक्तीवर विश्वास असतो. शब्दांचें मानवी माध्यम असमर्थ ठरलें म्हणजेच हातापायांची हालचाल सुरू होऊं लागते. ज्याला भांडतां येत नाहीं तोच मारामारी करतो! म्हणून सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीनेंसुद्धां मारामारी सोडवण्यापेक्षां मुक्तकंठानें भांडायला शिकविणें अधिक महत्त्वाचें आहे. 'हसा आणि लठ्ठ व्हा' हें खरें असलें, तरी 'भांडा आणि निरोगी व्हा' हें त्याहूनहि अधिक मोठें सत्य आहे.

पण हा इलाजसुद्धां वेळींच करावा लागतो. भांडण्यापूर्वी माणसाला राग येणें आवश्यक असतें आणि कांहीं वेळां तर माणसाचें मन इतकें आंबतें कीं तो कोणावरच खवळूं शकत नाहीं. आयुष्याला रागावण्याइतकेंसुद्धां महत्त्व उरत नाहीं; कारण रागावणें किंवा भांडणें हीसुद्धां जीवनाचा सत्कार करण्याची एक

पद्धति आहे. भांडणारा प्रत्येक मनुष्य जीवनाची खंडणी भरीत असतो; त्याला जीवनाचें सार्वभौमत्व मान्य असतें; आणि तें देण्याची शक्ति जीवनाजवळ आहे किंवा तें हिरावून घेण्याची ताकद प्रतिपक्षाजवळ आहे असें तो गृहीत धरतो. आपली अपूर्णता, जीवनाची संपन्नता, आणि प्रतिस्पर्ध्यांची शक्ति या तिन्ही गोष्टी त्यानें मान्य केलेल्या असतात. म्हणून मला एखाद्याचा सर्वांत मोठा अपमान करावयाचा असला म्हणजे मी त्याच्याशीं भांडण करणें अगदीं कटाक्षानें टाळतों !

अर्थात् त्याची किंमत मला द्यावीच लागते आणि त्या किंमतीलाच ही आंवळेली मनःस्थिति असें म्हणतां येईल. म्हणूनच जेव्हां एखादा सामाजिक कार्यकर्ता किंवा वाङ्मयटीकाकार सार्वजनिक जीवनांत आपण शांत व धीरोदात्त असल्याचा देखावा निर्माण करतो, तेव्हां मी फसूं शकत नाहीं. त्याला भूक लागत नाहीं हें मला पटणें शक्य नसतें. तो बहुधा घरच्या माणसांशीं भांडून आपली भूक भागवीत असावा असें मला वाटूं लागतें. निदान आपल्या प्रतिस्पर्ध्यांशीं उघड उघड वैर मांडण्याइतकें धैर्य येईपर्यंत तो आपली भूक घरच्या घरींच भागवीत असतो.

तुम्ही म्हणाल, कांहीं महापुरुष घरींहि भांडत नाहींत आणि दारींहि. पण तरीहि ते निरोगी असतील तर त्यांना ही भूक सोडणार नाहीं. ते स्वतःशींच भांडत असतात ! स्वतःचाच जरासंध करतात; पहिला भाग दुसऱ्याला शापतो; दुसरा पहिल्याची टिंगल करतो; पहिला ' केलेल्या 'चा हिशेब दाखवतो; दुसरा ' न केलेल्या 'चा पाढा वाचतो; पहिला दम भरतो; दुसरा दांत विचकतो ! आणि कांहीं महापुरुषांच्या आयुष्यांतील हें भांडण तर अगदीं शेवटपर्यंत संपत नाहीं. त्यांचें हौतात्म्य हा हे दोन भाग पुन्हां एकजीव करण्याचा शेवटचा प्रयत्न असतो.

केसरी; ऑक्टोबर, १९५४

# पहिला पाऊस

शेवटच्या पावसाचें नि माझें हाडवैर आहे. एखाद्या महाकवीनें एखादें काव्य रचावें आणि त्याची पचपचीत नक्कल करून एखाद्या शब्दजीवि खटपट्यानें मधल्या मध्येंच टाळ्या मिळवाव्या ही गोष्ट खरोखरच चीड आणणारी आहे. शेवटचा पाऊस हा मृद्गंधाचा नजराणा आणणाऱ्या त्या पहिल्या पावसाची एक दुबळी नक्कल असते. तो शेवटचा असतो या एकाच भांडवलावर त्याचा भाव चढलेला असतो. उन्हाची संगत करून मोठ्यांच्या सहवासानें मोठें बनण्याचा प्रकार त्याला बराच साधलेला असतो ही गोष्ट खरी; पण तेवढ्या कारवाईनें तो सगळ्यांनाच बनवूं शकत नाहीं! कुठें शेतकऱ्यांच्या हातींतोंडीं आलेल्या घासांतच शेण कालव, कुठें छत्रहीन नागरिकांवर अचानक झडप घालून त्यांना झोडपून काढ, कुठें गणेशोत्सवांतील कार्यक्रमांचा बेरंग करून ते उधळून लाव, अशीं एक ना अनेक आततायी कृत्यें करून तो प्रसिद्धि पावतो. त्यामुळेंच त्याच्या लीलेचीं गह्लाभरू दैनिकांत मोठीं सुरस वर्णनें येऊं शकतात; आणि त्याच्या लहरींचे अंदाज बांधण्यांत मोठमोठे ज्योतिषी आपली अक्कल खर्च करतात. पण हा सगळाच प्रकार मला अगदीं आगाऊपणाचा वाटतो. बालकवींसारखीं प्रतिभासंपन्न माणसेंसुद्धां या प्रचाराला बळी पडलेलीं दिसूं लागलीं म्हणजे हळूहळू चांगलेपणावरचा विश्वास डळमळूं लागतो. पण इथें थोडा बालकवींवर अन्याय होतो असेंहि म्हणतां येईल. कारण बालकवींच्या ‘श्रावणा’मध्यें या शेवटच्या पावसापेक्षां पिवळ्या उन्हावरच अधिक भर आहे!

आणि हा शेवटचा पाऊस मध्यें शिरलाच तरी तो एखाद्या सुखान्तिकेंतील खलपुरुषाप्रमाणें असतो.

शेवटच्या पावसाबरोबरचें माझें हें हाडवैर कांहीं अंशीं वैयक्तिक अनुभवावर आधारलेलें आहे हें मी कबूल करतों. पण सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील पुष्कळशा हेव्यादाव्यांचें मूलस्वरूप तपासूं लागलें तर तिथें तरी आपल्याला दुसरें काय सापडूं शकेल? बहुतेक हाडवैरें हीं वैयक्तिक स्वरूपाचींच असतात; मग त्यानें घातलेला तात्त्विक झगा केवढाहि ऐसपैस असो. अशा वेळीं मोठ्या माणसांच्या वागणुकीनें आम्हां छोट्यांना दिलासा मिळतो. आणि मग माझ्यासारख्या सामान्य माणसाला या शेवटच्या पावसाविषयीं वाटणारा द्वेष उघडा करतांना फारशी लाज वाटत नाहीं. तें खाजगी कारण असें. नुकताच माझ्या कवितांचें हस्तलिखित काखोटीला मारून मोठ्या मोठ्या टांगा टाकीत मी एका प्रकाशकाकडे चाललों होतों. माझ्या स्वतःच्याच कविता उराशीं असल्यामुळें भर दुपारचें ऊनसुद्धां मला चांदण्यासारखें वाटत होतें! रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दिसणाऱ्या पुस्तकांच्या दुकानांमुळें माझ्या मनापुढें निरनिराळीं स्वप्नें तरंगत होतीं. कोणच्या लहानमोठ्या लेखकांच्या संगतींत माझें पुस्तक जाऊन बसणार याचा विचार मध्येंच गुदगुल्या करीत होता. पण इतक्यांत या शेवटच्या पावसाची अशी झिम्पड सुरू झाली कीं, मला प्रकाशकाकडे वेळेवर पोहोंचतांच आलें नाहीं; आणि जेव्हां पोंचलों तेव्हां माझ्या हस्तलिखिताचीं पानें अगदीं सद्गदित झालेलीं होतीं. प्रकाशकाला माझा सगळाच प्रकार मोठा चमत्कारिक वाटला. "आपण ऊर्दूमध्यें लिहिलेलें काव्य पाहूं शकत नाहीं" या एकाच वाक्यानें त्यानें माझी बोळवण केली. हातीं-तोंडीं आलेला प्रकाशक असा सहीसलामत सुटल्यावर होणारें दुःख माझ्या कविमित्रांना निश्चित कळूं शकेल. तेव्हांपासूनच माझ्या मूळच्या वैराचें स्वरूप या कडव्या हाडवैरांत झालें.

पहिल्या पावसावरचें माझें प्रेम हें या द्वेषाच्या पार्श्वभूमीवर खंबीरपणें उभें आहे. आणि म्हणूनच इथें एक गैरसमज होणें सहज शक्य आहे. एखाद्या माणसाचा अधिक्षेप करण्यासाठीं त्याच्या विरोधकाची (तटस्थपणाचा आव आणून) स्तुति करण्याचें तंत्र बहुतेक सज्जनांच्या परिचयाचें आहे. पण पहिल्या पावसा-बद्दलचा माझा जिव्हाळा हा दुसऱ्या कोणाचा उपमर्द करण्यासाठीं पांघरलेला

बुरखा नव्हे. पहिल्या पावसाविषयींचें माझें आकर्षण फार पुरातन आहे. त्याच्या-वर अनुरक्त होतांना मी दुसऱ्या कोणाच्या अस्तित्वाचीहि दखल घेतलेली नाहीं. मी अंगाला वस्त्र लावण्यापूर्वींच त्यानें मला भिजवलेलें आहे; आणि त्या शहार-लेल्या मनःस्थितींत माझ्या अंड्याचें कवच त्याच्या जळत्या चोचींनीं दुभंगलेलें आहे. त्या मृद्‌गंधानेंच मला पृथ्वीचा प्रियकर बनविलें आहे; आणि त्यानें रुजवलेल्या तेरड्यानेंच मी माझ्या पाटीवरील बेरीज-वजाबाक्या कायमच्या पुसून टाकल्या आहेत. पहिल्या पावसाचें ऋण मी अजून फेडलेलें नाहीं...आत्तां कुठें तें मला कळूं लागलें आहे.

सामान्यपणें 'पाऊस' हीच मुळीं एक अद्‌भुत गोष्ट आहे. पावसाविषयीं मीं विचार करूं लागलों कीं मला न कळतांच एका अज्ञात भूतकालाकडून माझें मन पछाडलें जातें. पृथ्वीवर पडलेला तो पहिला पाऊस मला आठवतो; त्याचे लिंबा-एवढे थेंब डोळ्यापुढें गरगरूं लागतात; लाव्हाच्या लाटांशीं चालणारा त्याचा भयानक संघर्ष डोळ्यांसमोर तांडव करूं लागतो. पृथ्वीवरचा तो पहिला पाऊस! त्यानंतर पडणारे सर्व पाऊस हे जणूं काय त्या पहिल्या अद्‌भुत प्रसंगाचें नाटक करीत असतात. त्या पहिल्या पावसाच्या पूर्वीं केवढ्यानें गाजलें असेल; विजा कशा चमकल्या असतील; आणि त्या पहिल्या मृद्‌गंधानें चढलेली धुंदी किती युगांनीं उतरली असेल—या न सुटणाऱ्या गहन प्रश्नावर माझें मन तरंगूं लागतें आणि पुन्हां पृथ्वीवर उतरणें जवळजवळ अशक्य होतें.

तो पहिला पाऊस पडण्यापूर्वींच जिवाला डोळे फुटते तर किती छान झालें असतें! कारण या पावसाचें पाणी पोटांत घेणाऱ्या नद्या अजून जन्मायच्याच होत्या; या पाण्यानें ओलेतीं होणारीं झाडें अजून उभीं राहिलीं नव्हतीं; आणि या पाण्यानें संध्या करणारे ऋषीमुनी अजून प्रकृतीच्या गर्भामध्येंच ओंकाराचा जप करीत बसले होते!...मग असें वाटूं लागतें कीं पावसाचा नि माणसाचा संबंध हा तर्काच्या पलीकडचा आहे. या पावसानेंच आपल्या आत्म्याला पंचेंद्रियाचा साज चढवला आहे. त्याचें तांडव पाहावें म्हणून त्यानें डोळे निर्माण केले; त्याची गर्जना ऐकावी म्हणून आपल्याला कान फोडले; त्याच्या मृद्‌गंधाला रसिक मिळावा म्हणून हें नाक जन्माला घातलें; आणि त्याचा गारवा अनुभवावा म्हणून त्वचेची योजना केली. शरीराच्या या उपाधीमागें या 'काळ्या'चीच कारवाई असावी!

सामान्य लोक ज्याला सृष्टीचा निर्माता समजतात तो देवसुद्धां 'घन'नीळ असतो याचा अर्थ हाच असला पाहिजे. आत्म्याच्यां मागें ही शरिराची उपाधि कां लागली या प्रश्नाचें समर्पक उत्तर तत्त्वज्ञानानें अजूनहि दिलें नाहीं; मला वाटतें, त्याला तें कधींच जमणार नाहीं. हा प्रश्न विचारायचाच असला तर तो या पहिल्या पावसालाच विचारला पाहिजे.

पण पहिल्या पावसाची भाषा मोठी गूढ असते. ती सगळ्यांनाच समजूं शकणार नाहीं. आपण जेव्हां कोणत्याहि प्रकारचें सृजन करीत असतों त्याच वेळीं त्या गूढ भाषेचा भावार्थ आपल्या लक्षांत येऊं लागतो. मग पावसाच्या प्रत्येक थेंबाचें एकेक बाळसेदार अक्षर बनूं लागतें; आणि प्रत्येक सरीला अथर्ववेदांतील ऋचांचें स्वरूप येऊं लागतें. पण सृजनाची धुंदी चढलेल्या कोणत्याहि आत्म्याला पावसाच्या या महाभाष्याची जरूरीच भासत नाहीं. ज्याला अर्थ कळूं शकतो तो अर्थासाठीं वळवळ करीत नाहीं! आणि जो वळवळ करतो त्याला कळत नाहीं! म्हणून पावसानें कोरलेले शिलालेख शेवटीं असंशोधित अवस्थेंतच विराम पावतात. निर्मिति करणारा मनुष्य हा आपल्या प्रेरणेंतच दंग असतो. पण निर्मिति करणाऱ्या निरनिराळ्या शक्तींतच एक खोल सहभाव असतो आणि त्यामुळें त्यांना परस्परांचें गुपित कळलेलें असतें. पहिल्या पावसाचें बळ शेतकऱ्याच्या दंडांत स्फुरूं लागतें, आणि सृजनशील श्रमाबरोबर साथ करतांना कलावंताच्या कलाकृतीमध्यें नव्या नव्या जाणिवांचे उन्मेष दिसूं लागतात. यांच्यामधील संबंध हा कार्यकारणाच्या पलीकडचा असतो; हे तिघेहि निर्मितीच्या प्रेरणेनें झपाटलेले असतात; सहप्रवाश्यांमध्यें असणारा सहभाव हाच त्यांना एकमेकाकडे आकर्षित करतो. पहिल्या पावसाची ही प्रेरकता शेतकऱ्यांच्या किंवा कवींच्या चांगलीच परिचयाची असते. वेदकालांत वरुणाला उद्देशून रचलेली सर्व कविता हें या आदिशक्तीचें एक स्तुतिस्तोत्र आहे. ऋषींच्या भाषेलाहि पार्थिवतेचा स्पर्श करण्याची शक्ति या मृद्गंधांत आहे. आणि त्यांत नवल असें कांहींच नाहीं; ज्याला मृद्गंध चढत नाहीं त्याला सोमरस तरी कसा चढणार.

सत्यकथा; डिसेंबर, १९५४

# पानगी

मी पानगीविषयीं बोलूं लागलों कीं माझे इष्टमित्र गालांतल्या गालांत हसूं लागतात. ते कां हसतात हें मला ठाऊक आहे. त्यांना वाटतें कीं मी एखाद्या काल्पनिक जगांत वावरत असतों; आणि जें हवेंहवेंसें वाटतें तेंच आहे म्हणून ओरडत सुटतों. पुष्कळदां असें होतहि असेल. ज्यांचें 'असें' होत नाहीं तीं माणसें एक रुक्ष तरी असतात, नाहीं तर रानटी तरी असतात. त्यामुळें माझ्या मित्रांच्या हसण्यानें माझा फारसा निरुत्साह होतो अशांतला भाग नाहीं. पण पानगीच्या सगुण रूपाविषयीं मी बोलत असतांना कोणीं हसूं लागलें कीं एका निराळ्याच कारणामुळें मला तें असह्य वाटूं लागतें. माझ्या भाषेचें अपुरेपण मला जाणवूं लागतें. पानगीची मुलायम चव माझ्या जिभेवर तरंगत असते; तिच्या हळुवार स्पर्शाच्या निव्वळ आठवणीनेंसुद्धां माझे ओठ हुरळलेले असतात. पण हें अद्‌भुत सेंद्रीय सत्य इतरांच्या अनुभवाला येईल अशा साक्षात्कारी भाषेंत मला सांगतां येत नाहीं. या असहायतेचें दुःख मला विलक्षण जाचतें. माझे शब्द पोरके बनतात. कितीहि बोळले तरी त्यांना पानगीची चव येत नाहीं. एका मर्यादेपर्यंत शब्दांनीं अनुभव निर्माण करतां येतो; पण त्या मर्यादेच्या पलीकडे अनुभवाला शब्द निर्माण करणें भाग पडतें. पानगीची चव सांगतांना माझें असेंच होतें; माझ्या भाषेचा 'झपूर्झा' होतो!

कुणाला वाटतें, मी अमृताशीं सामना करण्यासाठीं उभा आहें; कुणाला वाटतें,

मी पऱ्यांनीं भाजलेल्या भाकरीचें कौतुक चालवलें आहे. पण मला यांपैकीं कोणचीच गोष्ट सुचवावयाची नसते. मला फक्त माझ्या जिभेवर रेंगाळणारी ती पानगीची 'गालपापडी' चव तुमच्या जिभेवर सोडावयाची असते. तिची 'नरम नवलाई' तुम्हांला पटवायची असते. तिचा 'सइसाजूपणा' तुमच्या अनुभवाला आणावयाचा असतो. पानगी खाणारा मनुष्य शहाणा असेल तर तो पानगीची तुलना करणार नाहीं; फक्त आठवण करील. वस्तुतः पानगी ही पानगी-सारखी असते. आणि नेमकें हेंच मला इतरांच्या अनुभवाला आणतां येत नाहीं. अनुभव आध्यात्मिक असो कीं सेंद्रीय असो, प्रत्येक अनुभवाच्या कांठावर एक 'झपूर्झा' उभा असतो. आपल्या स्वतःच्या अनुभवाचा प्रत्यय दुसऱ्याला आणून देणें हें किती कठीण असतें हें माणसाला अशाच वेळीं प्रथम उमगूं लागतें; आणि तें करण्याची अनिवार्य इच्छाहि प्रथम तेव्हांच निर्माण होते.

माझी 'पानगी' ऐन रंगांत आली कीं एखादा मित्र माझा रसभंग करण्याच्या इच्छेनें हळूच सूचना करतो, "आम्हांला एकदां तुमच्या त्या पानग्याच घाला; तें दोघांनाहि सोपें पडेल!" याचा अर्थ मी एवढाच करतों कीं, पानगी ही काय चीज आहे याची कल्पना या माणसाला अजून आलेली नसावी. कोणीहि उठावें आणि पानगी करावी इतकी ती सोपी नाहीं. हीच चुकीची कल्पना उराशीं बाळगून मींसुद्धां माझ्या आतेष्टांना अनेक वेळां छळलेलें आहे. पण पानगी ही निव्वळ साधनें असून करतां येत नाहीं; ती नुसती तुमच्या इच्छेवर अवलंबून नाहीं. साधनें आणि इच्छा असलीं तर तुम्हांला किल्ला बांधतां येईल; पण पानगी करतां येणार नाहीं!

लग्नापूर्वीच बायकोला पानगी करतां येते कीं नाहीं हा प्रश्न विचारणें आवश्यक असतें! मला वाटतें, प्रत्येक शहाणा पुरुष हा प्रश्न विचारीत आला असावा. पण मी मात्र दुसऱ्या क्षुद्र मोहांना बळी पडून हा महत्त्वाचा प्रश्न अजिबात विसरून गेलों. बायकोच्या हातची पहिली पानगी खाल्ल्याबरोबर मी काय घोटाळा करून बसलों याचा अर्थ मला प्रथम लागला...मला आईच्या हातच्या त्या खऱ्या पानग्या आठवल्या; ती शनिवारच्या सकाळच्या शाळेची धांदल आठवली; आईनें पहांटे दळलेलें पीठ आठवलें; आंघोळीच्या पाण्यावर वाढणाऱ्या केळीचे फाळके आठवले; आंब्याच्या लाकडांनीं धगधगलेली ती थंडीमधली चूल आठवली;

सगळ्या भावंडांनीं कोंडाळें करून खाल्लेली ती अर्धी अर्धी पानगी आठवली... ही चव अगदीं निराळी होती. हींत कांहीं तरी कमी होतें; किंवा जास्ती होतें! वस्तुतः पुष्कळ वर्षांत पानगीची आणि माझी गांठ पडलेली नव्हती. पण तरी-सुद्धां ही पानगी मला फसवूं शकली नाहीं. त्या वेळीं मी अगदीं सभ्यपणानें वागलों. रेशनिंगच्या तांदुळांना शिव्या दिल्या. कोकणांतील तांबड्या तांदुळाच्या रुचीचें बहारदार वर्णन केलें; आणि सरकार बदलल्याशिवाय खरी पानगी मिळणें कठीण आहे असा उत्तरपक्ष करून स्वच्छ हात धुतले.

मात्र तेव्हांपासून मीं एकच खूणगांठ मनाशीं बांधली; पानगी हा बायकोनें करावयाचा पदार्थ नव्हे. माझ्या बहिणी, मावश्या या सर्व आपापल्या परीनें माझें कौतुक करण्यासाठीं मीं कोंकणांत गेलों कीं न विसरतां पानग्या करतात. पण त्यांनाहि त्या जमत नाहींत. अर्थात् त्या मीं चांगल्या चांगल्या म्हणूनच खातों. आणि तेव्हां मीं खोटें बोलतों अशी मला जाणीवहि नसते. पण ज्या पानगीचें वर्णन मीं माझ्या मित्रांपुढें नेहमीं करीत असतों ती पानगी निराळी असते. तशी पानगी फक्त 'आपल्या' घरींच करतां येते. ती करणारे हात 'निराळे' असतात आणि ती खाणारे दांत 'कोवळे' असावे लागतात! माणूस जसा जसा मोठा होत जातो तसा तसा तो घरापासून कुठें तरी दूर वाहत असतो. आणि घरापासून जितकें दूर जावें तितकीं सर्व माणसें आणि सर्व पदार्थ आपल्याला सारखे वाटूं लागतात. हळूहळू खरें आणि खोटें यांतला फरकहि दिसत नाहींसा होतो! कोकणांतील आमच्या घरासमोर एक इर्लेटोकीचा उंच डोंगर होता; लहानपणीं त्याच्या पलीकडे काय काय असेल याविषयीं माझ्या मनांत एक विलक्षण कुतूहल होतें. तें कुतूहल आतां संपलेलें आहे. त्या डोंगरापलीकडे 'सर्व सारखें' आहे. आतां मीं खातों त्या सगळ्या पानग्यांची चव मला सारखीच लागते. हल्लीं खऱ्या पानग्या कोणालाच करतां येत नाहींत...

पण हेंहि तितकेंसें खरें नव्हे. कांहीं वर्षांपूर्वीं मथुआत्तेकडे खाल्लेली ती 'भयंकर' पानगी मला आठवते; आणि मग हा अतिशयोक्तीचा ताबूत कोसळून पडतो. मथुआत्ते वारण्यापूर्वीं मी तिला भेटायला गेलों होतों. ही एक लोकविलक्षण बाई होती. चाळीस वर्षांपूर्वींच या ब्राह्मणाच्या बालविधवेनें कोकणामध्यें राहूनहि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनण्याचा निर्धार केला होता.

कुड्याच्या पानांत विड्या वळून ती आसपासच्या व्यापाऱ्यांना विकी व उदरनिर्वाह चालवी. ती अगदीं एकटी होती आणि तरीहि कडवटपणाचा अंश तिच्या मनाला शिवलेला नव्हता. आतां तर ती जवळजवळ आंधळी झाली होती; पण तरीहि तिनें आपलें एकटेपण गमावलें नव्हतें. तिच्या कैवळ्याच्या झोपडींतील प्रत्येक वस्तूलाच डोळे होते; त्या वस्तूंनींच तिला संभाळलें होतें. पुष्कळ वर्षांनीं मी तिला भेटायला गेलों होतों. तिला पाहिलें आणि माझी छाती दडपून गेली. मी हातांत डोकें धरून—कोपऱ्यांतलें एकुलतें मुसळ, भिंतीशीं तिरकस उभें असलेलें जातें, गुरुचरित्राची सोवळ्यांत बांधलेली पोथी, खिडकीजवळच्या रुंद फणशी फळीवरील अर्धवट उलगडलेली वळकटी, कोनाड्यांतील कालिकामूर्तीची जुनी प्रत,—या सर्व गोष्टींकडे भकास मुद्रेनें पाहत बसलों. म्हातारी चुलीजवळ गेली. मला वाटलें, शेकत बसली असेल. जरा वेळानें कांहीं तरी चरचरल्याचा आवाज झाला. मीं म्हटलें, "आत्ते, हें काय?" आत्ते म्हणाली, "अरे, तुला पानगी आवडते ना? केलें काय तरी; आपला पूर्वीचाच राहिला असलास तर आवडेल." तिची असहाय अवस्था पाहत पानगी गिळणें अशक्य होतें; पण मीं म्हटलें, "आत्ते, तुझी पानगी आईपेक्षां चांगली झाली आहे." त्या पानगीची चव मी कधींच विसणार नाहीं. शहाणे लोक त्या वेळीं जग जाळण्यांत गुंतले होते; आणि ही आंधळी म्हातारी त्याच वेळीं माझ्याकरितां एक 'भयंकर' पानगी भाजत होती!

त्या दिवशीं रात्र दुभंगली; मला एक स्वप्न पडलें...माझी जीभ लांब होऊन तोंडाबाहेर चालली आहे...अंधारांत वळवळते आहे...कांहीं तरी रापते आहे... ती मला आंत ओढतांच येत नाहीं...तिनें आवंढा गिळतां येत नाहीं...ती मला मानीत नाहीं...ती फक्त पुढें पुढें रावते आहे...तिला सापासारखे टकमक डोळे आहेत...आणि ती दूर जाऊन पुन्हां माझ्याकडेच पाहते आहे. मी घाबरून ओरडणार, इतक्यांत तिला अंधारांतल्या तापलेल्या तव्याचा चटका बसतो आणि ती आकुंचित होऊन पुन्हां परत तोंडामध्यें येते; मी जागा होतों तेंव्हां माझी उशी घामानें भिजलेली असते.

•

आतां पानगी खातांना मी भलत्याच अपेक्षा करीत नाहीं; आणि कोणाला शिव्याहि घालीत नाहीं. त्या वेळीं मी एका चमत्कारिक तंद्रीत असतों. 'पूर्वीचाच राहिला असलास तर आवडेल' हे शब्द माझी पाठ सोडत नाहींत. आणि

कोणतें तरी कडू सत्य स्वतःपासून लपविण्यासाठीं मी पानगी आवडल्याचें अवसान आणतों. खाण्याजेवण्यामध्यें मी आतां पुष्कळसा माणसाळलों आहें असें माझ्या बायकोचें मत आहे. माझा शांतपणा पाहून पूर्वपरिचितांना कांहींसें आश्चर्य वाटतें. पण मला आत्मज्ञान केव्हां झालें हें त्यापैकीं कोणालाच कळलेलें नाहीं. अजूनहि पानगीविषयीं गप्पा निघाल्या कीं मी पूर्वीइतकाच उत्साहानें बोलत असतों. जुन्यांचें कौतुक करतों; नव्यांची टिंगल मारतों; पण आतां माझ्या भाषेचा प्रतिध्वनि मलाच भेडसावीत असतो. पानगीची ती जुनी चव मला अजूनहि तुमच्या जिभेवर सोडतां येत नाहीं; मथुआत्तेचीही 'भयंकर' पानगी मात्र मला स्वतःविषयींचें एक विदारक सत्य पुन्हां पुन्हां दाखवीत असतें; तें मला पाहावेंच लागतें; आणि तें पाहतांना मी अगदीं एकटा असतों.

केसरी; फेब्रुआरी, १९५५

# मामाचें घर

मामाचें घर चिरेबंदी नसतें. त्याच्या भिंती मातीच्या असतात. पुढच्या दारची पडवी उघडी असते. आणि या उघड्या पडवींत माजघराकडच्या भिंतीला तीन खुंट्या असतात; त्यांतल्या एका खुंटीवर मामांचा सदरा आणि उपरणें असतें; दुसऱ्या खुंटीला एक पंचांग लोंबत असतें आणि तिसऱ्या खुंटीवर एक सुपारीचें शिपट टांगलेलें असतें. मामाच्या सुपाऱ्या ओल्या आणि पिवळ्याधमक असतात. मामाच्या घरीं इतक्या सुपाऱ्या कशा असतात याचें मला नवल वाटतें ! इतक्यांत घाडी वठारांतील लंगडा तुका पालंडींतून आंत शिरतो आणि खोताकडे "चार आण्याच्यो सुपाऱ्यो हव्यो हत" म्हणून सांगतो. आपल्या जानव्यांतून बोट फिरवीत आणि असें करतांना तें पाठीवर घांशीत मामा "पैसे खय हत ?" म्हणून विचारतात. एक बावळा उडवीत तुका 'ॲ ॲ' करतो; पण तो बोलण्यापूर्वींच "पैसे आणल्याशिवाय सुपाऱ्यो मिळोच्या नाऽय" असें मामा हेल काढून निक्षून सांगतात. या पडवींतच पावठण्यापलीकडे एका उसवलेल्या गोणपाटावर काथ्यानें भरलेला गोणपाटाचा तक्क्या टेकायला घेऊन आजोबा खोकत असतात. ते चळ आवरल्यावर घुरघुरणाऱ्या आवाजांत मामांना म्हणतात, "अरे शिवरामा, असें एकदम नाहीं म्हणूं नये रे. कोणावर कसा प्रसंग, कोणावर कसा प्रसंग. आज गणूची स्थिति..." पुन्हा चळ येते. मामा कांहीं तरी पुटपुटत आंत माजघरांत जातात. आंतून मामींचा आवाज येतो, "म्हणतील तर काय झालें ?

त्यांना काय झालें म्हणायला? पोटें जाळायचीं आहेत ना आम्हांला." मामांची मूळची गरिबी असली तरी आतां बरीच चलती असते. गांवांतलें म्हारपोर म्हणतें, "पार्वतीवैनी घरांत इल्यापासनां भट सांवरलो." आणि तें खरें असतें.

मामांचें माजघर त्यांतल्या त्यांत अधिक 'प्रशस्त'. (मामा 'प्रशस्त' असेंच म्हणतात!) त्याच्या एका कोपऱ्यांत देव्हारा असतो. देव्हाऱ्यावर मांडवी असते आणि मांडवीला एक नारळ टांगलेला असतो. मांडवीवरतीं दोन मुकटे असतात; एक कद असतो आणि एक आजोबांची धावळी असते. देव्हाऱ्यामध्यें पंचायतन असतें. एक उजव्या सोंडेचा गणपती असतो! एक मोठा पण विचित्र आकाराचा शंख असतो. त्याची मला भीति वाटते. म्हणून मी पूजा करायची टाळतों. मी म्हणतों, "माझ्याजवळ सोवळ्याची लंगोटी नाहीं." मामी म्हणते, "अरे, माझी चोळी नेसलीस तरी चालेल." मग मामांची मुलगी सुली हसूं लागते. मी लाजून बागेंत पळतों. ती तिकडे येते आणि फिदिफिदी हसूं लागते. पण मी फणसावर चढतों; आणि विहिरीवर कललेल्या खांदीवर ओळकुंबूं लागतों; मग सुलीला भीति वाटते आणि ती मुळींच हसत नाहीं. जरा वेळानें आम्ही दोघें परत घरांत येतों. आजोबा पूजेसाठीं धावळी नेसत असतात. आजोबा धावळी नेसतांना आम्हांला गंमत वाटते. आम्ही पुष्कळ खिदळतों. मग धुणें वाळत घालायची काठी घेऊन आजी अंगावर येते. आम्ही शिडीच्या आधारानें माळ्यावर चढतों. पूजा झाली कीं आजोबा हांक मारतात. दुधाची वाटी मी एकट्यानेंच पिऊन टाकतों. सुलीकरतां कांहींच शिल्लक ठेवीत नाहीं. मग सुली रडूं लागते, संतापते, हातपाय आपटते, "तूं आपल्या घरीं जा" म्हणते. आजोबा म्हणतात, "असें बोलूं नये गो—वेडे, तो कुठें जाईल?" मग आजोबांचें तोंड वांकडें होऊं लागतें. त्यांचा खालचा ओंठ आंतबाहेर होतो. ते वस्त्रालाच आपलें नाक पुसतात. मग त्यांच्या तें लक्षांत येतें! त्यांचें तें तोंड पाहून मला फणसावरील माकडाची आठवण होते! मला हसायला येतें. मामी वैश्वदेवाकरतां भात आणते; आणि माझ्याकडे मान वळवून हनुवटी हवेंत खुपसते. तिला कांहीं तरी बोलायचें असतें; पण ती तें आंवरते.

माजघराच्या माळ्यावर खूपच गमती असतात. लांब लांब हिरांच्या पांचदहा वाढवणी असतात. इतक्या वाढवणी मीं कधींच पाहिलेल्या नसतात. मला वाटतें,

त्या सगळ्याच आपण आपल्या घरीं न्याव्या आणि आईला द्याव्या; मग आईला खूप आनंद होईल. पण मामा म्हणतात, "तूं वर्षभर इथेंच रहा आणि माझ्या-जवळ इंग्रजी अक्षरें शीक." मामांना सगळें येतें. त्यांचीं पुस्तकें फार जाडीं असतात. सगळी मंडळी झोंपली कीं मामा तीं वाचीत बसतात. घरीं अभ्यास करून ते वकील होणार आहेत असें मामी म्हणते. कधीं कधीं मामीहि जागत बसते. ते किती वेळ वाचतात हें मला पाहायचें असतें. पण मला अगोदरच झोंप येते. सुली केव्हां तरी अजूनहि अंथरुणांत मुतते; मग मामा तिला बडवून काढतात. मला फार भीति वाटते. माझें तसें होऊं नये म्हणून मी एकटा माळ्यावर जाऊन देवाची प्रार्थना करतों. कारण मामांच्या माळ्यावर आणखी एक देव्हारा आहे. पण त्याच्यांत देव नसतात. त्यामध्यें एक नारळ असतो. माळ्यावरील एका कोपऱ्यांत तर एक नारळांचा मोठा ढीग असतो. मोहाचा नारळ मला हवा असतो. पण तो उमगून काढणें कठीण असतें. मी मामीला पुष्कळदां विचारतों. ती चार दिवसांनीं फोडूं म्हणते. माळ्यावर पत्रावळींचे दोन गठ्ठे असतात. एक गठ्ठा वडाच्या पत्रावळींचा असतो; दुसरा पळसाचा असतो. त्या गठ्ठयांच्या खालीं एक मोठा पेटारा असतो. पेटाऱ्याला एक मोठें कुलूप असतें. त्या पेटाऱ्यांत काय आहे तें आम्हांला पाहायचें असतें. पण तें आम्हांला कोणीच दाखवीत नाहीं. आम्ही माळ्यावर गेलों कीं "पेटारेशीं कोण गो धडपडचेसे?" असें म्हणून आजी कांगावा करते. पण तिला हल्लीं शिडीवरून चढतां येत नाहीं; त्यामुळें आम्हांला तिची फारशी भीति वाटत नाहीं. तरी पण आजी मामीला पुन्हां पुन्हां म्हणत असते, "अगो पार्वती, पेटारेशीं कोण गो धडपडचेसे?" मामीला त्याचा राग येतो. ती आम्हांला ओरडल्यासारखें करते आणि आजीला म्हणते, "उगाच ओरडाओरड करवेची? पोरांना का पेटी उघडणारसे?" पण इतक्यांत नारळांच्या ढिगांतून एक उंदीर पेटाऱ्यावर उडी मारतो. आम्हांला भीति वाटते आणि 'उंदीर, उंदीर' करीत आम्ही खालीं उतरतों. स्वप्नांत मला उंदराचे डोळे दिसतात.

मामांच्या स्वैपाकघरांत दोन चुली असतात. त्यांतली एक मातीची असते आणि एक चिऱ्याची असते. सणाच्या दिवशीं चिऱ्याची चूल पेटवतात; पण एरवीं नेहेमींचा स्वैपाक मातीच्या चुलीवरच करतात. स्वैपाक मामीच करते आणि मुळीं मीठ घालायचेंच विसरते. पण मामी विटाळशी असली कीं स्वैपाक

आजीलाच करावा लागतो. मला तिचा स्वैपाक मुळींच आवडत नाहीं. तिला भाकऱ्या भाजतांच येत नाहींत. भाजल्यान् तर त्या फुगत नाहींत. मामा "निदान भाकऱ्या मला भाजूं दे" म्हणतात; पण त्यांना ती भाजायलाच देत नाहीं. "मे मेल्या कीं भाज हो, बाबा" असें म्हणते. पण मला वाटतें, आजी कधींच मरणार नाहीं. आजी मुळीं आहे तशीच राहणार. मामांकडे मुळीं कोणी कधींच मरणार नाहीं. मामांच्या देव्हाऱ्यांतील गणपतीविषयीं आईनें मला कांहीं तरी बरेंच सांगितलें होतें; आणि मला पुष्कळ भीति वाटली होती. पण मला तें आतां कांहींच आठवत नाहीं; फक्त भीति आठवते. आजीला कसलीच भीति वाटत नाहीं. ती स्वैपाक करतांना भाताच्या झांकणीवर हातानेंच निखारे टाकते! दुभत्याच्या पेटाऱ्यांतील झुरळ हातानें खिडकीबाहेर फेंकते. पहिला पाऊस पडला कीं स्वैपाकघरांत सगळीकडे डोंगळेच डोंगळे होतात; त्यांतले कांहीं पंखवाले असतात. एकदां सुलीला डोंगळा चावला तो ओढून काढतांना त्याचें मुंडकेंच तुटलें होतें; आणि तें काढल्यावर मग रक्ताची धार लागली होती. मामांकडचे डोंगळे फार भयंकर असतात. पण आजीला त्यांची मुळींच भीति वाटत नाहीं. तिला मुळीं ते दिसतहि नाहींत आणि चावतहि नाहींत! स्वैपाकघराच्या दाराशीं ताकमेढ आहे. आजीला ताक करतां येत नाहीं. तें मी ओढतों. सुली ओढूं लागली तर तिच्या हातांतून दोरी निसटून जाते आणि खालीं गुंडांत पडते! पण माझ्या ताकावर सगळ्यांत जास्त लोणी निघतें, असें मामी म्हणते. म्हणून मामी विटाळशी असली कीं नेहमीं मीच ताक करतों. ताक करतांना मध्येंमध्यें थांबून मी लोणी आलें का तें पाहतों. कारण थोड्या वेळानें हात दुखूं लागतात. पण तें मी कोणाला सांगत नाहीं. मला लाज वाटते. परवां लोणी आलें काय हें पाहतांना माझी लाळच गुंडांत पडली! पण मीं तें कोणालाच सांगितलें नाहीं; आणि कधींच सांगणार नाहीं; सुलीलासुद्धां सांगणार नाहीं. ती लगेच मामीला सांगेल. मला मामीची भीति वाटते. म्हणूनच मी लोणी मागत नाहीं. मला आवडत नाहीं म्हणून ऐट आणतों. मग मामी छान छान हसते. इतक्या लोण्याचें पुढें काय होतें तें मला कळत नाहीं. नैवेद्याच्या ताटावर अन्शुद्ध वाढतात. आणि त्या ताटावर रोज मामाच बसतात. मामा जेवतांना बोलत नाहींत. आजोबा मला आपल्याजवळ बसवतात आणि आपल्या आमटींतील आटळा माझ्या पानांत घालतात. पण त्यांचीं बोटें घाण असतात. आणि ते सारखे खोकतात; म्हणून मला त्यांच्या आटळांची किळस येते. मला फक्त आईचें

उष्टें आवडतें. मामाकडे खूप आठळा असतात. मी जातांना आईसाठीं एक पिशवीभर आठळा नेणार आहें; पण मामा म्हणतात, "तूं वर्षभर शिकायला आला आहेस; तूं माझ्याजवळ इंग्रजी अक्षरें शीक." पण मामांना शिकवायला वेळच होत नाहीं! त्यांना वेळ होऊं नये असेंच मलासुद्धां वाटतें; पण मी तसें कोणाला सांगत नाहीं. उलट, मामा कामांत असले कीं मी 'शिकवा', 'शिकवा' असेंच करतों.

मामांच्या दोन बागा आहेत. एका बागेंत नुसतीं कलमें आहेत; आणि दुसऱ्या बागेंत माड, पोफळी आणि फणस आहेत. मामांचा एक माड गांवांतल्या इतर सर्व माडांहून अधिक उंच आहे. लंगड्या तुक्याचा मुलगा 'बाबू' मुंबईला असतो. तो म्हणतो कीं, मुंबईतसुद्धां इतका उंच माड सांपडणार नाहीं! त्या माडामुळें वाणीवठारांतील मुलांची आम्ही पर्वा करीत नाहीं. शिवाय मामांच्या 'हजाऱ्या' फणसाला सगळ्यांत जास्त फणस येतात. मला कापे गरे जास्त आवडतात. मी सबंध फणससुद्धां खाईन. पण मामांचा 'उभा माडा' अजून धरतच नाहीं. आजी म्हणते, तो पुढच्या वर्षी धरेल. मामांच्या बागेंत एकच पेरवीण आहे; तिच्यावर खूप पेरू येतात; पण ते पिकण्यापूर्वीच पोपट खाऊन टाकतात. मला हिरवे पेरूसुद्धां आवडतात; पण मामा रागावतील म्हणून ते आम्हांला चोरून खावे लागतात. सुलीला खायला दिले कीं सुली कोणाला सांगत नाहीं! कलमांची बाग घरापासून फार दूर आहे. ती मीं अजून पाहिलेली नाहीं. मामा आम्हांला बरोबर नेत नाहींत. तें ठिकाण मामांनीं नुकतेंच विकत घेतलें आहे, किंवा काय तरी गहाण घेतलें आहे. आम्ही 'येतों, येतों' केलें कीं आजोबा मामांना म्हणतात, "शिवरामा, माझें म्हाताऱ्याचें ऐक. शहाणा असलास तर या सोन्यासारख्या पोरांना इतक्यांत त्या ठिकाणांत नेऊं नको हो."

सत्यकथा; मे, १९५५

# ह्या माझ्या पाऊलवाटा

या माझ्या पाऊलवाटा अजून जगाला अज्ञात आहेत. त्यांचे नकाशे अजून कोणीहि काढलेले नाहींत किंवा शालेय भूगोलानें आपले घारे डोळे अजून या वाटांवर वटारलेले नाहींत. त्यांचें जीवन अजूनहि अगदीं खाजगी आहे. आणि म्हणूनच माझें मन या पाऊलवाटांशीं विशेष सलगी करतें. त्यांच्या आठवणी मनामध्यें रेंगाळत राहतात. त्या पुन्हां पुन्हां चघळण्यांत एक चोरटा आनंद होतो. कारण पाऊलवाटेनें चालणारा मनुष्य सृष्टीच्या शयनगृहांतच डोकावीत असतो! तिथें ऐकूं येणारी कुजबुज मोनमोकळी असते. शिवाय प्रत्येक वाटेला एक स्वतंत्र व्यक्तित्व असतें. तिच्या हुल्कावण्या, तिचे चढउतार, तिचे आळोखेपिळोखे, तिचा नोकझोक हीं सर्व तिच्या स्वभावाशीं सुसंगत वाटतात. या पाऊलवाटांच्या विविध ढंगांमध्यें अष्टनायिकांचें वैचित्र्य आढळतें. त्यांच्यामध्यें डोंगरावर कोपर टेकून उभी राहणारी खड्या चढावाची मानिनी असते; उत्तुंग पहाडाशीं भांडण करून उलटी फिरणारी खंडिता असते; गर्द व ओथंबलेल्या झाडींतून लपतछपत पुढें सरकणारी अभिसारिका असते आणि पहाटेच्या दवानें मंदावलेली विझलेल्या ओठांची स्वाधीनपतिकाहि असते. पण या सर्व नायिका सड्याच्या कातळावर पोहोचल्या कीं एकदम विरक्त बनतात! जणूं काय आपण त्या गांवच्याच नव्हे असा आव आणतात. हा त्यांचा साळसूदपणा मला बिलकूल आवडत नाहीं!

माझ्या जुन्या आठवणी निराळ्याच पाऊलवाटांना विलगून बसलेल्या आहेत. पुष्कळ जुनीं माणसें अजूनहि त्या पाऊलवाटांवरून चालत असावीं असें वाटूं लागतें. आपल्या पुष्कळशा नातेवाइकांचीं घरें हे त्या पाऊलवाटांनाच फुटलेले डोळे, अशी चमत्कारिक कल्पना मनामध्यें चमकून जाते. पण पुन्हां जरा वेळानें त्या पाऊलवाटा तेवढ्या खऱ्या वाटतात आणि त्यांचीं दोन्ही टोकें हळूहळू पुसट होत जातात.

मामाकडे जाणारी ती पाऊलवाट कशी नव्या नवरीसारखी नटलेली वाटायची. पिवळ्यापिवळया सर्पटोळीप्रमाणें तीं वळणें-आडवळणें घेत घेत शेवटीं धनगराच्या घाटीनें वर व्हायची...प्रथम भटाची पाळंद; मग संन्याशाचा माळ; त्याच्यापुढें घारोबाचा आडवा; आणि अगदीं धारेच्या जवळ ती धनगराची घाटी. ही घाटी महाविकट. तिच्या एका बाजूला स्थानेश्वराचे खोल घोळ आणि दुसऱ्या बाजूला बोडकीचा डोंगर...या दोहोंमधील निसरड्यावर तोल सावरीत ती एकदम सड्याच्या कातळावर उभी राहायची...तिथें पोहोचलें कीं मामाच्या घराजवळील सातवण्याचें झाड उमगूं लागायचें...आणखी दोन कोस गेलें कीं मामाचें घरसुद्धां दिसायचें. त्या वेळीं मामाच्या घरावर कौलांऐवजीं केंबळा असे. पण त्या खोपटीला एक स्वप्नाचें टोपरें होतें! पुढें मामाच्या घरावर केंबळ्याऐवजीं कौलें आलीं आणि मीहि पाऊलवाटेऐवजीं मोटारीचा आश्रय करूं लागलों...तेव्हांपासून तें स्वप्नाचें टोपरें फाटून गेलें आणि मामाचा चिरेबंदी वाडा त्या लिंबोणीच्या झाडाबरोबरच अदृश्य झाला...अजूनहि केव्हां तरी त्या पाऊलवाटेनेंच मामाकडे जावें अशी लहर येते; पण कसली तरी भीति वाटते आणि मग मी सरळ मोटारचें तिकीट काढतों...आतां मी मामाकडे जातों, पण 'आजोळीं' कधींच पोचत नाहीं; 'आजोळीं' जायचें असेल तर पाऊलवाटेनेंच जावें लागतें!

मग तुम्ही गड्याच्या खांद्यावर बसून गेलांत तरी हरकत नाहीं. लख्याच्या खांद्यावर बसूनच या पाऊलवाटेशीं माझा प्रथम परिचय झाला होता. मी पांच वर्षांचा होतों त्या वेळीं लख्याचें वय साठीच्या घरांत होतें. ऐन उमेदीमध्यें त्याच्या ताकदीचा गडी आमच्या पंचक्रोशींत नव्हता. त्याच्या ताकतीच्या अनेक आख्यायिका अजूनहि सांगितल्या जातात. पावणाईच्या चौथऱ्याचीं सगळीं तोडें त्यानें एकट्यानें

आणलीं; दादा खोताचा गोठा कोसळला तेव्हां सगळें वलाट दंडावर सावरून त्यानें दोन वासरें वाचवलीन. पण तरीहि मी लख्याच्या खांद्यावरून मामाकडे जात असें त्या वेळीं त्याला चांगलीच धाप लागे. त्या वेळीं लख्या थकलेला होता. कोणी म्हणत, तो पोटाकडून थकला. तरुणपणीं त्यानें पुष्कळच छातीफोडीं कामें केलेलीं होतीं; अजूनहि त्याच्याच नवलकथा त्याच्या कानावर घालून पुष्कळ न झेपणारीं कामें लोक त्याच्याकडून करवून घेत. लख्यालाहि तीं करावींशीं वाटत; न करण्यांत कमीपणा वाटे. पण आतां त्यानें एखादें मोठें वजन उचललें कीं त्याच्या कण्याची हालचाल कांहीं चमत्कारिक होई. त्याच्या खांद्यावर बसलें कीं त्याच्या खांद्याचें हाड कुल्ल्याला टोचूं लागे. मला तें पुष्कळदां असह्य होई. पण हें त्याला कसें सांगावें तेंच मला कळत नसे!...अजूनहि लख्याचें नांव निघालें कीं लोक त्याच्या शक्तीच्या अद्‌भुत आख्यायिका सांगतात; पण मला आठवतें तें मात्र त्याच्या खांद्याचें हाड...आणि त्याच्या कण्याची ती चमत्कारिक हालचाल.

पुढें थोडा मोठा झाल्यावर मी लख्याच्या सोबतीनें आडिवऱ्याच्या जत्रेला जाऊं लागलों. आडिवऱ्याची ती पाऊलवाटसुद्धां कधीं तरी मध्येंच आपला डोळा मिचकावल्यावांचून राहत नाहीं. ही पाऊलवाट सड्यावरच्या जांभ्या कातळावरून सरपटत सरपटत पुढें जाते. या वाटेभोंवतीं पसरलेलें जांभें कातळ त्या वेळीं अस्ताव्यस्त, अनंत, अपार वाटे...कधींहि न संपणारें...सतत पसरणारें... घुमणारें, घुमघुमणारें. नवख्या प्रवाशाला कांहीं कांहीं ठिकाणीं हें कातळ यःकश्चित् पायाच्या दणक्यानें असें कां घुमघुमतें हें एक मोठें कोडें पडे. मलाहि त्याची भीति वाटे. संध्याकाळीं या आवाजाला हुंकाराचा स्पर्श होई; आणि मग मी हलक्या आवाजांत लख्याला त्याचें कारण विचारण्याचा प्रयत्न करी; पण लख्याहि अशा वेळीं उत्तर देण्याच्या मनःस्थितींत नसे. तो एवढेंच म्हणे, "मुकाट्यान माझ्या मागसुन ये." एरवींसुद्धां आडिवऱ्याच्या देवीकडे जाणारी ही पाऊल-वाट मोठी फसवी वाटे. पुष्कळ ठिकाणीं ही पाऊलवाट त्या अपरंपार जांभ्या कातळामध्यें केव्हां विलीन होई आणि पुन्हां केव्हां प्रकट होई हेंच कळत नसे. लख्या हा डोळे बांधून चालणारा; पण तोहि या वाटेच्या चक्रव्यूहांत पुष्कळदां गुरफटलेला होता. एकदां तर झपाटलेल्या माणसाप्रमाणें आम्ही दोघांनींहि त्याच त्याच गडग्याभोंवतीं दोनदां प्रदक्षिणा घातल्या. एखाद्या व्यक्तीप्रमाणें या वाटेचें चरित्र लिहिणें शक्य आहे. कोकणांतील सगळ्या भुतांची खानेसुमारी अजून

झालेली नाहीं. ती होईल त्या वेळीं या पाऊलवाटेचें महत्त्व जगाला आपोआप कळून चुकेल!

पाडगांवच्या दत्ताकडून येगारी पाऊलवाटहि अशीच चमत्कारिक आहे. हिच्यासारखी खडी घाटी मी अजून पाहिलेली नाहीं. ही पाऊलवाट सतत शीर्षासन करीत असते! या कोसळत्या पाऊलवाटेवरून घसरत घसरत माणूस भलतीकडेच वाहवूं लागतो. मग तिठ्यांना संगमाचें तेज चढूं लागतें. तीन पाऊलवाटा जिथें एकमेकींना भेटतात तिथें एक क्षण तरी उभा राहिल्यावांचून मी पुढें जात नाहीं. तीन वाटा एक होणें ही एक गूढ घटना आहे. अनेकांत एक शोधणारें मन प्रत्येक तिठ्यावर पद्मासन घालून बसतें! मग जवळच असलेलें एखादें जुनाट देवणें देवळाप्रमाणें भासूं लागतें; अशा वेळीं एखादा साप त्या देवण्यांतून बाहेर पडला तर त्याला दगड मारण्यापूर्वीं कोकणांतील मनुष्य दहा वेळां विचार करील. माझ्यासारख्या नास्तिकालासुद्धां त्या फणेवरील दहाच्या अंकांत दशावतारांची महामुद्रा दिसूं लागेल! अशा वेळीं करंदीचे कोवळे तुरे सोलून खातांना भ्रूणहत्या केल्याचा भास होईल. दगडालाहि दुखविण्याचें तुम्हांला धैर्य होणार नाहीं. पण खऱ्या बुद्धिवाद्याला या शरणागतीची लाज वाटत नाहीं. असल्या या तिठ्यापुढें बिचाऱ्या तर्काचें कांहीं चालत नाहीं ही वस्तुस्थिति त्याला कळलेली असते!

ह्या पाऊलवाटा सोडून मी मुख्य सडकेला लागलों कीं माझ्या वयांत एकदम फार मोठें अंतर पडतें. सडकेनें चालणारा मनुष्य अकालीं वृद्ध होतो. पाऊल-वाटेला असतांना आपलें म्हातारपण डोंगराच्या आड दडलेलें असतें; तें या हमरस्त्यावर आपल्याला एकदम सामोरें येतें. निरनिराळीं रूपें घेऊन तें आपल्याला भेडसावूं लागतें. कधीं अडगळीच्या सामानानें भरलेला एखादा खटारा चडफडत धडपडत आपल्या जवळून पुढें जातो; कधीं कणा वाकलेला एखादा ओझ्याचा ट्रक कुथत-कण्हत स्वतःचें शरीर पुढें ढकलतो; कधीं खुद्द सडकेच्या बरगड्याच उघड्या पडलेल्या दिसतात. आपलें म्हातारेपणच निरनिराळ्या रूपांनीं आपल्याला भेडसावूं लागतें. अशा वेळीं आपले हातपाय आपण आंत आंत ओढून घेतों आणि स्वार्थाशिवाय दुसरा विचार मूर्खपणाचा वाटतो. भविष्याची भीति वाटते. आसपासच्या निसर्गाचें रुपये-आणे-पैमध्यें रूपांतर होऊं लागतें. पसवलेलें

भात पाहिलें कीं यंदा दर काय फुटणार हाच विचार मनामध्यें येतो. मोहरलेलीं कलमें दिसलीं तर मुंबईच्या बाजारांतील तेजी-मंदी आठवूं लागते. आपल्या डोक्यावर आकाश आहे ही गोष्टच मी विसरून जातों. आणि तें साहजिक आहे; कारण आकाशाला किंमत नसते. हमरस्त्यानें चालतांना कधीं काळीं व्यवहाराच्या सोयीसाठीं अर्धवट सोडलेलीं भांडणें मी पुन्हां एकदां मनासारखीं भांडून घेतों; इतरांना फसविण्याचे निरनिराळे व्यूह रचतों. असल्या धोपट मार्गानें जातांना माझें मन अनेक वाकडीं वळणें घेत असतें.

पण पुन्हां एकदां मी माझ्या पाऊलवाटेला वळलों कीं हें सर्व मागें राहतें. मग त्या पूर्वीच्या पापी विचारांची जबाबदारी माझ्यावर आहे असें मी बिलकूल मानीत नाहीं. कारण हें एक सत्य मला पुन्हां पुन्हां सांगितलें पाहिजे : माणसाचे विचार त्याच्या पायाखालील रस्त्यावर अवलंबून असतात.

सह्याद्रि; जून, १९५५

# थोडेंसें विश्वाविषयीं

एक क्षण असा येतो कीं त्या वेळीं अवघें विश्व हा एक माझ्याविरुद्ध रचलेला कट असावा असें वाटूं लागतें. सर्व सजीव व निर्जीव वस्तू या कटांत सामील असतात. माझ्या पुढून येणारीं माणसें मला कसलें तरी आव्हान देत आहेत असें वाटूं लागतें आणि माझ्या मागें राहिलेले लोक माझे पाय ओढण्यासाठींच दबा धरून बसलेले असावे याविषयीं संशय उरत नाहीं. प्रत्येकाचें नाक माझ्यापेक्षां अधिक उंच वाटतें, मान थोडी अधिक ताठ भासते; आणि सगळ्यांच्या नजरेंतील हा आत्मविश्वास मला वेडावूं लागतो.

सगळे कसे आपापल्या ठिकाणीं घट्ट असतात; मीं पाय टाकावा ती जमीन तेवढीच भुसभुशीत ठरते. अशा वेळीं अवघें विश्व हा एक विराट पिंजरा बनतो; आणि मी कितीहि धडपडलों तरी माझ्या प्रत्येक हालचालीबरोबर या पिंजऱ्याचें दार अधिक घट्ट होऊं लागतें. शिवाय, हें सर्व मला समजत असतें; आणि तरीसुद्धां माझ्या सर्व क्रिया असहायपणें सुरूच असतात. विश्वाचा सर्व डाव ओळखून धीरोदात्तपणें स्थिर राहणाऱ्या पुरुषाला लाभणारा उर्मट आनंदहि माझ्या आत्म्याला मिळूं शकत नाहीं. अशा वेळीं माझ्या आत्म्याचा अगदीं उंदीर होतो. खरें म्हणजे माझी स्थिति या उंदराहूनहि विपरीत असते. माझ्या 'उंदीरपणा'ची जाणीव मी विसरूं शकत नाहीं. कारण अशा वेळीं मन निराश बनत नाहीं; तें उदास बनतें. निराशेला धुंदी असते; पण उदासपणाचा डोळा नेहमीं उघडा

असतो; त्याची स्मृति तल्लख असते; क्षयी माणसाप्रमाणें त्याची शुद्ध शेवटपर्यंत कायम असते. त्याला विश्वरूपदर्शन टाळतां येत नाहीं.

अशा वेळीं विश्वाची रचना कोणत्या तत्त्वानुसार झालेली आहे असा प्रश्न कोणी विचारला तर त्याचें उत्तर देणें अगदीं सोपें असतें. विश्वांतील प्रत्येक गोष्ट माझ्या इच्छेशीं विसंवाद साधण्यासाठींच निर्माण झालेली असते. अवघें विश्व हा एक व्यूह असतो. मला कोंडण्यासाठींच समुद्राचे खंदक खोदलेले असतात व पर्वतांच्या भिंती उभारलेल्या असतात. मला दडपण्यासाठींच आकाशानें डोक्यावर झडप घातलेली असते. विश्वाची रचनाच मुळीं माझा छळ करावा या एकमेव तत्त्वानुसार चाललेली दिसते. माझ्या घरांतील बारीकसारीक वस्तूसुद्धां या विरोधी विश्वाला फितुर झालेल्या असतात.

आज परटाकडून आलेल्या कोटाचीं सर्व बटणें तुटलेलीं असतील. सुई सांपडली तर दोरा सांपडणार नाहीं; आणि दोरा सांपडला तर तोंपर्यंत सुई अदृश्य होईल.

आज फाउंटनमधली शाई अर्ध्या मुक्कामावर संपून जाईल आणि पुन्हा भरावी म्हटलें तर दौतीमध्यें फक्त झुरळ मिळेल.

तांतडीनें जायचें असलें तर पायतणाचा बंद तुटेल आणि लावून घ्यायला जावें तर चांभारांचीं दुकानें बंद असतील.

कोणा मित्राकडे भेटायला गेल्यास तो भेटणार नाहीं आणि विमनस्कपणें घरीं परतावें तर नको ती पाहुणे मंडळी अगोदरच उपस्थित झालेली असेल.

मी बाहेर जातांना सूर्य नागड्या अंगानें तळपत असेल; परंतु जर का मी छत्री घरीं विसरलों ही गोष्ट विश्वाच्या लक्षांत आली तर पावसाची सर कोसळायला बिलकुल वेळ लागणार नाहीं.

बसच्या रांगेत तासभर रखडल्यावर नेमकी नको ती बस निर्लज्जपणें पुढें येईल; आणि समजा, हवी असलेली बस चुकून आलीच तरी पुढील मंडळीच्या

मागोमाग मी साळसूदपणें आंत शिरणार इतक्यांत कंडक्टरचा हात अकस्मात पुढें होईल.

विहारमधल्या भूकंपापेक्षांहि अकस्मातपणें आडवा येणारा कंडक्टरचा हात हीच विश्वांतील आदिशक्तीची निशाणी समजली पाहिजे. हात दाखवून अवलक्षण करण्याचा हा एक परमेश्वरी कावा आहे. जे त्या हातावर चिडून जातात त्यांना विश्वाच्या कटाची कल्पनाच आलेली नसते. पण हें सत्य मीं ओळखलेलें आहे. सुईपासून सूर्यापर्यंत सर्व लहानथोर मंडळी या कटामध्यें सामील झालेली असतात. अशा वेळीं कंडक्टरला शिव्या देण्यांत अर्थ नसतो. या संधीचा उपयोग करून विश्वाच्या रचनेमागील प्रधान तत्त्व समजून घेणें हेंच शहाणपणाचें असतें.

विश्वाच्या स्वरूपाविषयीं दुसराहि एक महत्त्वाचा शोध मला या मनःस्थितींत सहज लागू शकतो. माणसें आणि वस्तू दोघेंहि या कटांत सारखींच सामील असतात. याचें कारण हेंच कीं, त्यांच्यांत मूलतः कांहींच भेद नसतो. सजीव आणि निर्जीव हे भेद अगदीं वरवरचे आहेत. वस्तू जड म्हणून आपण उगाच त्यांची गय करतों. (वस्तुतः त्या आपल्याला हसत असतात!) आपल्या पायाला कांटा बोंचला तर आपण आपल्या पायावर संतापतों; कांट्याला सोडून देतों. पण कांटा काढल्यानंतर त्याच सुईच्या अग्रावर कांट्याला सुळीं देण्याची कल्पना पोरकट आहे असें कोणताच जाणता मनुष्य मानणार नाहीं. अशा मनःस्थितींत जड वस्तूंच्या आचरणांतहि मला सहेतुकतेचा वास येतो. त्याचें अजागळ स्वरूप आणि निष्क्रियतेचें ध्यान मला फार वेळ फसवूं शकत नाहीं.

वस्तु तटस्थ नसतात; त्या मोठ्या कावेबाज असतात. आपल्या आपत्कालीं निदान वस्तु तरी एकनिष्ठ राहतील ही कल्पना चुकीची असते. एरवीं गुजगोष्टी करणारी रातराणी अशा वेळीं माझ्याकडे ढुंकूनहि पहात नाहीं. वडासारखे स्थितप्रज्ञ वृक्षसुद्धां माझ्याच पापांचा पाढा वाचून वर एक रखरखीत प्रवचन झोडतात. ज्यांना मीं कधींच दगा दिला नाहीं ते माडसुद्धां 'तरी आम्ही सांगत होतों,' असें म्हणून एखाद्या उपदेशकाची ऐट आणतात. आणि 'मूर्खापुढें बोलण्यांत अर्थ काय?' असा आविर्भाव करून रोजच्या बैठकींतले डोंगर स्वतःच्या

टकलावरून हात फिरवितात. थोडक्यांत म्हणजे आपल्या मित्रांमध्यें सजीव-निर्जीव असा भेद करण्यांत कांहीं अर्थ नसतो. विश्वानें कट केला कीं सगळेच दगा देतात. सगळ्यांना केलेल्याचा विसर पडतो आणि येणाऱ्याची कल्पना असते. मात्र मुकेपणाचें सोंग घेऊन वस्तु कांहींच बोलून दाखवीत नाहींत.

अचेतनाचा हा बुरखा मोठा सोयिस्कर असतो. आंतल्या गांठींचीं माणसें आपला सर्व व्यवहार वस्तूपासून शिकत असतात. तीं तशींच अबोल असतात, तटस्थतेचाच आव आणतात, अचेतनाचा बुरखा पांघरतात आणि असा क्षण आला कीं आपलें मूळ स्वरूप एकदम प्रकट करतात! आंतल्या गांठीच्या माणसाप्रमाणेंच जड वस्तूवरसुद्धां फाजील विश्वास टाकणें धोक्याचें असतें!

पण ज्या क्षणीं विश्वाचा हा कट अगदीं अभेद्य भासतो त्याच क्षणीं मला माझ्या निराळ्या शक्तीची जाणीव होऊं लागते. ज्या अर्थी हें सगळें विश्व माझ्याविरुद्ध एवढा कट रचीत आहे त्या अर्थी मीं अगदींच सामान्य नाहीं ही गोष्ट मला उमगूं लागते! आपल्या पराभवाच्या साहाय्यानेंच आपलें सामर्थ्य मोजण्याची कला मला अवगत होऊं लागते. मनुष्याचा संपूर्ण पराभव कधींच होत नाहीं. सबंध विश्वानें कट केला तरीसुद्धां एका अज्ञात भुयारांतून तो निसटूं शकतो. पशूचा पराभव झाला तर तो पळून जातो; पण माणसाचा पराभव झाला तर तो एक नवें तत्त्वज्ञान निर्माण करतो! बाहेरच्या वाटा बंद झाल्या तर मी स्वतःतच लपूं शकतों आणि आंतलें विश्व हें बाहेरच्या विश्वाहून किती मोठें आहे हें सांगत सुटतों. जोंपर्यंत मला हें करतां येतें तोंपर्यंत विश्वाचा कट पूर्णपणें कधींच यशस्वी होणार नाहीं. विश्वाला टेंगू टरविण्यासाठीं मी स्वतःच शीर्षासन करीन! आणि माणूस हा असा दुबळा जीव आहे कीं, पुन्हा एकदां स्वतःच्या पायावर उभें राहाण्यासाठीं तरी प्रत्येकाला हें शीर्षासन केव्हां ना केव्हां करावेंच लागतें.

सत्यकथा; ऑगस्ट, १९५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 22084 विः 1 लेख 54
क्रमांक 9923 नों: दि: 29/3/54

# हत्ती आणि आंधळे

'आंधळे आणि हत्ती' या जुन्या गोष्टीचें तात्पर्य मला अजूनहि समजलेलें नाहीं. खरा हत्ती हा त्याच्या एकेका अवयवाहून निराळा आहे, असा शोध लावणारा मनुष्य इतर आंधळ्यांहून अधिक शहाणा आहे, ही गोष्ट मला पटूं शकत नाहीं. मी फार तर एवढें म्हणेन कीं हा शेवटचा आंधळा त्या इतर आंधळ्यांहून थोडा निराळ्या जातीचा आहे. इतरांचें आंधळेपण एक प्रकारचें असलें तर या डोळस माणसाचें आंधळेपण वेगळ्या प्रकारचें आहे. मला अजूनहि असें वाटतें कीं, ज्याला हत्ती खांबासारखा भासला त्याला कांहीं तरी सांपडलेलें होतें; ज्याला हत्ती भिंतीसारखा 'वाटला' त्याच्या वाटण्यालाहि कांहीं अर्थ होता. पण ज्यानें हत्तीचा साक्षात् स्पर्श टाळून त्याच्या अस्तित्वाविषयीं एक स्थूल विधान केलें, त्या माणसाच्या चिमटींत हत्तीचें शेपूटहि सांपडलेलें नाहीं. त्याला हत्तीनें चकविलें ही गोष्ट मीं कधींच ओळखलेली आहे. (आणि मला वाटतें त्या हत्तीनेंहि!)

'वाटणें' हा आत्म्याचा तृतीय नेत्र आहे; त्याला दिसणारें जग निराळें आहे. खरें म्हणजे मनुष्याचा स्वभावधर्म 'जाणणें' हा नाहीं; 'वाटणें' हा आहे. म्हणूनच कोणतीहि नवी गोष्ट शिकतांना माणसाला फार त्रास पडतो! "शिकणें ही गोष्ट स्वभावतःच मनुष्याला आनंदकारक वाटते" असें ॲरिस्टॉटलचें वचन आहे; पण त्याचा प्रत्यय मला अजून आलेला नाहीं. मला शिकणें ही गोष्ट

एकंदरींत त्रासाची वाटते; आणि माझा अनुभव हाच सर्वसामान्य माणसाचा अनुभव असावा. विद्यार्थिदशा हा शब्द उच्चारल्याबरोबर माझें अंतःकरण कमल्या तरी व्यथेनें व्यापलें जातें; ती एक 'दशा' आहे एवढी एकच जाणीव जागृत होते. मला अजूनहि कधीं तरी परीक्षेचीं स्वप्नें पडतात आणि अगदीं घामाघूम होऊन मी जागा होतों. या परीक्षेच्या भीतीमुळें म्हणा किंवा अंतर्मनांत दडलेल्या दुसऱ्या कसल्या तरी कारणामुळें म्हणा, शिकणें ही गोष्ट मला मनापासून आवडत नाहीं. पुष्कळ दिवस ही गोष्ट मी स्वतःपासून पद्धतशीरपणें दडवीत होतों. पण मनुष्याचा स्वभावधर्म 'जाणणें' हा नसून 'वाटणें' हा आहे असा शोध लागल्यापासून माझ्या छातीवरचें एक भलें मोठें दडपण एकदम नाहींसें झालें.

जाणणें हें देवासाठीं आहे! माणसानें फक्त 'वाटतें' तेवढ्याचाच उच्चार करावा. आपण जाणण्याच्या फंदांत पडत नाहीं म्हणूनच आपणाला मतें असूं शकतात! आणि सामान्य माणसाजवळ या मतांशिवाय दुसरें काय आहे? आपलीं बहुतेक मतें हीं त्या आंधळ्यांनीं केलेल्या हत्तीच्या वर्णनासारखीं असतात; पण म्हणूनच त्यामध्यें एक वेगळा खरेपणा असतो; आपल्या मतांत दुसरें कांहीं नसलें तरी एक भावसत्य असतें. माझा एक मित्र तुम्ही सिगारेट कशी ओढतां यावरून तुमचा स्वभाव सांगूं शकतो; दुसरा एक जण तुम्ही सकाळीं तोंड धुतांना जो आविर्भाव करतां त्यावरून तुम्ही हिंसक आहां कीं अहिंसक आहां याचा निर्णय करूं शकतो; माझ्या माहितीचे एक श्रेष्ठ टीकाकार एखादा लेखक केवढ्यानें घोरतो यावरून त्याचें लिखाण प्रचारकी स्वरूपाचें आहे कीं गूढ अनुभूतीनें दाटलेलें आहे याचा अंदाज घेऊं शकतात.

आतां यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. कोणत्याहि क्षुद्र पुराव्यावरून माणसाला आपलें मत बनवितां आलें पाहिजे असें माझें मत आहे. मतांच्या बाबतींत आपण 'वाटण्या'च्या आधीन असतों. आपलीं मतें अगोदरच बनलेलीं असतात; फक्त तीं कोणत्या तरी पुराव्याच्या माथीं मारणें आवश्यक असतें. आणि क्षुद्र माणसाप्रमाणें क्षुद्र गोष्टी या असल्या कामांत आपल्याला अधिक उपयोगीं पडतात. शिवाय अशा रीतीनें बनविलेलीं मतें नेहमींच चुकीचीं असतात असेंहि नाहीं. कारण एखाद्या गोष्टींतील अंतिम सत्य पाहण्याची धडपड म्हणजे ती गोष्ट सगळ्या बाजूंनीं पाहण्याची धडपड असते. पण

पुष्कळदां जो चारी बाजूंनीं आंत जाण्याचा प्रयत्न करतो तो फक्त वस्तूभोंवतीं गरगर फिरत राहतो. उलट जो वस्तूशीं एखाद्या बाजूनें लगट करील त्याला थोडी तरी ऊब मिळूं शकते. जाणणाऱ्या माणसाला ज्ञान लाभत असेल; पण आयुष्यांतील ही ऊब फक्त वाटणाऱ्या माणसासच मिळूं शकते.

ज्याला सूक्ष्म तत्त्वचर्चा करावयाची असते त्याला नेहमींची माणसाची भाषा अपुरी वाटते. कारण भाषेचा जन्म हासुद्धां जाणण्याच्या संदर्भात झालेला नसून वाटण्याच्या क्रियेतून झालेला आहे. त्यामुळेंच रसेलसारख्या एखाद्या तत्त्वज्ञाला जाणण्याच्या क्रियेशीं एकनिष्ठ राहणारी अशी निराळी तर्कभाषा निर्माण करावी लागते. खरें म्हणजे आपली नेहमींची भाषा ही अपुरी नसून जादा संपन्न असते. आपल्या नेहमींच्या भाषेला नुसता अर्थ नसतो; तिला लय असते, रंग असतो, वास असतो. पण तर्क हा एक अर्थजीवी पामर असतो. म्हणूनच तर्काच्या मागें लागलेले पंडित हे भाषेशीं भांडत असतात. पण भाषेशीं भांडणें म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाशींच भांडण्यासारखें आहे.

जाणणारीं माणसें संभाषण करूं शकत नाहींत; तीं फार तर व्याख्यानें देऊं शकतील, किंवा एकांतामध्यें चिंतन करूं शकतील. जाणणाऱ्या माणसांविषयीं आपल्या मनांत एक विपरीत आदर असल्यामुळेंच व्याख्यान ही गोष्ट आपण सहन करूं शकतों. नाहीं तर हजारों माणसांनीं तासन्‌तास एखाद्या माणसाचें भाषण ऐकत राहणें या गोष्टीइतकी अनैसर्गिक व भेसूर गोष्ट दुसरी कोणचीच असूं शकणार नाहीं. पुष्कळ व्याख्यानें उधळलीं जातात याचें दिखाऊ कारण राजकीय पक्षनिष्ठा हें असलें तरी त्या मागचें खरें कारण दुसरेंच असलें पाहिजे. जाणणाऱ्याच्या त्या विपरीत वागणुकीविरुद्ध वाटणाऱ्यांनीं केलेलें तें एक प्रकारचें बंड असतें.

हीं जाणणारीं माणसें ज्या वेळीं एखाद्या संभाषणांत घुसतात तेव्हां वाटणाऱ्या माणसाची स्थिति अत्यंत शोचनीय होते. तुम्हीं "मला वाटतें" म्हणण्याची सोय नाहीं; ते लगेच चवताळून उठतात, "हें पाहा, प्रश्न तुम्हांला काय 'वाटतें' हा नसून, काय 'असतें' हा आहे." पण ही रणगर्जना करून ते स्वस्थ बसत नाहींत. ते एकदम त्या संभाषणाचें रूपांतर एखाद्या व्याख्यानांत करतात. मग

आपल्याला वाटत असलेल्या अनेक गोष्टी एकदम हवेंत विरून जातात. अबोध शब्दांच्या चिमण्या आपल्या आसपासहि फिरकूं शकत नाहींत; कल्पनेची कुजबूज जागच्या जागीं थिजून जाते. त्यांच्या सिद्धांतांचा कळप सगळीकडे धुमाकूळ घालूं लागतो. जिथें जाणण्याची सुरुवात होते तिथेंच संभाषणाचा शेवट होतो. एखाद्या उसाच्या मळ्यांतून एखादा आडदांड गेंडा आरपार निघून जावा आणि मग त्यानें पाडलेल्या रस्त्याची पोकळी तेवढीच स्पष्ट दिसूं लागावी तशी आपल्या बैठकीची स्थिति होते. संभाषणाचा रंग पुन्हा जमतच नाहीं. आणि सगळ्यांत भयंकर गोष्ट ही कीं हे जाणणारे लोक पुष्कळदां अगदीं सज्जन असतात. त्यामुळें त्यांना संभाषणांतून हुसकून लावणेंहि आपल्या अगदीं जिवावर येतें. खरें म्हणजे सगळ्यांत भयंकर गोष्ट हीसुद्धां नव्हे. वाटणाऱ्या माणसांची दया येऊन ही मंडळी जेव्हां संभाषण करण्याचा कृत्रिम प्रयत्न करूं लागतात तेव्हां भयंकराच्या पलीकडे असलेली महाभेसूर गोष्ट आपल्या प्रत्ययाला येते.

मला असें पुष्कळदां वाटतें कीं, सामान्य माणसानेंसुद्धां आपल्याला जें जें वाटतें तें टिपून ठेवलें तर अगदीं निराळ्या धर्तीचें आत्मचरित्र आपोआपच लिहिलें जाईल. एखाद्या वाङ्मयांत उमटलेल्या कल्पनांचा साकल्यानें विचार करून त्या वाङ्मयामागील समाजमनाविषयीं कांहीं ठोकताळे बसविणारें एक नवें शास्त्र हल्लीं उदयास येत आहे. मला वाटतें, व्यक्तीच्या वाटण्यालाहि आत्मनिरीक्षणाच्या दृष्टीनें असेंच महत्त्व आहे. पण आपल्याला काय वाटतें हें कळणेंहि वाटतें तितकें सोपें नाहीं; पुष्कळदां आपल्या आसपासच्या माणसाला जें वाटतें तेंच आपणासहि वाटतें, असा आपल्याला भ्रम पडतो. हा भ्रम सामान्य माणसालाच काय पण मोठमोठ्या कलावंतांनाहि पडूं शकतो. हा एक गर्दीचा शाप आहे. म्हणूनच गर्दीमध्यें मिसळूनहि आपलेंपण न हरवतां परत येण्याची कला कलावंतांना शिकावी लागते. परंतु हें करण्यापूर्वी गर्दींत शिरणें अनिवार्य असतें; 'तुपलेपण' पाहिल्याशिवाय 'आपलेपणा'ची खरीखुरी ओळख होत नाहीं. यामुळेंच खरी आत्मनिष्ठा फार कठीण असते.

असें म्हणतात कीं 'जें असूं शकतें' त्याला कांहीं पद्धति आहे; 'जें जाणतां येतें' त्यालाहि कांहीं मर्यादा आहेत. मग 'जें वाटूं शकतें' त्यालाहि कांहीं नियम असणें अस्वाभाविक नाहीं. ज्याची कल्पना करतां येते अशा गोष्टीहि कांहीं

विशिष्ट प्रकारच्याच असल्या पाहिजेत! पण 'वाटणें' ही गोष्ट पंडितांच्या दृष्टीनें अजून इतकी पोरकट आहे कीं 'असणें' आणि 'जाणणें' यांच्या सीमारेषेवर उभें राहून दोघांच्याहि चुगल्या करणारा जाणिवेचा हा प्रकार त्यांच्या जबड्यांत अजून पूर्णपणें सापडलेला नाहीं. नीतिशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र यांची उभारणी करणारा मानव हळूहळू स्वतःला नकळतच या अज्ञात प्रांताची मुशाफिरी करीत आलेला आहे. या शास्त्रांच्या परिभाषेंत एखादें विधान ठोकलें तर विचारवंतांना तें सुसह्य वाटतें. पण 'मला वाटतें' असे भाबडे शब्द उच्चारतांच ते विचकून जातात. ज्या वेळीं एखाद्याचें 'वाटणें' ज्ञानाचें अगडबंब पागोटें घालून आपल्या लवाजम्यानिशीं प्रवेश करतें त्याच वेळीं ते त्याला अदबीनें वागवतात.

वाटण्याचें शास्त्र बनण्याची कल्पना मला तरी भयंकर वाटते. मला काय वाटतें हें ज्या दिवशीं तुम्हांला अचूकपणें उमगतां येईल त्या दिवशीं माझें खाजगी जीवन संपुष्टांत आलें असेंच समजावें लागेल. त्या दिवशीं 'मी'ला अर्थ उरणार नाहीं. प्रतिभा ही शास्त्राची दासी होईल; आणि प्रणयांतील गोड लपंडावाला बुद्धिबळाच्या तर्कशुद्ध खेळाचें स्वरूप प्राप्त होईल. पण सध्यां तरी अशी भीति वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. आपली श्रद्धा जाणण्यावर आहे; वाटण्यावर नाहीं. आणि म्हणूनच निदान शंभर वर्षें तरी 'मला काय वाटतें' हें तुम्हांला आपोआप समजूं शकणार नाहीं. तोंपर्यंत 'मी' अभंग आहे आणि मला वाटतें तो हत्तीहि!

केसरी; ऑक्टोबर, १९५५

# बोवारणीचें बोचकें

पूर्वी मी असें समजत असें कीं, दारावर आलेली वस्तु ही बाजारांत मिळणाऱ्या वस्तूपेक्षां अधिक स्वस्त पडते. ही कल्पना कांहीं अगदींच भाबडी नव्हती. बाजारांत गेलें कीं, दुकानदार उच्चासनावर बसलेला असतो आणि रस्त्यावर उभें राहणारें आपलें ध्यान हें याचकासारखें दिसतें. आपल्याइकडील व्यापाऱ्यांना पुष्कळदां गिऱ्हाइकाच्या हातांतील पिशवी ही झोळी असावी असें वाटूं लागतें. हा गैरसमज बहुधा आपल्या गिऱ्हाइकांच्या फाटकेपणामुळें होत असावा. कदाचित् त्याचें मूळ उच्चासनाशीं संलग्न असलेल्या अधिकाराच्या जाणिवेंत असावें. पण पुष्कळदां असा गैरसमज होतो ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आपण अर्धा तास ताटकळत उभें राहिलों तरी त्यांचें आपणाकडे लक्षच जाऊं शकत नाहीं; आणि जेव्हां ते आपल्याकडे लक्ष देतात तेव्हां त्यांच्या स्वरांत दात्याची धन्यतावृत्ति असते. आपल्या महाराष्ट्रीय दुकानांत दाता आणि याचक यांतलें हें अंतर चांगलेंच प्रत्ययाला येतें. आपला पिंडच स्वाभिमानी ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं ! आपला दुकानदार झाला तरी तोसुद्धां गिऱ्हाइकाचें आर्जव किंवा प्रियाराधन करणार नाहीं.

पण जेव्हां एखादा फेरीवाला माझ्या दारावर येतो तेव्हां मी या अपमानाचा छुपा सूड जरूर घेतों. त्या वेळीं मी उच्चासनावर नसलों तरी निदान माझ्या उंबरठ्यावर उभा असतों ! आतां डोंगर महंमदाकडे आलेला असतो. उंबरठ्याच्या

तटबंदीचा आधार घेऊन मी फेरीवाल्यावर प्रभावी हल्ला करूं शकतो. स्वतः सुरक्षित ठिकाणीं राहून मूल्यामूल्यविवेक करणें नेहमींच सोपें जातें. चालत येणारा गरजू असतो आणि मी स्थिर असल्यामुळें मला स्थितप्रज्ञाची भूमिका स्वीकारतां येते.

या परिस्थितीचा पुरा फायदा घ्यावयाचा असेल तर सुरक्षिततेची विपरीत कल्पना उराशीं बाळगून भागणार नाहीं. आयुष्यांत अशा वेळींच फार धोका होण्याचा संभव असतो! म्हणून अशा वेळीं मी प्रथम अगदीं बकध्यान लावतों; फेरीवाल्याचा पहिला सवाल तर मला ऐकूंच येत नाहीं! दुसऱ्या वेळीं त्याच्या स्वरांत आर्जव निर्माण होऊं लागतें; आणि 'साहेब' ही नवीन उपाधि माझ्यावर लादली जाते. मग मी कांहींसा त्रासिकपणानें त्याच्या अस्तित्वाची दखल घेतों. तिसऱ्या वेळीं त्याच्या आवाहनाला ........ एकदम स्वयंपाकघरांतून उत्तर मिळतें; (या क्षणाची भेदकता ज्याला कळलेली नाहीं त्याला संसाराचें कोडें कधींच उलगडणार नाहीं!) व आपल्याला बाहेर आलेला माल खरेदी करण्याचा हुकूम होतो. विश्वांतील सगळी अपरिहार्यता त्या हुकुमांत सांठवलेली असते! पण तरीहि आपणाला आपलें बकध्यान तसेंच चालू ठेवावें लागतें. आंतून आलेला खरेदीचा हुकूम हा तांतडीचा नसून सूचनावजा आहे अशी बतावणी करीतच आपल्याला फेरीवाल्याशीं घासाघीस करणें शक्य असतें. ज्याला हें नाटक जमत नसेल त्यानें फेरीवाल्याच्या या तिसऱ्या आवाहनाची वाट पाहणें धोक्याचें असतें. फेरीवाल्याची हाक तुमच्या पत्नीच्या कानावर पडली कीं उंबरठ्याचें संरक्षण तुम्ही एकदम गमावून बसतां. मी अनुभवानें असें सांगतों कीं हा धोका कोणी पत्करूं नये. कोणत्याहि पुरुषानें आपण पहिल्या दर्जाचे नट आहोंत या चुकीच्या कल्पनेवर आपल्या जीवनाची मांडणी करूं नये! फेरीवाल्याचा आवाज स्वयंपाकघरापर्यंत पोचण्यापूर्वींच तो बंद पाडणें यांतच आपल्या पुरुषार्थाचें रक्षण असतें!

याचा अर्थ असा नव्हे कीं प्रत्येक प्रकारच्या फेरीवाल्याशीं तुम्हांला या डावपेचानें लढतां येईल. माणसाची शक्ति फार मर्यादित आहे. कांहीं विधिघटनांपुढें आपले मानवी डावपेंच अगदीं लटके पडतात. एखादी बोवारीण तुमच्या घराकडे वळणें ही एक अशीच विधिघटना आहे. फेरीवाल्याबरोबर घासाघीस करतांना

वापरलेले डावपेंच बोवारणीपुढें अगदीं कुचकामी ठरतात. डोक्यावर बरण्यांचा हारा आणि पाठीवर जुन्या कपड्यांचें बोचकें घेऊन एखादी बोवारीण माझ्या उंबरठ्याकडे वळली कीं माझें डोकें गरगरूं लागतें! अशा वेळीं आपल्या उंबरठ्यानें दिलेलें संरक्षण हें किती तकलुपी असतें याचा एकदम साक्षात्कार होतो.

बोवारणीच्या आवाजामध्यें कांहीं तरी गूढ शक्ति असली पाहिजे. तिची हाक प्रथम स्वयंपाकघरांत ऐकायला जाते आणि नंतर दोन मिनिटांनीं माझ्या कानावर पडते! मी टेबलावर पुस्तक आपटून दार बंद करण्यापूर्वींच माझी पत्नी तिला सामोरी जाते. यापुढची कोणती गोष्ट आपल्या हातांत असू शकत नाहीं. धृतराष्ट्राच्या असहायतेनें पुढें घडणारें कुरुक्षेत्र पाहणें एवढी एकच गोष्ट मी करूं शकतों. बोवारणीचा आवाज माझ्या पत्नीच्या कानावर कां पडतो या चमत्काराची मानसशास्त्रीय उपपत्ति लावीत एक आवंढा गिळणें हें अशा वेळीं फार आवश्यक असतें. मला वाटतें, आयुष्यांतले बरेचसे गहन सिद्धांत या असल्या वैयक्तिक अगतिकतेंतूनच जन्माला आलेले असावेत.

बोवारीण आणि पत्नी यांची गांठ पडली कीं लगेच मोहविद्येच्या एका अद्‌भुत प्रयोगाला सुरुवात होते! जणूं काय हें घर आपलेंच आहे अशा समजुतीनें ती बोवारीण माझ्या बायकोला हुकूम करीत सुटते. प्रत्येक बोवारणीला मोहविद्येतील आज्ञांचें महत्त्व जन्मतःच समजलेलें असतें. "बाई, तुमचं नववारी पातळ काडा ना", "भाऊसाहेबांचा येकादा कोट वर टाका की" असे तिचे हुकूम सतत सुरू असतात आणि माझी बायको त्या बोवारणीच्या प्रत्येक आज्ञेबरोबर कळसूत्री बाहुल्यासारखी फिरत असते. क्षणांत ती आंत जाते...पुन्हां बाहेर येते...मध्येंच कपाट उघडते...ट्रंका रापते...बोचकीं सोडते आणि पुन्हां बांधते...बोवारणीनें मागितलेले ते सर्व कपडे हळूहळू तिच्यापुढें येऊन पडतात. बोवारणीनें सुचविलेल्या सगळ्या वस्तु कसल्या तरी किमयेनें साकार होऊं लागतात. हें सर्व घडत असतांना माझी पत्नी मधून मधून 'नाय, होय' करीत असते. पण तें 'नाय, होय' करणेंसुद्धां त्या किमयेचाच भाग असतो! बोवारणीनें माझ्या मनावर घातलेला तो एक फुंकर असतो. मी माझ्या पत्नीला मुळींच दोष देत नाहीं; तिचें मन एका विलक्षण शक्तीच्या आहारीं गेलेलें असतें. तिचे हातपाय अनिवार्य अशा यांत्रिकतेनें फिरत असतात. बोवारणीनें मागितलेले

इतके विविध कपडे माझ्याकडे अचूकपणानें निघूं शकले या अद्‌भुत घटनेनें मीसुद्धां इतका दिङ्मूढ झालेला असतो कीं, त्या वेळीं माझें मन भांडण्याच्या अवस्थेंत नसतें. माझ्यासारख्या जडवाद्याला मोहविद्येवर विश्वास ठेवणें कठीण जातें; पण बोवारीण आणि बायको यांच्यांतला हा व्यवहार पाहिला कीं, प्रत्येक नवरा गूढवादी बनतो !

इतर फेरीवाल्यांपेक्षां बोवारणीच्या शब्दाला जी अमोघ शक्ति प्राप्त होते त्याचें कारण हुडकण्याचा प्रयत्न मी गेलीं कित्येक वर्षें करीत आहें. तें कारण मला अजूनहि पूर्णपणें सांपडलेलें नाहीं. कदाचित् तो ज्ञानाचाच विजय असेल ! माझ्या घरांत कोणकोणते कपडे आहेत याचें अचूक ज्ञान फक्त एका बोवारणीला असतें. या बाबतींत माझ्या पत्नीचें ज्ञानसुद्धां अपुरें ठरतें. तिला फार तर चार नव्या कपड्यांचीं नांवें सांगतां येतील आणि तीं सांगतांनासुद्धां कांहीं गोष्टींचा विसर पडेल ! बोवारीण आमच्या घराकडे वळते त्या वेळीं तिच्या पाठीवर एक मोठें ज्ञानाचें बोचकें असतें.

बोवारीण आपल्या कपड्याच्या मोबदल्यांत आपल्याला कांहीं वस्तु देऊन जाते हा शुद्ध भ्रम असतो. ती नेते ते कपडे आणि देते ती वस्तु यांच्यामध्यें एवढी तफावत असते कीं त्याला मोबदला म्हणतां येणें कठीण आहे. ती देते ती वस्तु (एकादी लांब कानाची बरणी) ही फक्त आपल्या पराभवाची निशाणी असते; तें तिच्या विजयाचें स्मारक असतें ! खरें म्हणजे ती वस्तु मागें ठेवून जाण्यांत तिला एक प्रकारचा दुष्ट आनंद होत असला पाहिजे...आजच्या सौद्यामध्यें ती माझी जुनी खाकी पँट आणि तो पिवळा कोट बोवारणीच्या ढिगावर टाकून माझी पत्नी मोकळी झाली आहे. पण त्या कपड्यावर घेतलेली लांब कानांची बरणी जोंपर्यंत घरांत आहे तोंपर्यंत ते कपडे मी विसरूं शकणार नाहीं. वस्तुतः ती खाकी पँट हा माझ्या मूर्खपणाचा एक मोठा पुरावा होता आणि तो कोटसुद्धां एका वेगळ्या प्रकारच्या खुळेपणाचीच खूण होती. त्या दोन्ही वस्तु घराबाहेर गेल्यामुळें मी अस्वस्थ होण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण मनुष्याला आपला भूतकाळ प्रत्येक क्षणांतून पुन्हां पुन्हां अनुभवावासा वाटतो. चुका जुन्या झाल्या कीं त्यांच्या आठवणी खमंग वाटूं लागतात ! तो पिवळा कोट तर गेलीं दोन तीन वर्षें अजागळासारखा एका खुंटीवर लोंबत पडलेला होता...पण जुन्या कपड्यांकडे

पाहतांना आपण निव्वळ उपयुक्ततावादी राहूं शकत नाहीं. बोवारणीनें आपलें बोचकें पाठीवर घेतल्यानंतर माझ्या उपयुक्ततावादाच्या या साऱ्या मर्यादा माझ्या लक्षांत येऊं लागल्या...पण हिच्या लक्षांत त्या अजूनहि आलेल्या नाहींत; नाहीं तर त्या लांब कानाच्या बरणींत तिनें आजच इतकी चिंच भरली नसती!

सह्याद्रि; मे, १९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रमांक 22058 दि: ...
क्रमांक 2223 नों. दि: ...

# या इथें

मावळतीला उशाशीं घेऊन वाळूवरतीं अंग पसरावें—मग हळूहळू वाळूमधून पसरत जावें—या इथेंच सर्व भोगावें. इथें अशक्य कांहींच नाहीं...कोणी तरी वाळूमध्यें पिवळें ऊन पेरलेलें आहे, तें इथेंच रुजणार आहे; ऊन रुजलें कीं त्याला चांगले नाकेले कोंब फुटतील... आणि शेवटीं याच पिवळ्या उन्हाच्या मळ्यावर लाललाल फुलें येतील...सूर्यसुद्धां एक फूलच होईल. त्याचा वास घेणारें नाक कसें असेल?

तेंहि मला दिसूं शकेल; पण तोंपर्यंत पाण्यांत पाय सोडून असेंच बसलें पाहिजे; या इथेंच बसलें पाहिजे...पाण्याचा पहिला झिळमिळ स्पर्श अंगावरून शहारत जातो...जरा वेळानें पाणी उबदार लागूं लागतें...सलगी करीत करीत तें रक्ताला बोट लावतें...मग तीं एकच होतात....आणि पायच पाण्यांत वितळूं लागतात...पसरत जातात...वाहवत जातात. अशा वेळीं अशक्य कांहींच नसतें...सगळें इथेंच, या पाण्यांत असतें.

समोर तें भेंडीचें ठेंगू-ठुसकें झाड आहे; आणि त्याच्या पलीकडे एक सुरूचा उंच वृक्ष आहे. पण त्या भेंडीला आपण असल्याची जाणीव नाहीं; आणि सुरूला मात्र निश्चित आहे. म्हणूनच ती सुखी आहे आणि तो मात्र घुमतो आहे... आपल्याच लांब सावलीवर दृष्टि रोखून उभा आहे....येणारें पाहतो आहे;

झालेलें भोगतो आहे...ज्या वस्तूंची सावली पडते त्या सगळ्याच सजीव असतात...झाडांच्या पानांवर रेषा असतात; त्यावर झाडांचें नशीब अवलंबून असतें; पक्ष्यांना तें वाचतां येतें; मग पक्षी आपापसांत कुजबुज करतात; विचार करून घरटें बांधतात...कधीं तरी मी त्या चिमणीच्या घरट्यांत जाऊन झोपणार आहें; वाऱ्याबरोबर झुलणार आहें; नारळींच्या पात्यांना लोंबणार आहें; टकमक टकमक बघणार आहें...आणि त्याच वेळीं मी या इथेंहि असणार आहें. पाण्यामध्यें पाय सोडून अगदीं असाच बसणार आहें. दोन्ही गोष्टी एकाच वेळीं होणार आहेत, होणार आहेत...नव्हे, हें एकदां असेंच पूर्वींहि झालेलें आहे. त्या सुरूला विचारा. त्यांत अशक्य असें कांहींच नाहीं...त्यानें हें सर्व पाहिलेलें आहे. म्हणजे मीच पाहिलेलें आहे...

"एकसारखं झाडांकडे पहात राहूं नये" असें आई म्हणे तें खरें आहे... प्रथम आपण झाडाकडे पाहतों, मग हळूहळू झाडें आपणाकडे पाहूं लागतात; पानांना डोळे फुटतात...आपले डोळे मिटूं लागतात...आपलें डोकें भरभरल्या-सारखें होऊं लागतें...मग आपणहि एक झाड असल्याचा भास होतो...आपली साल पातळ असते...आपल्या अंगांत रस सळसळूं लागतो...आपले पाय जमिनींत घुसूं लागतात...पाण्याचा ध्यास घेतात...ओल्या मातीला रापीत जातात...दगडांना प्रदक्षिणा घालतात...आपण चमकून आपल्या डोक्याला हात लावतों; कारण तेथें तुरा फुटण्याची कळ येते...क्षितिजाकडून एक पक्षी घरटें बांधण्यासाठीं आपल्याकडे येतो; आणि नंतर दचकून जातो...तो पक्षीहि पूर्वीं आपल्याला भेटलेला असतो. या इथें, त्याची ओळख सहज पटते.

झाडांना आपली गंमत वाटते....त्यांच्या फांद्या हालूं लागतात; त्यांचे शेंडे डोलूं लागतात. तीं खदखदून हसतात; त्यांच्या मुरकुंड्या वळतात...म्हणूनंच वारा निर्माण होतो; झाडें हालतात म्हणूनच वारा निर्माण होतो...झाडें हीं पक्ष्यापेक्षां शहाणीं असतात; माणसापेक्षां शहाणीं असतात; म्हणूनच तीं जगभर फिरत बसत नाहींत. एकाच ठिकाणीं स्थिर असतात; हात वर करून उभीं असतात... एक दिवस आकाश कोसळणार आहे; पण हीं झाडेंच त्याला सावरणार आहेत.

एक मोडलेली डोलकाठी वाळूवर पडलेली आहे...ही एका बुडालेल्या

गलव्रताची डोल्काठी आहे...कारण डोल्काठीच्या पिचलेल्या टोकावर बसून एक तकतकीत कावळा आपली चोच उभारतो आहे...डोल्काठीवर घासतो आहे...पुन्हां उघडून दाखवतो आहे...ती चोच भयंकर आहे...ती त्याच्या शरिराहून मोठी होत आहे...प्रत्येक क्षणाला तिची लांबी वाढते आहे...हा तोच आहे. अगदीं नक्की......तोच, तोच...आणि ही आमची भेट पुन्हां पुन्हां घडणार आहे.

अशा वेळीं वाळूमध्यें अगदीं निराधार वाटतें....पोरकें वाटतें. अशा वेळीं पाठीशीं काळा पहाड हवा असतो...काळ्या दगडांत एक विलक्षण स्तब्ध शक्ति असते. त्या निःशब्दतेला हा भिऊन पळाला असता. एखाद्या महर्षीच्या तोंडांत शाप येऊन तो त्यानें आवरून धरावा, तशी काळ्या पहाडाची स्तब्धता असते. त्यांना भिऊन हा पळाला असता...दगडांना पुष्कळ बोलायचें आहे व ते केव्हां तरी बोलणार आहेत; ते आपलें मन शांत होण्याची वाट पाहत आहेत. या इथें ते काय बोलणार आहेत याचा अंदाज येतो......त्या कावळ्याला अगोदरच कळलेलें आहे. दगडाला अशक्य असें कांहींच नाहीं...फक्त तो तें करीत नाहीं......त्या कावळ्याची चोच दगडावर घासूनच कणाकणानें झिजणार आहे. दगडाच्या आठवणीनेंच ती आखुड झालेली दिसत आहे. या क्षणाला एक डोळा फुटला आहे......कावळ्याला दीड डोळे आहेत... आणि मला दोन डोळे आहेत...आणि या सगळ्या डोळ्यांना एकच भावली आहे.

या इथें कांहींच अशक्य नाहीं...सगळा भूतकाळ या क्षणांत सामावलेला आहे; हा क्षण चुकवून कांहींच 'होऊं' शकत नाहीं. इथें सगळे क्षण परस्परांशीं बोलत आहेत...त्या भाषेचा अन्वय म्हणजे शास्त्र; त्या भाषेचा अनुभव म्हणजे अस्तित्व. आणखी अद्‌भुत घडणें अशक्य आहे; कारण अस्तित्व हीच सर्वांत अद्‌भुत गोष्ट आहे, या इथें आहे.

मी आहें हेंहि एक अद्‌भुत आहे; माझ्यांतून सबंध जीवसृष्टीचा भूतकाळ या क्षणाच्या ओठाशीं लागला आहे. वरतूवरतूंतून अनंत वेळां नांवें बदलीत 'मी' 'आत्तां' 'इथें' आहें. माझ्या दोन बाजूंना दोन अनंत उभे आहेत.

'मी' नेहमींच मध्यावर आहें. पुढें जाऊनहि तिथेंच आहें. म्हणून आहें हेंच अद्‌भुत आहे; हेंच पुरेसें आहे.

कारण वाळूमध्येंसुद्धां पिवळें ऊन रुजणार आहे......त्याचे नाकेले कोंब वाढणार आहेत. त्याच्यावर लाललाल फुलें येणार आहेत...या इथें अशक्य असें कांहींच नाहीं—सगळें इथेंच या पायाशीं आहे.

सत्यकथा; जुलै, १९५६

ग्रहालय ठाण
अ. क्र.
शाखा (स्थळ

# तपकिरीविषयीं चिमूटभर

---

तसा मी व्यसनांच्या विरुद्ध नाहीं. आपली इवलीशी माणुसकी ही पुष्कळदां या व्यसनांच्या आधारानेंच स्वतःचा तोल सावरीत असते. अगदीं प्रामाणिकपणानें बोलावयाचें म्हणजे सभ्य माणसांना कसलें तरी व्यसन असावेंच लागतें. अर्थात् मी फक्त खऱ्याखुऱ्या सभ्य माणसांविषयीं बोलत आहें. सभ्यपणाचा आव आणणारीं माणसें निर्व्यसनी असण्याचा संभव असतो. तसेंच सभ्य माणसांमध्यें संतांचा अंतर्भाव करण्याचा थिल्लरपणाहि मी करणार नाहीं. संत हे सभ्य आणि असभ्य या लौकिक भेदाच्या पलीकडील एका अंधुक विश्वांत वावरत असतात. आपण ज्याला नेहमीं सभ्यपणा समजतों ती एक सामाजिक शिस्त असते. सभ्य माणसानें आपल्या जीवनाचा तोल सांभाळलेला असतो; त्याच्या वृत्तीमध्यें एक प्रकारचा पार्थिव संयम असतो; सर्वस्वीं ऐहिक अशी विनम्र वृत्ति असते. पण निर्व्यसनी माणसाच्या सद्गुणांना संयमाची आवश्यकता वाटत नाहीं. त्यामुळें निर्व्यसनी माणसांना सभ्यपणाची शिस्त झेपूं शकत नाहीं.

सामान्य माणसाला आपल्या सामाजिक जीवनांत संयम पाळण्यासाठीं कुठें तरी विमुक्त होण्याची आवश्यकता असते. व्यसन हा त्याच्या मनाचा एक चोरदरवाजा असतो. या खाजगी व्यसनामुळेंच आपल्या सामाजिक जीवनाचें नियमन करणें त्याला शक्य होतें. यंत्राच्या बाबतींत गतीचें नियमन करण्याचें

काम एका गतिचक्राकडे असतें. आपल्या व्यक्तित्वाच्या संबंधांत तेंच काम एखाद्या व्यसनाला करावें लागतें. व्यसन हें आपल्या मनाचें गतिचक्र असतें.

शिवाय व्यसनी मनुष्य-हा वरवर वाटतो तितका समाजविन्मुखहि नसतो. प्रत्येक माणसामध्यें समाजाच्या स्थूल प्रवृत्तीविरुद्ध बंड करण्याची एक सूक्ष्म प्रेरणा असते. सामाजिक विधिनिषेधांनीं दडपल्या गेलेल्या मूळ आदिम वासनांतच तिचा उगम असतो. याच मूळ प्रवृत्तींतून कधींकधीं नव्या नीतितत्त्वांची प्रस्थापना करणारे द्रष्टे निर्माण होऊं शकतात. कधीं त्यांतूनच भावी क्रांतीचे उद्गाते निर्माण होत असतात! पण द्रष्टे किंवा नेते यांचें घाऊक उत्पादन निसर्गाला मान्य असावें असें दिसत नाहीं. म्हणून समाजाविरुद्ध बंड करण्याची ही वैयक्तिक प्रवृत्ति आपलें समाधान करण्याचे दुसरे मार्गहि शोधीत असते. समाजानें निषिद्ध ठरविलेलें व्यसन स्वीकारतांना व्यक्तीला हा बंडखोरीचा आनंद मिळूं शकतो. कोणत्याहि व्यसनाची धुंदी ही सामाजिक निषेधामुळें अधिक आकर्षक वाटूं लागते.

मला पुष्कळदां असें वाटतें कीं व्यसनाविरुद्ध खरी मोहीम कशी काढावी हें आपल्या नीतिवाद्यांना अजून कळलेलें नाहीं. व्यसनांचें अर्धें आकर्षण त्यांच्या निषिद्धतेंत असतें. व्यसनांचा निषेध करण्याऐवजीं नीतिवाद्यांनीं आपल्या रुक्ष पद्धतीनें व्यसनांचें समर्थन करावें. तसें केलें तर व्यसनांचें निम्में आकर्षण एकदम नाहींसें होईल. पण निर्व्यसनी नीतिवाद्यांकडून असलें धाडस कधींच करवणार नाहीं. एवढें मोठें धाडस करण्यासाठींसुद्धां कसल्या तरी व्यसनाची आवश्यकता असते!

तुम्हीं कोणतें व्यसन स्वीकारावें याचा निर्णय दुसऱ्याला करतां येणार नाहीं. तुमच्या व्यसनाचें स्वरूप हें तुमच्या व्यक्तित्वावर अवलंबून राहील. आयुष्यांत पुष्कळदां आपल्यावर निवड करण्याचे प्रसंग येत असतात. माझ्या मतानें त्या सर्व निवडींमध्यें व्यसनाची निवड ही अत्यंत महत्त्वाची असते. नको असलेले मित्र तोडतां येतात; नावडत्या बायकोशीं घटस्फोट घेतां येतो; पण व्यसन हा आपला जन्माचा जोडीदार असतो. त्याची निवड करतांना ती फार जपून करावी

लागते. आपण निवडलेल्या व्यसनामध्यें आपल्या जीवनाचा वेग नियमित करण्याइतकी शक्ति असावी लागते. निसर्ग हा मुळांतच थोडा उधळ्या आहे. तो प्रत्येकाला जरूरीपेक्षां थोडी अधिक जीवनशक्ति देऊनच जन्माला घालीत असतो. ही जीवनशक्ति मोठी चिवट असते. ती पृथ्वीला डोंगळ्यासारखी डसून बसते. तुम्ही एखाद्याचें सर्वस्व हिरावून घेऊं शकाल, पण तरीसुद्धां ही त्याची जीवनशक्ति आपल्या नागडेपणानें तुम्हांला वेडावीत राहील! व्यसन हा या जीवनशक्तीचाच एक तर्कातीत आविष्कार असतो. म्हणून ज्यांची जीवनशक्ति अचाट असते त्यांचीं व्यसनेंहि पुष्कळदां असामान्य असतात. प्रत्येक महापुरुष हा आपलें व्यसन घेऊनच जन्माला येत असतो.

मात्र कसल्या तरी व्यसनाची आवश्यकता असते याचा अर्थ तपकीरसुद्धां चालेल असा नव्हे. तपकीर हें व्यसनच नव्हे. तें काय आहे त्याचा शोध अजून लागलेला नाहीं; पण तें व्यसन नव्हे हें मात्र नक्की !

तपकिरीला व्यसनांच्या रांकेंत बसवून आपण सर्व व्यसनांचा भयंकर उपमर्द केलेला आहे. प्रत्येक व्यसनाला स्वतःचा असा रुबाब असतो; स्वतःचें असें आगळें व्यक्तित्व असतें. प्रत्येकाची अनुभव घेण्याची एक स्वतंत्र पद्धति असते. थोर व्यसनाला एक संपन्न स्वप्नसृष्टि असते. कधीं त्याच्या पार्श्वभूमीवर एखादा 'एकच प्याला' लिहिला जातो; तर कधीं त्याच्या प्रतिबिंबांतून 'कुब्लाखान'-सारखी अद्वितीय कविता निर्माण होऊं शकते. व्यसनांच्या बाबतींत लहानमोठा हा भेद मला कळूं शकतो; पण तरीसुद्धां तपकिरीला व्यसन म्हणण्याचें पाप मी कधीं करणार नाहीं. व्यसनी मनुष्य हजार गुन्हे करूं शकेल (व्यसनाशिवाय कदाचित् त्यानें लाख केले असते !); पण तो क्षुद्र कधींच होणार नाहीं...आणि तपकीर म्हटली म्हणजे कांहीं तरी 'क्षुद्र' वाटतें! तुम्ही दहा वेळां 'तपकीर', 'तपकीर' असें म्हणून बघा !

कांहीं व्यसनांच्या आहारीं जाऊन माणसांनीं खून केल्याचें माझ्या ऐकिवांत आहे. खरें म्हणजे निवड चुकल्याचा हा परिणाम असतो. पण इथेंसुद्धा त्या व्यसनाला आपण 'क्षुद्र' म्हणणार नाहीं; 'भयंकर' म्हणूं! तपकीर ओढून माणूस खून करणार नाहीं हें खरें आहे; पण आत्महत्या करणारीं माणसें बहुधा तपकीर

ओढीत असावींत...नाहीं, तेंसुद्धां करण्यासाठीं त्यांना कसल्या तरी व्यसनालाच शरण जावें लागेल. तपकीर ओढणारा मनुष्य फार तर व्यसनांची कुचेष्टा करूं शकेल. तपकिरीसारखी 'क्षुद्र' गोष्ट आणि एकादें 'भयंकर' व्यसन यांच्यांत निवड करायची झाली तर मी भयंकराचाच स्वीकार करीन. 'क्षुद्र' गोष्टीपेक्षां 'भयंकर' गोष्ट ही अधिक आकर्षक असते. परमेश्वरालासुद्धां या भयंकराचें आकर्षण वाटत असावें. दैत्यांना वर देऊन त्यांना 'भयंकर' करण्याची तीच तीच चूक शंकरानें पुनःपुन्हां कां केली हें मला आतां कळूं शकतें. भयंकराला निदान रामाकडून आपला वध होण्याची तरी आशा असते; नरकांत तरी त्याला हक्काचें असें स्थान असतें. माणसाच्या दृष्टीनें ही कांहीं अंतिम शोकान्तिका नव्हे. तपकीर ओढणारा मनुष्य कुठेंच जाऊं शकत नाहीं. 'व्यसनी' मानला गेल्यामुळें स्वर्गाचा दरवाजा त्याला बंद असतो; आणि गोष्ट अगदीं 'क्षुद्र' असल्यामुळें नरक त्याला स्वीकारीत नाहीं. माझी अशी प्रामाणिक समजूत आहे, कीं तपकीर ओढणाऱ्या माणसाला मुळीं 'गतीच' नाहीं!

मी म्हणतों त्या तपकिरीच्या 'क्षुद्र'पणाविषयीं कोणाला शंका वाटली तर त्यानें आपली कल्पनाशक्ति थोडी सैल सोडावी आणि कांहीं घटना आपल्या डोळ्या-पुढें उभ्या करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. त्याला असें आढळून येईल कीं कोणत्याहि रम्य, उदात्त किंवा उत्कट प्रसंगामध्यें तपकीर शिंकल्यावाचून राहत नाहीं! दुष्यंत तपकीर ओढीत कण्वाच्या आश्रमांत शिरतो अशी कल्पना करून पाहा! शिकंदर खूष होऊन पोरसपुढें आपली तपकिरीची डबी उघडतो असा विचार मनांत आणा! हॅम्लेट एका हातानें नाकपुडी उचलून दुसऱ्या हातानें तपकीर ठोशीत असतांना 'जगावें कीं मरावें' या भ्रमांत पडण्याची शक्यता कितपत आहे याचा अंदाज घ्या! तपकीर शिंकल्यावांचून राहणार नाहीं!

म्हणूनच जेव्हां तपकीर ओढणारीं कांहीं माणसें व्यसनी लोकांची टिंगल करण्यांत रंगून जातात त्या वेळीं मी मुकेपणानें त्यांच्या पायांकडे पाहत बसतों. मातीला लागलेले सगळे पाय कुणाची तरी सोबत शोधीत असतात. कोणाला नीतीचा कैफ चढूं लागला कीं मी माझी दृष्टि त्याच्या पायांवर खिळवतों. माणसाचें तोंड कांहींहि बोललें तरी त्याचे पाय कोणाला फसवूं शकत नाहींत. ते मातीला विसरूं शकत नाहींत. ते आपल्याला दूरदूर घेऊन जातात...आदि-

मानवाच्या मागोमाग हिंडवतात...तापलेल्या वाळवंटांत पोळून निघतात... दक्षिण ध्रुवावरील बर्फाच्या प्रदेशांत थिजून जातात. माणसाची अटळ वणवण त्याच्या प्रत्येक पावलावर उमटलेली असते. मग माणसाला माणसाची सोबत आहे ही एकच गोष्ट इतकी महत्त्वाची वाटते कीं आपण ज्याच्या खांद्यावर हात ठेवतों तो माणूस व्यसनी आहे कीं निर्व्यसनी आहे हा पाखंडी विचार मनांत येऊं शकत नाहीं.

मनोहर; सप्टेंबर, १९५६

# स्नेही

'स्नेही' दक्षिणेकडून येतात. ते आठवलींतल्या आंब्याजवळ आल्याबरोबर दादा त्यांना ओळखूं शकतात. मग ते आईला म्हणतात, " सिधुकाका आणि कांहीं स्नेही येताहेतसें दिसतें. बहुतेक वस्तीला राहावेत...येईयेईतोंच काळोख पडेल."

मग दादा दूध काढण्यासाठीं गोठ्यांत जातात. मी आईला विचारतों, " आई 'स्नेही' म्हणजे कोण ग्ये?"

आई म्हणते, " स्नेही म्हणजे मित्र."

माझा धाकटा भाऊ बापू 'स्नेऽही, स्नेऽही' असें मोठमोठ्यानें हेल काढून ओरडूं लागतो. आई म्हणते, " आणि बाप्या, आतां तोंडाची वटवट जरा कमी कर."

बाप्या जरा वेळ थांबून आईला पुन्हां प्रश्न विचारतो, " आई, स्नेह्यांना शेंडी असते का ग्ये?"

पण आई खळ्याचा भराभरा केर काढीत असते; आम्हीं पसरलेल्या माडाच्या

पात्या पुंजावीत असते. तिचें आमच्याकडे लक्ष नसतें. मी खळ्याच्या कोपऱ्यावर उभा राहून ते 'स्नेही' कसे येतात तें पाहत असतों.

हळूहळू ते तिमनमळ्यापर्यंत येऊन पोहोंचतात. आम्टांच्याजवळ आल्यावर मीसुद्धां त्यांतील दोघांना ओळखूं शकतों. रुमाल बांधलेले उंच ते सिधूकाका असतात. लटुकलुटुक् चालणारे ठेंगू ते नानुभटजी असतात. आणि तिसरे स्नेही पूर्वी आमच्याकडे कधींच आलेले आठवत नाहींत. पण सिधुकाका आणि नानुभटजी दोघेहि यंदां माझ्या मुंजींत आलेले होते. सिधुकाकांनीं तर मला भिक्षाळासुद्धां घातलेली होती !

हुश्य हुश्श्य करीत स्नेही घरांत शिरतात. त्यांचीं पायतणें मातीनें लाल झालेलीं असतात, सदरे घामानें भिजलेले असतात. दादा त्यांना 'या—बसा' करतात. आई पडवीच्या पावठणीवर एका पितळी बशींतून बराचसा गूळ आणि एक पाण्याचें तांब्याभांडें आणून ठेवते. त्या तिसऱ्या स्नेह्यांना दादा अण्णामास्तर म्हणतात. ते म्हणतात, "आतां वहिनींची तब्येत बरीच सुधारलेली दिसते."

नानुभटजी म्हणतात, "तुम्ही आपलें माझें ऐका. एकदां त्या अणसूरच्या वैद्याला दाखवून आणा."

अण्णामास्तर नुकतेच मुंबईहून पेन्शन घेऊन आलेले असतात. ते अगदीं हळू व सावकाश बोलतात. मला त्यांचें बोलणें मिळमिळीत वाटतें. ते ओळख नसतांना विनाकारण मला 'बाळ, बाळ' करतात; हसरासा चेहरा करून विनाकारण कांहीं तरी विचारत बसतात; 'नंबर' विचारतात. मला असले प्रश्न आवडत नाहींत; पण तरीहि मला ते बोलूं लागले कीं गंमत वाटते. त्यांचा एक दांत सोन्याचा आहे; तो मध्येंच लुकलुक करतो.

थोड्या वेळानें चहाच्या कपबशा पावठणीवर ठेवून आई आंत जाते. तिच्याकडे सागव्यांतली आत्ते आलेली असते. दादा स्नेह्यांना चहाचे कप देतात. नाक फुटलेला कप आपणासाठीं ठेवतात. "अरे, थोडा आणखी घे—" असें

म्हणत आपल्या कपांतला चहा सिधुकाकांच्या कपांत ओतूं लागतात. ते ‘नको नको’ करतात. “अरे, तुम्ही येण्यापूर्वी आत्तां इतक्यांत मीं घेतला.” असें म्हणून दादा अण्णामास्तरांना आग्रह करतात. तेहि ‘नको नको’ करतात...

पण दादांनीं इतक्यांत चहा घेतलेला नसतो, हें आम्हांला ठाऊक असतें. आम्हीं मुळीं आज चहाच केलेला नसतो. मी बापूकडे पाहतों; त्यालाहि तें उमगलेलें असतें. तो कांहीं तरी बोलण्याच्या विचारांत असतो, पण आवरतें घेतो. सिधुकाका म्हणतात, “चहा अगदीं फक्कड आहे. ही पावडर कुठून आणलीस?”

बापू ‘शेजारून’ असें सांगण्याच्या विचारांत असतो, पण आवरतें घेतो. त्याला आईनें गप्प राहा म्हणून सांगितलेलें असतें. नानुभटजी म्हणतात, “सगळें दुधावर आहे. घरचें दूध.”

सगळे स्नेही चहा भुरुक्‌भुरुक् करून पितात. आमच्या तोंडाचा आवाज झाला म्हणजे मात्र आम्हांला दादा ओरडल्याशिवाय राहत नाहींत. सिधु-काकांच्या झुबकेदार मिशा बशींत बुडतात. तें आईला सांगण्यासाठीं मी आणि बापू हळूच उठून घरांत जातों. प्रथम माजघरांत थांबून आम्ही दोघेहि ओक्सा-बोक्शीं हसून घेतों. हसण्याचे हुंदके आवरल्यावर मग स्वैंपाकघरांत आईकडे जातों. तिथें सागव्यांतली आत्ते पितळींतून चहा पीत असते. तीसुद्धां भुरुक्-भुरुक् असा आवाज करते. ती आईला म्हणत असते, “आतां तुम्ही माझें ऐका; एक सत्यनारायण बोलून बघा.”

सागव्याची आत्ते मला मुळींच आवडत नाहीं. तिच्या अनुवटीवर एक मोठा चांबखीळ आहे आणि त्यावर पांढऱ्या केसांचा झुबका आहे. शिवाय ती आपल्या कलमांच्या बागेविषयीं खूप खूप बोलते; साटें पाठवीन म्हणते आणि प्रत्यक्ष कधींच पाठवीत नाहीं. आम्हांला पाहून त्या बोलायच्या थांबतात. मग सिधुकाकांच्या मिशा बशींत कशा बुडतात तें मी आईला नाकाखालीं बोटें घेऊन दाखवतों. आईला हसायला येतें, पण आत्ते ‘गाढवा’ म्हणून अंगावर खेकसतें. मग आईसुद्धां हसत नाहीं. नेहमीं हसणें आवरण्याचा प्रयत्न करते.

इतक्यांत पडवीमधून खडाजंगी आवाज ऐकायला येतो, म्हणून आम्ही परत पडवींत येतों व पावठणीवर बसतों. सिधुकाका आणि दादा खूप जोरानें तणतणत असतात. दोघांचेहि चेहरे उग्र झालेले असतात. दोघेहि हातवारे करीत असतात. मला तें भांडण वाटतें; माझी छाती धडधडूं लागते...पण इतक्यांत सगळे जण एकदम खिकाळल्यासारखे हसूं लागतात. या भांडणाला स्नेही 'चर्चा' म्हणतात. ती कायदेभंगाच्या चळवळीची चर्चा असते. चर्चेत 'मुद्दे' असतात. दादा सिधुकाकांचा मुद्दा खोडून काढतात, म्हणून मला बरें वाटतें. दोघे स्नेही चर्चेत भाग घेतात. पण नानुभटजी आपला निमूटपणें ऐकत असतो. बशींतला उरलेला गूळ मधूनमधून तोंडांत टाकतो. आणि चर्चा फारच हमरीतुमरीवर आली, तर कांहीं तरी गुळूमुळू करतो. आईला चर्चा ऐकणें फार आवडतें. तीसुद्धां माजघराच्या दाराशीं येऊन उभी राहते. पण माझी छाती मात्र उगाच धडधडत असते.

'स्नेही' आले कीं आमचीं जेवणें अगोदर उरकून घेतात. मोठी पंगत मागाहून बसते. बापूला मोठ्या पंगतीबरोबर बसायला हवें असतें. म्हणून तो हट्ट करतो; तरी आई त्याला दामटून अगोदरच बसवते. मग तो जेवत नाहीं; तरी त्याला घास कोंबून कोंबून भरवते. मी आपला मुकाट्यानें जेवायला लागतों. मलासुद्धां खरें म्हणजे मोठ्या पंगतीबरोबर जेवलेलेंच आवडतें. पण मला आईची भीति वाटते म्हणून मी बोलत नाहीं. आई मला 'शहाणा' म्हणते आणि बापूला 'खट्रड' म्हणते. आईनें स्नेह्यांसाठीं पांढऱ्या पोळ्या केलेल्या असतात; व बरणींतला गुळांबाहि काढलेला असतो. आई बापूला व मला सारखीच म्हणजे अर्धी पोळी घालते. त्यामुळें बापू रडायचा कमी होतो. मीसुद्धां स्नेही आलेले असल्यामुळें भांडण करीत नाहीं. नाहीं तर मी बापूपेक्षां मोठा असल्यामुळें अधिक मागितली असती. पण स्नेही आले कीं शहाण्यासारखें वागावें लागतें. बापूला अजून हें कळत नाहीं. तो जेवल्याबरोबर पाय आपटीत माच्याकडे जातो; आणि एक अंथरूण विस्कटून त्यावर झोपून टाकतो. पण मला स्नेही कसे जेवतात तें बघायचें असतें. मोठी पंगत जेवत असली म्हणजे तें बघण्यांतहि मला मजा वाटते.

सगळे स्नेही पाटावर बसल्यावर नानुभटजींना आपल्या संध्येची आठवण होते.

ते हळूच आईकडून ताम्हन मागून घेतात आणि पाटावर तिरपे बसून आचमनें घेऊं लागतात. आईला म्हणतात, "वहिनी, तुम्ही आपलें वाढायला घ्या; माझ्याकरतां थांबूं नका."

अण्णामास्तर पाटावर वळवळत बसतात. ते म्हणतात, "बाबा, निदान आतां लौकर तरी आटप."

सिधुकाका म्हणतात, "आम्ही आपले कांद्याय नमः—बटाट्याय नमः या पंथांतले!"

मग सगळे ख्यॅ–ख्यॅ करून हसतात. आईसुद्धां हसते. खूप मजा येते. इतक्यांत बापू माच्यावरून त्रासिक स्वरानें, "आई, मला पांघरूण हव्वें ऽ" करून ओरडतो...नंतर स्नेही भुरके मारून जेवूं लागतात. त्या सगळ्यांचीं तोंडें वाजत असतात. तीं मला पावटणीवरसुद्धां ऐकूं येतात...दादा आवळ्या लहान घालतात, पण स्नेह्यांच्या आवळ्या चांगल्या सुपारीएवढ्या मोठाल्या असतात...स्नेह्यांना जेवतांनासुद्धां खूप घाम येतो.

जेवल्यानंतर नानुभटजी आणि मुंबईवाले अण्णामास्तर खळ्याच्या कोपऱ्यावर जाऊन पान खात बसतात. शनीच्या पीडेविषयीं कांहीं तरी बोलणें चालतें. नानुभटजी वाकड्यातिकड्या भाषेंत अण्णामास्तरांना कांहीं तरी समजावून सांगत असतो. त्याच्या भाषेंत मंत्रांतले संस्कृत शब्द फार येतात. नानुभटजींना भविष्यसुद्धां सांगतां येतें. म्हणून सागव्यांतली आत्ते त्यांच्याकडे पुष्कळ वेळां जाते. त्यांना आंबेफणससुद्धां पाठवते. पण ते शनीविषयीं किंवा मंगळाविषयीं बोलूं लागले कीं मला त्यांची भीति वाटते. मी तिथून उठून पडवींत जातों. पडवींतल्या झोपाळ्यावर बसून दादा आणि सिधूकाका कांहीं तरी हळूहळू आणि गंभीरपणें बोलत असतात. सिधुकाका म्हणतात, "बरें, तो पहिला व्यवहार राहूं दे; पण निदान ही मुंजीकरतां काढलेली रक्कम तरी—"

दादा म्हणतात, "मी शिकस्तीचे प्रयत्न चालवलेले आहेत. सध्यां जमिनीला गिऱ्हाईक नाहीं. आजचें उद्यां होईल एवढेंच."

सिधुकाका म्हणतात, “तें काय हवें तें कर; पण दिवाळीच्या पलीकडे थांबणें मला अशक्य आहे. प्रत्येकाला त्याचे व्यवहार आहेत. स्नेहाखातर इतके दिवस थांबलों. तुलाहि हें समजलें पाहिजे.”

झोंपण्यापूर्वी पत्त्यांच्या खेळाचा बेत असतो...लवकरच सगळी मांडामांड होते. गांवांतील देवीचें आमच्याकडे ठेवलेलें जुनें जाजम पडवीमध्यें पसरलें जातें. एका बाजूला उपडी पायली ठेवतात व दुसऱ्या बाजूला उपडा कुडव ठेवतात. मग त्यावर दोन कंदील ठेवून खेळाला सुरुवात होते.

दादा म्हणतात, “ बरेच दिवसांनीं हा योग आला.”

अण्णामास्तर म्हणतात, “अरे, दिवस कसले, वर्षें झालीं.”

मग ते आपल्या खिशांतून मुंबईहून आणलेला करकरीत नवा जोड जाजमावर आपटतात. सिधुकाका त्यांतला ‘ जोकर ’ काढून तो माझ्या हातांत देतात. या जोकरची टोपी संकासुरासारखी मोठी गमतीची असते...स्नेही लोक नेहमीं तेरापानीच खेळतात...हातांचा हिशोब ठेवण्यासाठीं त्यांना वरणे लागतात. ते मीच त्यांना आणून देतों. अण्णामास्तर म्हणतात, “मुलगा मोठा चुणचुणीत आहे.”

पण माझें लक्ष फक्त दादांच्या हातांतील पानांकडे असतें. दादांच्या हातांत एक मोठा इस्पिकचा एक्क्या असतो. इस्पिकचा एक्क्या मला सगळ्यांत पराक्रमी वाटतो. त्याचा दबदबा निराळा असतो. हुकमी एक्क्या जास्त शक्तीचा हें मला ठाऊक आहे. पण तरीसुद्धां इस्पिकचा एक्क्याच मला जास्त मोठा वाटतो. तो एक्क्या पडेपर्यंत तरी मला हा डाव पाहायचा असतो. पण मला झोप आवरत नाहीं. मी तिथेंच जाजमावर दादांच्या पाठीशीं आडवा होतों...

स्वप्नामध्यें दादांच्या हातांतील इस्पिकचा एक्क्या आणि माझ्या हातांतील जोकर यांची लढाई होते; खूप खूप लढाई होते; मी ती थांबविण्याचा प्रयत्न करतों, पण ते माझें ऐकत नाहींत...आणि अचानक दोघेहि एकदम माझ्यावरच

उलटतात...तेव्हां त्या धसक्यानें मी जागा होतों. त्या वेळीं फटफटीत उजाडलेलें असतें आणि स्नेही अगोदरच गेलेले असतात. कां तें कळत नाहीं, पण दादा आईवर रागावत असतात. म्हणून मी गुपचूप उठून खळ्याच्या कोपऱ्यावर जातों व स्नेही गेले त्या दिशेकडे पाहत राहतों.

सत्यकथा; नोव्हेंबर, १९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 230५८ दि: [illegible]
क्रमांक ९९२३ नों दि: २९।३।५८

# हॅम्लेटची खरी चूक

हॅम्लेटच्या चुका शोधून काढण्यांत टीकाकारांना कसला तरी सूक्ष्म आनंद होत असावा. दुसऱ्यांनीं केलेल्या चुकांची चर्चा ही स्वभावतःच फार चविष्ट असते. मनुष्याच्या स्वभावाचें हें वैशिष्ट्य लक्षांत घेतलें म्हणजे चुका करणारीं माणसें जगावर केवढे उपकार करून ठेवतात याची कल्पना येते. महात्मा गांधींना केव्हां केव्हां कठोर आत्मटीका करण्याची लहर येई; मग ते आपण 'हिमालयाएवढी चूक' केल्याची जाहीर कबुली देत. अशा वेळीं कांहीं माणसांना आनंदाच्या उकळ्या फुटत. हिमालयाएवढी चूक करणारा महात्मा गांधींसारखा मनुष्य या माणसांना निदान सह्याद्रीएवढा तरी आनंद देत असे ! नेपोलियननें आपल्या सैन्याची शेवटची हालचाल करतांना केलेली ती पंधरा मिनिटांची चूकसुद्धां अशीच महत्त्वाची आहे. ती लहानशी चूक अख्ख्या युरोपला शंभर वर्षें आनंदानें चघळून चघळून खातां आली. मानवी सुखांत नेपोलियननें घातलेली ही भर कांहीं कमी महत्त्वाची नाहीं. स्टॅलिनच्या चुकांचें सध्यां सुरू असलेलें उत्खननसुद्धां त्या दृष्टीनें मोठें मनोरंजक आहे. त्या चुकांची चर्चा करतांना आम्हांला होणाऱ्या गुदगुल्या इतक्या विलक्षण आहेत कीं, स्टॅलिनला त्याकरतां आपण आणखी दहा खून सहज माफ करूं शकूं. माणसें मेली तरी त्यांच्या चुका शिल्लक उरतात...आणि ही गोष्ट कांहीं कमी महत्त्वाची नाहीं.

दुसऱ्याच्या चुका शोधण्यांत होणारा सर्वसामान्य आनंद हा मानवी ऐक्याचा

आणखी एक पुरावा आहे. हॅम्लेट आणि मी हे वरवर अगदीं निराळे भासलों, तरी दोघांना जोडणारा दुवा या स्वभाववैशिष्ट्यांत सांपडूं शकेल. मला हॅम्लेटच्या चुका शोधण्यांत आनंद वाटतो ही गोष्ट अगदीं उघड आहे; पण त्या हॅम्लेटला-सुद्धां आपल्या आईनें आणि चुलत्यानें केलेली चूक त्यांच्या पदरांत बांधण्यांत कांहीं कमी आनंद होत नव्हता! थोडें पुढें जाऊन मी असेंसुद्धां म्हणेन कीं, हॅम्लेटच्या आयुष्यांत शेवटीं शेवटीं या एका आनंदाशिवाय दुसरा कसलाच आनंद शिल्लक उरला नव्हता. बहुतेक टीकाकारांच्या आयुष्याचा शेवटहि या बाबतींत हॅम्लेटसारखाच असतो! हॅम्लेटची एखादी नवी चूक शोधल्याशिवाय आम्हांला चैन पडत नाहीं. टीकाकारांना हॅम्लेट इतका प्रिय असण्याचें कारण हॅम्लेटनें फार मोठ्या व अनाकलनीय अशा चुका केल्या हेंच होय. शिवाय हॅम्लेटच्या व्यक्तित्वांत अशी कांहीं गंमत आहे कीं, प्रत्येक युगाला त्याच्या जीवनांत एक नवी चूक सांपडत असते. मी तर असें म्हणेन कीं हॅम्लेटच्या जीवनांत एखादी नवी चूक उमगूं लागली कीं मनुष्याच्या संस्कृतींत एका नव्या युगाला सुरुवात झाली असें समजायला हरकत नाहीं.

हॅम्लेटनें कोणतीच चूक केली नाहीं आणि म्हणूनच बिचाऱ्याच्या जीवनाचा शेवट शोकान्त झाला असें ठासून सांगणारा टीकाकार मला अजून भेटलेला नाहीं. तो शेवट शोकात्म न ठरतां भेसूर ठरेल; आणि माणसाला शोकात्म शेवट झेपूं शकतो; पण असलें भेसूर सत्य पाहून त्याच्या डोळ्यांच्या गारगोट्या बनतील! तें त्याला नको असतें; म्हणून हॅम्लेटनें चूक केली हें गृहीत धरणेंच सोयीचें ठरतें. आतां हें माझें विधान चूक आहे असें सिद्ध करण्यासाठीं तुम्ही एखादा अडगळीं-तला टीकाकार माझ्या तोंडावर फेकूं शकाल. हॅम्लेटला बरोबर ठरविणारीं त्याचीं वचनेंहि उद्‌धृत कराल. पण तुमची ही सर्व धडपड शेवटीं माझ्या विधानालाच पोषक ठरेल. तुम्ही थोडे खोल गेलांत तर तुम्हांला असें आढळेल कीं तुमचा भर हॅम्लेटला बरोबर ठरविण्यावर नसून मला चूक ठरविण्यावर आहे. शिवाय हॅम्लेटला बरोबर ठरविणाऱ्या मनुष्यानें आपण मानवाच्या भावी पिढ्यांचें केवढें मोठें सुख हिरावून घेत आहों याचा थोडा विचार केला पाहिजे! म्हणून हॅम्लेटविरुद्ध रचलेल्या कटांत इतर सर्व टीकाकारांबरोबर मीहि सामील आहें.

कोणी म्हणतात, त्यानें फार विचार केला हीच त्याची चूक. मला हें म्हणणें

पटत नाहीं. हॅम्लेटची खरी चूक तो फार विचार करतो ही नव्हे. व्यवहारांत यशस्वी ठरणारीं माणसेंहि खूप विचार करीत असतात. काळाबाजार करणें, युद्ध घडवून आणणें, निवडणुका जिंकणें, वशिला लावून कामें उरकणें, एवढेंच काय, साहित्यासारख्या क्षेत्रांत प्रतिष्ठा मिळवणें—या सर्व गोष्टींसाठीं खूप विचार करावा लागतो. पण तो विचार 'काय करावें' हें ठरविण्यासाठीं नसतो; 'कसें करावें?' हें ठरविण्यासाठीं असतो. आपल्याला काय हवें तें त्यांना समजलेलें असतें; ते फक्त साधनाविषयीं विचार करीत असतात; साध्याविषयीं नव्हे. काय करणें इष्ट तें गृहीत धरून मग विचार करण्याऐवजीं हॅम्लेट विचार करून मग काय करणें इष्ट हें ठरविण्याचा प्रयत्न करतो. जणुं काय, आपण काय करावें हें विचार करून ठरवतां येईल असें त्याला वाटत असतें. खरें म्हणजे मनुष्याची जीवनशक्ति त्याला काय हवें असतें हें अगदीं स्वतंत्र रीतीनें ठरवीत असते. आपल्याला 'काय हवें' तें ठरविणारी शक्ति विचारापेक्षां खूप खोल दडलेली असते. त्या शक्तीचीं पाळेंमुळें आपल्या अंतर्मनाच्या जुनाट चौथऱ्याखालीं खूप दूरवर घुसलेलीं असतात. विचार हा एखाद्या सांगकाम्याप्रमाणें हवी असलेली गोष्ट कशी मिळवावी हें सांगूं शकतो. पण आपल्या सबंध व्यक्तित्वाला काय हवें असतें याचा निर्णय तो स्वतंत्रपणानें घेऊं शकत नाहीं. आपल्याला काय हवें तें उमजून मग हॅम्लेटनें कितीहि विचार केला असता तरी त्याच्या जीवनाची शोकान्तिका झाली नसती. हीच हॅम्लेटची पहिली चूक. त्यानें नेमकी उलटीकडून सुरवात केली; अगोदर विचार करून मग काय करणें इष्ट तें ठरविण्याचा प्रयत्न केला!

मला वाटतें, हॅम्लेटच्या मनामध्यें जो सर्वांत मोठा गोंधळ झाला तो 'जगावें कीं मरावें' या प्रश्नावर नव्हे. त्या गोंधळाच्या मुळाशीं असलेला प्रश्न तो स्वतःला कधीं विचारूंच शकला नाहीं. काय करणें इष्ट हा प्रश्न स्वतःला विचारीत असतांना आपणाला जें हवें आहे तेंच आपण शोधीत आहोंत हें विदारक सत्य त्यानें स्वतःपासून लपविलें होतें. ही त्याची दुसरी चूक. आपण अगदीं न्यायनिष्ठ व तटस्थ वृत्तीनें प्रत्येक प्रश्नाचा निर्णय करीत आहोंत, इतरांच्या अंतरंगाचा शोध घेत आहोंत, अशी त्याची कल्पना होती. त्याची ही कल्पना अगदीं प्रामाणिक होती याबद्दल मला शंका नाहीं. पण बऱ्याच प्रामाणिक कल्पनांप्रमाणें या कल्पनेलाहि वस्तुस्थितीचा आधार नव्हता. स्वतःच्या अंतरंगाचा शोध घेण्यापूर्वींच तो दुसऱ्याच्या अंतरंगाचा शोध घेण्यासाठीं धडपडत होता. म्हणूनच त्याला

ऑफेलियामध्यें—म्हणजे आपल्या प्रेयसीमध्यें—पडलेलें आपल्या व्यभिचारिणी आईचें प्रतिबिंब भिववूं शकलें; पण आपल्या आईमध्यें पडलेलें आपल्या तरुण प्रेयसीचें प्रतिबिंब उमगूं शकलें नाहीं! त्यानें स्वतःच्या अंतःकरणांत खोलवर पाहिलें असतें तर आपल्या चुलत्याचीच एक अंधुक सावली आपल्या मनाच्या गूढ गाभाऱ्यांत उलट्या पावलांनीं फिरत असलेली त्याला दिसली असती. स्वतःला नकळत एका सुप्त शक्तीच्या आहारीं जाऊन आपल्या चुलत्याशीं स्पर्धा करणारा एक तरुण त्याला उमगला असता......आणि मग तो चपापला असता. त्या धक्क्यानें कदाचित् त्याची न्यायनिष्ठेची आणि तटस्थतेची धुंदी एकदम ओसरली असती. मग आपण काय करावें हें शोधीत असतांना आपणाला काय हवें तेंच हुडकीत आहोंत हें सत्य त्याला उमगलें असतें. पण या गोष्टी अगदीं भिन्न आहेत असें समजून तो आपल्या व इतरांच्या कृतींचें मूल्यमापन करीत होता. हें नकली द्वैत उभारून त्यानें स्वतःची फसवणूक चालवली होती. पण हॅम्लेटची ही दुसरी चूक फारशी अपवादात्मक आहे असें मला वाटत नाहीं. ही चूक आपण सगळेच करीत असतों. नव्हे, त्यामुळेंच आपलें जीवन सुसह्य होतें! ही दुसरी चूक आपण पचवतों; कारण हॅम्लेटची पहिली चूक आपण कधींच करीत नाहीं. या दुसऱ्या चुकीपुरता तरी हॅम्लेट हा सर्व सुसंस्कृत माणसांचा प्रतिनिधि समजला पाहिजे.

ग्रहणाच्या वेळीं सूर्याकडे पाहतांना आपणाला काजळलेल्या काचेचाच उपयोग करावा लागतो. साध्या डोळ्यांना सूर्याची दाहकता सहन होत नाहीं. आपणाला काय हवें असतें तें उघडपणें आपण पाहूं शकत नाहीं. माणसाला ती गोष्ट फारच कठीण वाटते. मग फसव्या नैतिकतेची काजळलेली काच आपण डोळ्यांसमोर धरतों. मला वाटतें, आपला मेंदू अजून बराच बाल्यावस्थेंत आहे; त्याला चिऊ-काऊची गोष्ट सांगून घास दिला म्हणजे तो गोड वाटतो. पण रक्ताजवळ मात्र अनंत काळापासून साठवत आलेलें शहाणपण आहे. सबंध भूतकालाचा अनुभव त्यांत मुरलेला आहे. म्हणूनच रक्त मेंदूसारखी आदळआपट करीत नाहीं; कांहीं पटविण्याचा आव आणीत नाहीं; आधारांची आतषबाजी करीत नाहीं. तें आपलें काम मुकेपणानें साधीत असतें. सोयीस्कर शब्दांमागें लपून तुम्ही रक्ताला जें हवें असतें तेंच शोधीत राहिलांत तर रक्त तुम्हाला चिडवीत बसत नाहीं. तो लपंडाव त्याला गमतीचा वाटतो......हॅम्लेट हाच लपंडाव फार निष्ठेनें खेळला; तो

इतक्या अडचणीच्या ठिकाणीं जाऊन लपला कीं त्या ठिकाणांतून बाहेर पडणें पुन्हा त्यालाच जमेनासें झालें!

मला वाटतें, स्वतःशीं हा लपंडाव खेळण्यांत हॅम्लेटला भाषेचा फार मोठा उपयोग झाला असावा. या दृष्टीनेंहि हॅम्लेट हा आम्हा सर्व सुसंस्कृत माणसांचा पहिला प्रतिनिधि होता. सुसंस्कृत माणसाला भाषा ही ढालीसारखी उपयोगी पडते. दोन निरनिराळे शब्द वापरले गेले कीं त्या दोन निराळ्या शब्दांच्या आधारानें हळूहळू तो दोन निराळ्या गोष्टींचें अस्तित्व गृहीत धरूं लागतो. आणि म्हणूनच पुष्कळ वेळां आपल्या संस्कृतीचा पाया हा आपल्या शब्दाइतकाच ठिसूळ आहे कीं काय असें वाटूं लागतें. पत्नी आणि माता हे दोन निरनिराळे शब्द वापरूं लागल्यावर स्त्रीविषयीं वाटणाऱ्या आकर्षणाचा एखादा शाश्वत गुणधर्म या दोन्ही ठिकाणीं असूं शकेल कीं काय या गोष्टीचा विचार करणेंसुद्धां पाप वाटूं लागतें. दस्यु, शूद्र व गृहिणी या शब्दांचा तोंडवळा गुलाम या शब्दापेक्षां इतका निराळा दिसतो कीं भारतामध्यें गुलामी असण्याची शक्यता पार दुरावूं लागते. लूट व भांडवल हे शब्दसुद्धां परस्पराशीं अपरिचित असल्याचा असा कांहीं बहाणा करतात कीं काळ्याबाजारांतील त्यांच्या गांठीभेटी कोणाच्या लक्षांतच येऊं नयेत! शब्दभ्रम हें संस्कृतीला म्हातारचळ लागल्याचें एक लक्षण असतें. एखादी संस्कृति मरूं लागली कीं ती अधिकाधिक शब्दनिष्ठ होऊं लागते... हॅम्लेटजवळ मरणाऱ्या युगाचे शब्द होते आणि जन्मणाऱ्या युगाच्या जाणिवा होत्या. तो एका महान् सांस्कृतिक स्थित्यंतराच्या उंबरठ्यावर उभा होता...पण असें उंबरठ्यावर उभें राहणें हें नेहमींच धोक्याचें असतें!

वसुधा; नोव्हेंबर, १९५६

# घसरल्याचे विचार खोलांत

खरें म्हणजे मी तितकासा पडलों नव्हतों; पण आसपासच्या लोकांचा तसा गैरसमज झाला. सगळे माझ्या मदतीला धावले. कोणीं छत्री आणून दिली; कोणीं दोन दिशांना गेलेल्या चपला परत एके ठिकाणीं केल्या; कोणीं अस्ताव्यस्त पडलेलीं पुस्तकें गोळा करून माझ्या पिशवींत भरलीं; आणि सगळ्यांत भयंकर गोष्ट म्हणजे एका माणसानें मला हात देऊन वर उठविण्याचा आभासहि निर्माण केला.

लोकांनीं इतकी सहानुभूति व्यक्त केल्यानंतर खरोखरच माझें कांहीं तरी वाईट झालें असावें असें मलासुद्धां वाटूं लागलें! खरें म्हणजे मी फारसा पडलों नव्हतों. केळ्याच्या सालीवरून माझा पाय घसरला होता, ही गोष्ट खरी. पाय घसरल्या-नंतर माणूस साहजिकच थोडासा आडवा होतो; पुस्तकें जास्त असलीं तर तीं निसटून पडतात; आणि वारा ताठ असेल तर छत्रीसुद्धां हातावेगळी होते. शिवाय आडव्या माणसाला उभें होणें हें पावसाळ्यांत थोडें त्रासाचें पडतें... याचा अर्थ मी सपशेल पडलों असा होत नाहीं. पण आसपासचीं माणसें गैरसमज करून घेण्यासाठीं वाटच पाहत होतीं; आणि मला अगदीं मेल्याहून मेल्यासारखें झालें. अशा वेळींच आपण अभिनयाची कला हळूहळू साध्य करीत असतों! मी हसत हसत त्यांचे आभार मानले आणि झपाझप पावलें टाकीत त्या रस्त्यावरून अदृश्य झालों.

मनांतून मात्र एखाद्या पराभूत माणसासारखा मी खचलेला होतों. माझें तें हसणें म्हणजे असहायतेचाच पुरावा होता. तसें शक्य असतें तर त्या रस्त्यानें मी उभ्या जन्मांत कधींच गेलों नसतों. पण मनुष्य आपल्या कामाच्या रस्त्यावरून कायमचा अदृश्य होऊं शकत नाहीं. पुन्हां त्या रस्त्याला केव्हां ना केव्हां शरण यावेंच लागतें. दुसऱ्या दिवशीं कामावर जातांना माझा पहिला विचार अर्थातच तो रस्ता टाळून थोड्या लांबच्या रस्त्यानें जावें असा होता; पण हा सरळ सरळ भ्याडपणा होता. जें अटळ आहे तें टाळण्याचा तो प्रयत्न होता. दुसऱ्या दिवशीं त्या रस्त्यानें जाण्यांत इतकी लाज मला कां वाटत होती, हें माझें मलाच कळत नव्हतें...कदाचित् माझ्या आसपासचीं माणसें मी पडल्यानंतर ख्यॅ खॅ करून हसलीं असतीं, तर मला इतकी लाज वाटली नसती!

मला वाटतें, या बकाल रस्त्यावरील माणसांच्या स्वभावाविषयीं मीं कांहीं कल्पना मनाशीं गृहीत धरल्या असाव्यात. त्यांच्या वागणुकीविषयीं कांहीं आडाखे बांधलेले असावेत. त्यांचा समजूतदारपणा आणि सहानुभूति हीं माझ्या त्या आडाख्यांत बसणारीं नसावींत. आणि हें सगळें मी माझ्या नकळत केलेलें असावें. मनुष्य आपल्याला नकळत दुसऱ्याच्या स्वभावाविषयीं पुष्कळ छुपे निर्णय घेत असतो; आणि एखाद्या अनुभवानें ते चूक ठरवले तर तें त्याला खपत नाहीं. तो त्याला स्वतःचा पराभव वाटतो. मी घसरल्याबरोबर ते लोक खिंकाळल्यासारखे हसले असते, त्यांनीं अचकटविचकट शब्दांत माझी चेष्टा केली असती, किंवा जमल्यास ती संधि साधून माझ्या खिशांतलें पाकीट लांबवलें असतें, म्हणजे माझ्या सुप्त मनांतील अटकळ खरी ठरली असती. पण तसें कांहींच घडलें नाहीं. मी पडलों आणि पाठोपाठ माझे अंदाजहि घसरून पडले.

माझ्या कल्पना चुकीच्या ठरणें हें या वेळीं माझ्याच फायद्याचें होतें. त्यांच्या सौजन्याचा मलाच उपयोग झाला होता. पण माणसाचें समाधान हें अजून इतकें शहाणें झालेलें दिसत नाहीं. अहंभाव फार सोशिक असतो! त्यामुळें माणसाला हितावह ठरणाऱ्या अनुभवापेक्षांसुद्धां स्वतःचे अंदाज बरोबर ठरविणारे अनुभव अधिक प्रिय वाटतात. आपला पराभव आपण अपेक्षिल्याप्रमाणेंच घडून आला तर त्यांतूनहि त्याला विजयाची धुंदी मिळूं शकते.

तसें पाहिलें तर मी घसरलों ती जागा पडण्याच्या दृष्टीनें फार सोयीची होती! त्या रस्त्याचें स्वरूप अगदीं बकाली होतें. बहुतेक रहदारी कारखान्यांतील कामगारांची होती. बाजूचे दुकानदार किरकोळीनें विक्री करणारे असल्यानें त्यांचा दर्जा यथातथाच होता. कॉलेज जवळ असूनहि या बाजूला विद्यार्थ्यांची वर्दळ अगदीं बेताची होती. अद्ययावत् पोषाखांत फिरणारीं माणसें त्या रस्त्यावर अगदीं क्वचितच दिसत. त्यामुळें या ठिकाणीं पडल्याबरोबर आपली सांस्कृतिक पातळी एकदम सपाट झाली असें वाटण्याचें कारण नव्हतें. अद्ययावत् पोषाखांत फिरणाऱ्या सुसंस्कृत माणसांची गर्दी आसपास असली म्हणजे पडणाऱ्या माणसाची मोठी पंचाईत होते. त्याला एखाद्या अपराध्यासारखें वाटतें. आपण पडलों यापेक्षांहि आपल्या पडण्यामुळें आसपासच्या संस्कृतीची इस्त्री बिघडली याचेंच त्याला अधिक दुःख होतें. इतर लोकांची भावनाहि तशीच असते. कोणी पडला तर त्याचे हातपाय शाबूत आहेत या गोष्टीपेक्षां त्याचे कपडे स्वच्छ राहिले ही गोष्ट पाहून त्यांना अधिक समाधान होतें. फोर्टसारख्या उच्चभ्रू प्रदेशांत केळ्याच्या सालीवरून पाय घसरून पडणें हा एक सामाजिक गुन्हा असतो! पण पडण्याच्या दृष्टीनें, मी घाबरलों तो भाग फार सोयीचा होता. तिथें लोक पुष्कळ वेळां पडत असले पाहिजेत. पडण्याविषयीं, जीवनांतील लहानमोठ्या पराभवाविषयीं, या लोकांच्या भावना कांहीं निराळ्या असल्या पाहिजेत. तसें नसतें तर इतक्या मोकळेपणानें त्यांनीं आपल्या केळ्याच्या साली भर रस्त्यावर फेकल्या नसत्या आणि तिठ्या-तिठ्यावर एकेक केळींवाला इतक्या आत्मविश्वासानें बसलाहि नसता!

मला वाटतें, प्रत्येक केळींवाला हा 'हाडांच्या डॉक्टरां'चा गुप्त हस्तक असतो. त्या दोघांमध्यें एक परंपरागत व अलिखित करार असण्याची दाट शक्यता आहे. केळींविक्यांनीं रस्त्यावर साली पडतील अशी व्यवस्था करावी आणि डॉक्टरांनीं आपल्या पेशंटांना हाडें बळकट होण्यासाठीं नियमितपणें केळीं खाण्याचा उपाय सुचवावा. दोन पेशांमध्यें असा करार असणें हें अनैतिक आहे असें मी मुळींच समजत नाहीं. परस्परांच्या हितसंबंधांची काळजी घेणें हेंच सुसंस्कृत जीवनाचें वैशिष्ट्य आहे. असा करार असलाच तर तो आपल्या लोकशाही जीवन-दृष्टीशीं सुसंगत ठरेल आणि असें कांहीं घडलें नसेल तर आमचे डॉक्टर आणि केळींवाले हे अजून संस्कृतीच्या खालच्या पातळीवर आहेत असें समजावें लागेल. अमेरिकेसारख्या सुसंस्कृत लोकशाहीमध्यें निदान राजकारणांत तरी अशी

देवाण-घेवाण सतत सुरू असते. भांडवलदारांचे लॉबीमधील हितरक्षक आणि कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासद यांच्यामध्यें परस्परांना पूरक ठरणाऱ्या अनेक कारवाया सुरू असतात असें मधून मधून ऐकूं येतें. पण हें खोटें असण्याचाहि संभव आहे! कारण पडदा 'पोलादी' असतो तसाच तो 'कागदा'-चाहि असूं शकतो! अमेरिकेच्या 'कागदी पडद्या'मागें काय चाललें असेल कोणी सांगावें?

पण पेशापेशांतील 'सामंजस्य' शोधण्यासाठीं अमेरिकेइतकें दूर जाण्याचीहि जरुरी नाहीं. आमचीं महाविद्यालयें हीं कांहीं सांस्कृतिक दृष्ट्या फार मागासलेलीं नाहींत. माणसानें माणसाच्या उपयोगी पडण्याइतकी दुसरी कोणतीच गोष्ट पवित्र असूं शकत नाहीं हें सत्य आमच्या विद्यापीठांनींहि ओळखलेलें आहे. म्हणूनच पाठ्यपुस्तकांची योजना करणारे कांहीं तज्ज्ञ आणि शैक्षणिक पुस्तकांचें प्रकाशन करणारे कांहीं व्यापारी यांच्यामधील दिलजमाई पुष्कळदां अगदीं वाखाणण्यासारखी असते...कांहीं वेळां हा प्रकार थोडा चमत्कारिक वाटतो; विशेषतः केळ्याच्या सालीवरून पाय घसरल्यानंतर कांहीं दिवस एखादा मनुष्य कडवट विचारांच्या आहारीं जातो! व्यक्तीचें स्वातंत्र्य आणि व्यक्तिव्यक्तींतील संबंध याविषयींची त्याची आस्था थोडी ओहोटीला लागते. या केळींखाऊ संस्कृतीविषयीं त्याच्या मनांत एक प्रकारचा उद्वग निर्माण होतो. पण हें सगळें स्मशानवैराग्य असतें. पडलेला मनुष्य पुन्हां पहिल्यासारखा उभा झाला तर आपोआप त्याचीं सुसंस्कृत जीवनमूल्येंहि स्वतःचा तोल हळूहळू सावरूं लागतात.

मात्र पडलेला मनुष्य हा पुन्हां पहिल्यासारखा कधींच धड होऊं शकत नाहीं, असा माझा अनुभव आहे. आणि पडण्याचा प्रसंग जर आयुष्यांत प्रथमच आला असेल तर त्या अनुभवाचें सामर्थ्य फार विलक्षण असतें. मग पडण्यापूर्वी आणि पडण्यानंतर असे आयुष्याचे दोन भाग पडतात. पराभवाची पहिली जखम ही हाडापर्यंत खोल जाते.

केळ्याच्या सालीवरून पाय घसरून पडणें हा माझ्या आयुष्यांतील पहिला विशुद्ध पराभव होता. या अनुभवाची खरी भयानकता माझे इतरांविषयींचे अंदाज चुकले यांत नव्हती; माझा स्वतःविषयींचा अंदाजच चुकलेला होता.

एक दिवस केळयाच्या सालीवरून मीहि तोंडघशीं पडेन ही कल्पना माझ्या स्वप्नींहि नव्हती. केळयाच्या सालीचें माहात्म्य मी केव्हांपासून ऐकत होतों. मुंबईला आल्यानंतर केळयाच्या सालीवरून पडल्याच्या पुष्कळ सुरस व चमत्कारिक कथा मीं ऐकल्या होत्या. माझ्या एका मित्रानें आपल्या उजव्या मनगटाचीं हाडें केळयाच्या सालीवरुन स्केटिंग करण्याचा या मोहामध्यें गमावलेलीं होतीं ! पण तरीसुद्धां हें अद्‌भुत कसें घडतें याविषयीं मी साशंक होतों. एवढ्याशा साली-वरून इतकीं शहाणीं व डोळस माणसें सपशेल कशीं पडतात हें कोडें मला उलगडलें नव्हतें. शिवाय केळयाच्या सालीवरून पडणें ही गोष्टच मला मोठी क्षुद्र वाटे. अमुक एक मनुष्य पडशानें मेला असें कोणीं सांगितलें, तर त्या माणसा-विषयीं आदर ठेवून शोक व्यक्त करणें मला मोठें कठीण जाईल! आणि तीच गोष्ट पडण्याच्या या प्रकाराविषयींहि म्हणतां येईल. दुसऱ्या एखाद्या पद्धतीनें तोल जाऊन गटारांत पडणें ही गोष्ट मला या प्रकारापेक्षां अधिक क्षम्य वाटे. म्हणूनच सालीवरून पाय घसरल्याबरोबर माझ्या स्वाभिमानाला एकदम तडा गेला. माझ्या हसण्याचे प्रतिध्वनि मलाच वेडावूं लागले. मी इतका सामान्य मनुष्य आहें असें मला त्या वेळपर्यंत कधींच वाटलें नव्हतें. पर्वताची ठेच लागून कधीं कोणी पडत नाहीं, त्याला पाडणाऱ्या गोष्टी अगदीं साध्या असतात, असें चेस्टरटननें एके ठिकाणीं सुचविलेलें आहे; आणि तें सत्य मी प्रत्यक्ष अनुभवीत होतों.

जो मनुष्य आयुष्यांत कधींच पडत नाहीं त्याचे सांधे नेहमींच अधू राहतात. एक हाड मोडलें कीं दुसरीं हाडें शहाणीं होतात! म्हणून पहिल्या प्रेमाइतकाच पहिला पराभव हासुद्धां आयुष्यांतला एक अपूर्व अनुभव असतो. आत्मविस्मृतीच्या दृष्टीनें पहिला महत्त्वाचा असतो तर आत्मज्ञानाच्या दृष्टीनें दुसरा परिणामकारक ठरतो. या दोन्ही गोष्टी कदाचित् मला वाटतात तितक्या भिन्नहि नसतील. पुष्कळ वर्षांनंतर आपल्या भूतकाळाकडे दृष्टिक्षेप टाकला तर आयुष्यांतील पहिलें प्रेम आणि पहिला पराभव यांची विलक्षण गुंतागुंत झाल्याचें आपल्याला दिसून येईल! दोघांच्याहि कक्षा एकमेकांत मिसळलेल्या दिसतील. शुद्ध विजय मिळणें कठीण असतें एवढेंच नव्हे, तर आयुष्यांत शुद्ध पराभवाचा अनुभव येणें हेंसुद्धां कठीण असतें; आणि केळयाच्या सालीवरून घसरून पडण्याचा अनुभव हा शुद्ध पराभवाचा अनुभव असतो याबद्दल कोणाहि जाणकार माणसाचें दुमत होणार नाहीं. खरें म्हणजे अशा माणसांचा इतरांना हेवा वाटला पाहिजे! निदान पडणाऱ्या माणसाला

इतरांच्या सहानुभूतीची आवश्यकता निश्चित नसते. तो जमिनीला भिडतो त्याच वेळीं माती त्याच्या कानांत जीवनाचा महामंत्र सांगून टाकते. त्याच क्षणीं तो खऱ्या अर्थानें 'स्वतंत्र' होतो; आणि समजा, या प्रयोगांत एका मनगटाचें हाड मोडलेंच तर तें पाहण्यासाठीं त्याच क्षणीं दुसऱ्या मनगटाला डोळाहि फुटतो.

सह्याद्रि; फेब्रुवारी, १९५७

# डायरींतलीं पांच पानें

*डिसेंबर ३१, १९५६*

मला डायरी मिळालेली पाहून नंद्याला खूप गंमत वाटली, "आमच्या भाऊंना डायरी मिळाऽऽली" करीत तो शेजारच्या पोरांपुढें हुंदडत सुटला; नंतर त्यानें ती पन्नासदां कुरवाळली...त्याला ती इतकी आवडली कीं, त्याचें तोंड थोडें आंबटसुद्धां झालें!

मला वाटतें, ही डायरी मला मिळाली नसती तर बरें झालें असतें. तशी डायरी काढलीन आहे छान : दिसायला साधीभोळी आणि गालासारखी गुबगुबीत. तुलनच्या खिशांत ठेवावी इतकी मुलायम. सुरुवातीला अगदीं नेमकी माहिती आणि शेवटीं—सगळ्यांत चांगली गोष्ट—भरपूर कोरीं पानें. पण हा डायरी काढणारा माणूस वाटतो तितका साधा नव्हे! बहुतेक डायऱ्यांची सुरुवात १ जानेवारी १९५७ पासून आहे; पण या डायरीची सुरुवात डिसेंबर ३१, १९५६ पासून... हा माणूस मोठा दुष्ट आहे...३१ डिसेंबर १९५६ आणि १ जानेवारी १९५७ हे दोन्ही दिवस एकदम पाहणारे डोळे क्षणभर दचकल्याशिवाय राहत नाहींत, हें या दुष्ट माणसाला पुरें माहीत असलें पाहिजे.

...हा वर्षाचा शेवटचा दिवस; पण आतां हाहि चकवून पुढें चालला; त्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापने
अनुक्रम 23056 ....डविरींतली पांच पाने
क्रमांक 9923 ...... नों दि ...... 2/6/315



दूरच्या गर्दींत मिसळला...आणि आतां तिथून हसतो आहे...आतां हातांत काय राहिलें...फक्त 'जर–तर' भाषा.

...पण शेवटच्या दिवशीं वाटणारें हें हरवलेपण खरोखर अनाठायीं असतें. वस्तुतः काल हा अखंड आणि निरवयव; त्यांत शेवटचें कसलें आणि पहिलें कसलें. दोन्ही गोष्टी मनानें निर्मिलेल्या; फक्त सोयिस्कर समजुती...पण समजुती कल्पित असल्या तरी त्यांच्याशीं संबंध असलेल्या भावना या खऱ्याच असतात. भावना खऱ्या कीं खोट्या हा वादच खुळा आहे; भावना असतात तरी किंवा नसतात तरी. त्या असल्या तर मग त्या आपल्या परीनें खऱ्याच असतात. आपल्याला ज्यांचा अनुभव नसतो त्या भावना आपण खोट्या मानतों, आणि सर्वसाधारण अनुभवाशीं विसंगत असें त्यांचें स्वरूप असलें तर त्या आपण अतिरिक्त समजतों. पण कोणतीहि एक भावना ही कोणत्याहि दुसऱ्या भावने-इतकीच अस्सल असते. अस्तित्वापुढें खऱ्या-खोट्याच्या या लुडबुडीला कांहीं अर्थ नाहीं... कांऽऽहीं अर्थ नाहीं.

*जानेवारी १, १९५७*

काळाचें कोडें हें माणसानें स्वतःला घातलेलें शेवटचें कोडें आहे...हें कोडें घेऊन बसलें कीं काळाची जाणीवच हरवून जाते. 'आधीं' उरत नाहीं आणि 'नंतर' उरत नाहीं. हे सगळे भेद स्मृतिसापेक्ष आणि गतिसापेक्ष. समजा, माणसाची स्मरणशक्ति एकदम खलास झाली, किंवा बाह्य जीवनातील बदल अथवा गतिशीलता थांबली, तर 'काल' नाहींसा होईल...आणि 'काल' नाहीं अशी कल्पना केली तर 'स्मृति' आणि 'गति' या कल्पना अनाकलनीय ठरतील ...म्हणजे जितपत स्मृति हें एक सत्य आहे, किंवा जितपत 'गति' हें एक सत्य आहे, तितपत तरी 'आधीं' आणि 'नंतर' हा भेद सत्य मानावाच लागेल...

...पण हें मी स्वतःलाच पुन्हां पुन्हां कां पटवतों आहें? कीं 'आहे'चा हुंकार दडपून टाकण्यासाटीं ही 'नाहीं'ची शेवटची धडपड आहे? कारण कालाचें अस्तित्व संपलें कीं, 'बदल' ही कल्पना अर्थहीन होते; आणि 'बदल' ही

कल्पना अर्थहीन ठरली कीं, नैतिक जीवनांतलीं सगळीं कोडीं निकालांत निघतात ...'तुझा' डाव मला समजला आहे; समजतो आहे!

...नव्या वर्षाची ही प्रतिपदा; पण ती चंद्रकोर कुठें आहे? नव्या आकांक्षा कुठें आहेत? त्या नव्या उमेदींची भाषा कशानें थिजली? तो नवेपणाचा हव्यास कुठें हरवला?...किती डायऱ्या लिहिल्या तर तो पुन्हां सापडेल? कीं त्यांच्या वजनाखालीं तो दिवसेंदिवस अधिक खोल गाडला जाईल?...या नव्या वर्षाच्या डोक्यावरहि एक लाल पदर आहे; पण तो विधवेचा.

*जानेवारी २, १९५७*

मी इतका पापी आहें याची मला कल्पना नव्हती!

आज बन्या कैक वर्षांनीं भेटला. जवळजवळ दहापंधरा वर्षें झालीं. मी पानपट्टीच्या दुकानासमोर उभा होतों; तों पाठीवर बिनधोक थाप पडली. बघतों तों बन्या. लेकाचा पूर्वीपेक्षांहि अधिक ठेंगू दिसतो! अजून खांदा तसाच उडवतो, अजून बोलतांना तसाच चांचरतो. तीच काळी टोपी घालतो आणि तोच किल्ल्यांचा छेडा बोटाभोंवतीं फिरवीत बसतो...अजूनहि त्याच टोणकरांच्या दुकानांत जवळजवळ तेवढ्याच पगारावर काम करतो...हसतांना तसाच खद्खदतो आणि बोलतांना तशीच थुंकी उडवतो...मला वाटतें, बन्या काळाच्या तोंडावरच थुंकत असावा...बन्या 'ग्रेट' आहे; लेकाचा वाढतच नाहीं.

आणि मी मात्र बद्ललों, पार बद्ललों. बन्याच्या मिठींत मावत नव्हतों इतका 'व्यापक' झालों! बन्याला वर पाहायला लागे इतका उंच वाढलों. इतकें बद्लणें हें पाप आहे; शुद्ध पाप आहे.

...पण भाजी बद्लणें हें मात्र पाप नसावें! निदान हें घरांतल्या मंडळींना पटवणें आवश्यक झालें आहे. गेले तीन दिवस दुध्याभोपळा खातों आहें. घाऊक घेतली कीं भाजी स्वस्त मिळते, त्याचे हे सगळे परिणाम आहेत!

*जानेवारी ३, १९५७*

आज तिथिक्षय असावा! कांहीं केलें नाहीं; कुठें गेलों नाहीं; लिहिलें नाहीं कीं वाचलें नाहीं. कॉटवर ठेवलेल्या या तक्क्याशीं रेलून आपला त्या दूरच्या डोंगरांकडे पाहतों आहें. खिडकीच्या चौकटींतून दिसणाऱ्या दूरच्या डोंगरांना एक निराळीच आभासमयता येते. एका अर्थानें ते खरे असतात, आणि एका अर्थानें ते खरे नसतातहि. या खिडकींतून तीनचार डोंगर एकदम दिसतात. तो चेंबूरचा हिरवट डोंगर आणि त्याच्या पायाशीं ती पोरसवदा शीवची टेकडी; नंतर बाजूला ती कल्याणच्या डोंगरांची भुरी रांग; आणि शेवटीं त्या रांगेच्या मागें निळ्या वर्णाचा व मजबूत खांद्यांचा असा तो आजानुबाहु माथेरानचा डोंगर.

...किती पाहिलें तरी हे डोंगर संपत नाहींत; विशेषतः तो माथेरानचा डोंगर...ओंकाराएवढा अवाढव्य. अशा डोंगराकडे फार वेळ पाहवत नाहीं; हळूहळू आपण अलगद आकाशांत उचलले जातों.

आज तिथिक्षय झाला...म्हणून हा असा थोडा जगूं शकलों. आज सुमा आणि पिलें हींसुद्धां घरांत पंख लावून फिरत आहेत; आज किती तरी दिवसांनीं मी असा सबंध दिवस कांहींहि न करतां घरांत राहिलों म्हणून सारी मंडळी खुशींत आहेत.. पण मी घरांत कुठें होतों? मी होतों त्या डोंगरांत. आणि मी घरीं असतों तेव्हां त्यांना घरीं कधींच दिसत नाहीं...पण तें त्यांना कसें समजणार ...आणि समजायला हवें कशाला...तीं किती निरभ्र आहेत.

*जानेवारी ४, १९५७*

हिशोब मांडण्यांत अर्थ नाहीं हें आतां दोघांनाहि पटलें आहे; पण मधून-मधून सुमाला त्याची उबळी येते. गेल्या महिन्याला खर्च अव्वाच्यासव्वा झाला; आणि असें चाललें तर हें झेपणार कसें, असा तिचा प्रश्न आहे. माझें उत्तर आहे : आजपर्यंत झेपलें तसें. (कारण पुष्कळदां असेंच वाटलेलें होतें...आणि तरीसुद्धां झेपलें !) त्याच्यावर तिचें चिरपरिचित सुभाषित : 'सगळीं सोंगें आणतां येतात, पण पैशाचें सोंग आणतां येत नाहीं.' ('पैशाचें सोंग' ह्या विषयावरचें

प्रहसन फार चांगलें रंगेल...पण तें काम महाराष्ट्राच्या मोलिअरचें, आपलें नव्हे.) ...या महिन्याच्या खरेदीवर जमाखर्चाचा खडा पहारा असणार आहे! पण आत्तां लिहून ठेवतों : तें होणें नाहीं.

कारण आतां दोघांनाहि पुरें उमजलेलें आहे : दुसऱ्याकडून पैसे मिळविणें हा पहिला त्रास; कष्टानें मिळालेले पैसे पुन्हां खर्च करणें हा दुसरा त्रास; आणि या दोन त्रासांचा जमाखर्च ठेवणें हा तिसरा त्रास...हा तिसरा त्रास तेवढा आपल्याला टाळतां येतो. मनुष्याला स्वातंत्र्य आहे, तें एवढेंच.

...जें आपण प्रत्येक क्षणाबरोबर हरवत असतों त्याचा जमाखर्च आपणाला मांडतांच येत नाहीं. तो मांडायचा झाला तर त्याची तोंडमिळवणी आयुष्याच्या अखेरीलाच करावी लागेल...आणि त्या कांपऱ्या हातांना तें झेपणारहि नाहीं. तो हिशोब डोळ्यासमोर आणणें म्हणजेच 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां'. क्षणाक्षणांतून हरवणाऱ्या आयुष्याचा एक जमाखर्च संतांनीं मांडलेला होता; त्यांची शिल्लक 'अनंत' उरली. माझी कदाचित् 'शून्य' निघेल. तें पाहण्याचें धैर्य मला कुठें आहे? मग ही डायरीची उठाठेव कशासाठीं? आणि कुणासाठीं?

...उद्यां सकाळीं ही उरलेली डायरी नंदूला देणार आहें...त्याचें तें आंबट तोंड मला अजून आठवतें आहे. ही डायरी मिळाली म्हणजे तो कानांत वारा-शिरल्यासारखा हुंदडूं लागेल. अजून तो काळाभोवतीं गिरमिटत नाहीं. काळच त्याच्या भोवतीं नाचतो आहे...बिचारा परमेश्वर त्याचें रक्षण करो!

सत्यकथा; डिसेंबर, १९५७

ग्रंथालय ७०५६

REFBK-0007756

ललित निबंधांच्या या संग्रहामुळें कवि करंदीकरांच्या प्रतिभेच्या एका वेगळ्याच पैलूचें विलोभनीय दर्शन वाचकांना घडेल. नाजुक व तरल संवेदना, सूक्ष्म व उत्कट भावना आणि तर्ककठोर व तत्त्वजिज्ञासु विचार, हीं करंदीकरांच्या कणखर व्यक्तिमत्त्वाचीं सर्व सामर्थ्यें या ललितनिबंधांत व्यक्त झालीं आहेत. तीव्र भावानुभव सहज पेलणारी उद्दाम कल्पनाशक्ति करंदीकरांना लाभली आहे, त्याचप्रमाणें विविध पातळ्यांवरील अरूप भावानुभवाचें रूप करणारी शब्दकळा व शैली त्यांना काव्याप्रमाणेंच गद्यांतहि हस्तगत झालेली आहे. शिवाय, अनुभवाचीं नवनवीन क्षेत्रें आपलीशीं करण्याची उदंड प्रेरणा जशी त्यांच्या प्रतिभेंत आहे, त्याचप्रमाणें त्या अनुभवांना साजेसे घाट शोधण्याची आणि त्यावावत नवनवीन प्रयोग करून पाहण्याची शक्तिदेखील त्यांच्या लेखणींत विपुल आहे. लघुनिबंधांच्या मराठींतील रूढ वळणानें जाऊन त्या प्रकाराचें सर्व सामर्थ्य त्यांनीं जसें आपल्या प्रारंभींच्या कांहीं निबंधांत अजमावून पाहिलें आहे, त्याचप्रमाणें अलिकडील कित्येक निबंधांत त्यांनीं नव्या अनुभवांच्या अभिव्यक्तीसाठीं ललित निबंधाचीं नवीं वळणें पाडलीं आहेत व त्यांच्या गद्यशैलींत नवीं सामर्थ्यें ओतलीं आहेत. करंदीकरांचा प्रस्तुत संग्रह म्हणजे मराठींतील लघुनिबंधाच्या वठलेल्या वृक्षाला फुटलेला नवा, प्रबळ धुमारा होय, असें म्हणावेंसें वाटतें तें म्हणूनच.